# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**महासभा दि. १८/०२/२०१२**

आज शनिवार दि. १८/१०२/२०१२ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. १० दि. ०८/०२/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | तुळशीदास दत्तु म्हात्रे | महापौर |
| २) | पाटील जयंत महादेव | उपमहापौर |
| ३) | मेन्डोन्सा स्टीवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सभागृह नेता |
| ५) | शेख आसिफ गुलाब | विरोधी पक्षनेता |
| ६) | दिव्या अशोक तिवारी | सदस्या |
| ७) | शानू जो. गोहिल | सदस्या |
| ८) | पाटील उमाताई शाम | सदस्या |
| ९) | वैती नर्मदा यशवंत | सदस्या |
| १०) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १२) | जाधव मोहन महादेव | गटनेता |
| १३) | नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| १४) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| १६) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| १७) | म्हात्रे राजेश हरिश्चंद्र | सदस्य |
| १८) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १९) | पाटील शरद केशव | सदस्य |
| २०) | अग्रवाल ओमप्रकाश गंगाधर (गाडोदिया) | गटनेता |
| २१) | पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| २२) | व्यास सुधा वासुदेव | सदस्या |
| २३) | फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २४) | म्हात्रे नयना गजानन | गटनेता |
| २५) | पाटील अनंत रामचंद्र | गटनेता |
| २६) | डिमेलो बर्नड आल्बर्ट | सदस्य |
| २७) | परेरा कॅटलीन ऍन्थोनी | सदस्या |
| २८) | डॉ. राजेंद्र भवरलाल जैन | सदस्य |
| २९) | शर्मा भगवती | गटनेता |
| ३०) | भोईर शशिकांत जगन्नाथ | सदस्य |
| ३१) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ३२) | पाटील प्रेमनाथ गजानन | सदस्य |
| ३३) | नरेंद्र मेहता | गटनेता |
| ३४) | वर्षा भानुशाली | सदस्या |
| ३५) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३६) | जंगम लक्ष्मण गणपत | सदस्य |
| ३७) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ३८) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ३९) | पुजारी कांचन शेखर | सदस्य |
| ४०) | मुंज वासुदेव भास्कर | सदस्य |
| ४१) | सय्यद नुरजहॉं नझर हुसैन | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४२) | शेख नुर मोहम्मद अेहमद | सदस्य |
| ४३) | खान शफीक अहमद सादत | गटनेता |
| ४४) | सरिता चंद्रकांत म्हात्रे | सदस्या |
| ४५) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४६) | वैती विजया हेमचंद्र | सदस्य |
| ४७) | पालांडे प्रशांत भगवंतराव | सदस्य |
| ४८) | ठाकूर कल्पना हरिहर | सदस्या |
| ४९) | म्हात्रे चंद्रकांत खंडोजी | सदस्य |
| ५०) | मोदी चद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ५१) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ५२) | दुबे रामनारायण सदानंद | सदस्य |
| ५३) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ५४) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ५६) | चक्रे वंदना रामदास | सदस्या |
| ५७) | हसनाळे जोत्सना जालींदर उर्फ शिंदे पूजा प्रताप | सदस्या |
| ५८) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५९) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ६०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ६१) | आसिफ पटेल | नामनिर्देशित सदस्य |
| ६२) | हंसुकुमार पांडे | नामनिर्देशित सदस्य |

**<u>गैरहजर सदस्य –</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| २) | पुरोहित मधुसुदन मनोहरलाल | गटनेता |
| ३) | पाटील धनेश परशुराम | गटनेता |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ७) | बाविघर सिसिलीया विजय | सदस्या |
| ८) | परेरा टेरी पॉल | सदस्य |
| ९) | सावळे निर्मला बाबुराव उर्फ कांबळे निर्मला विष्णू | सदस्या |
| १०) | कुरेशी याकुब ईस्माईल | सदस्य |
| ११) | ठाकुर प्रकाश पांडुरंग | सदस्य |
| १२) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| १३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| १४) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| १५) | शेख मुसरर्तबानु इब्राहिम | सदस्या |
| १६) | शेख सलिम दाउद | सदस्य |
| १७) | हरिश्चंद्र जगन्नाथ म्हात्रे | सदस्य |
| १८) | माळी हेमा रविंद्र | सदस्या |
| १९) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| २०) | संजय पांगे | नामनिर्देशित सदस्य |
| २१) | प्रकाश दुबोले | नामनिर्देशित सदस्य |

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | अरुण कदम | नामनिर्देशित सदस्य |

**नगरसचिव :-**

विषय पत्रिकेचे वाचन केले.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, मला मा. महापौरांना एक प्रश्न विचारायचा आहे की, मागच्या महिन्यात महासभा का लावली नाही? या शहराच्या दृष्टीने शहराच्या हिताची काही कामे आहेत की नाही आपल्याला काळजी आहे का?

**प्रशांत पालांडे :-**

सचिव साहेब, २० तारखेच्या आत जी महासभा लागायला पाहिजे ती लागत नाही तर त्याला कारण काय? सभा लावण्याची आपली सुद्धा जबाबदारी आहे.

**नगरसचिव :-**

माझी जबाबदारी असली तरी वेळ, तारीख ठरविण्याचे अधिकार पिठासीन अधिका-यांना आहे.

**प्रशांत पालांडे :-**

अधिनियमामध्ये म्हटलेलं आहे की, दर महिन्याच्या २० तारखेच्या आतमध्ये ती सभा व्हायला पाहिजे. २० तारखेच्या आत होतच नाही ती तारीख सुद्धा पाळली जात नाही. मागची किती तारखेला झालेली.

**नगरसचिव :-**

३०/१२ ला झालेली.

**प्रशांत पालांडे :-**

मध्ये किती गॅप झाला.

**नगरसचिव :-**

दिड महिना होऊन गेला.

**प्रशांत पालांडे :-**

**असे चालते का?**

**नगरसचिव :-**

शासनात दोन महिन्यात सभा झाली नाही तर कारवाई होते अशी कायद्यात तरतुद आहे.

**प्रशांत पालांडे :-**

२० तारखेच्या आत व्हायला पाहिजे अशी पण कायद्यात तरतुद आहे ना? तुम्ही सचिव म्हणून स्पष्टीकरण दिले पाहिजे.

**नगरसचिव :-**

मी लेखी पत्राने कळविले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, आपली सभा का होत नाही?

**मा. महापौर :-**

विषय पाहिजेत.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, जर शहरासमोरचे विषय संपले असतील तर आम्ही विषय देतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सचिव साहेब, तुमच्याकडे प्रशासनाचे विषय नव्हते का?

**मिलन पाटील :-**

आपल्याकडे टॅक्सचे विषय आहेत, फायरचे विषय आहेत, किती किती विषय आहेत. घनकचरा काय कमी विषय आहेत. त्याच्यावर आपल्याला एक मिटींग घ्यायची होती.

**मा. महापौर :-**

माझ्याकडे विषय यायला पाहिजेत.

**मिलन पाटील :-**

तुम्ही मागवायला पाहिजेत तो तुमचा अधिकार आहे. सचिव साहेब तुम्ही विषय दिले का नाही?

**प्रशांत पालांडे :-**

पानपट्टे साहेब, प्रशासनाकडे विषय नाहीत. प्रशासनाकडचे विषय संपले आहेत का?

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, चुकीचे बोलतात असा आमचा स्पष्ट आरोप आहे. सचिव साहेब तुम्ही खुलासा करा मा. महापौर बोलतात की, विषयच नाहीत. आमची अशी माहिती आहे की, सन्मा. आयुक्तांनी प्रशासनामार्फत मा. महापौरांना विषय दिले आहे आणि मा. महापौर सांगतात विषय आलेले नाहीत जर मा. महापौरांना शहराची चिंता नसेल तर ह्यापेक्षा कोणते दुर्देव आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही शहराची चिंता करु नका मला सुद्धा सर्व कळते.

**आसिफ शेख :-**

नविन वर्षाची पहीली सभा लावायलाच पाहिजे होती तुम्ही लावली नाही.

**मा. महापौर :-**

हेच प्रश्न आहेत ना?

**आसिफ शेख :-**

हे चुकीचे आहे.

**मा. महापौर :-**

हे प्रश्न आहेत गोषवारा नाही. अशीच मिटींग लावतात का? गोषवा-याशिवाय

**आसिफ शेख :-**

तुमची मजबुरी आम्ही समजु शकतो.

**मा. महापौर :-**

मी मा. आयुक्तांशी बोललो की मिटींग लावायला पहिजे.

**आसिफ शेख :-**

मा. आयुक्तांबरोबर आमची चर्चा झाली. मा. आयुक्त बोलले आम्ही संपुर्ण प्रस्ताव दिलेला आहे.

**मा. महापौर :-**

गोषवारा दिलेला नाही.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सचिव बोलले प्रस्ताव आहेत आम्ही मा. महापौरांना प्रस्ताव दिले मा. महापौर लावत नाही.

**मा. महापौर :-**

तीन तीन महिने जेव्हा मिटींग लावली नाही तेव्हा कोणी बोलले नाही.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, त्याच्यावर का कारवाई केली नाही. कोणती मिटींग तीन महिने लागली नव्हती?

**नगरसचिव :-**

अशी बाब नाही.

**शरद पाटील :-**

काय हो महापौर साहेब, तुम्ही सांगता तीन तीन महिने मिटींग लागली नाही.

**मा. महापौर :-**

मागच्या वेळेला समोर महापौर बसलेले आहेत त्यांना विचारा.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आपल्याला माहिती आहे की, अडीज वर्षात ३० महिने असतील तर आचार संहितेच भाग वगळुन प्रत्येक महिन्याला मिटींग लागलेली आहे ह्या ३० महिन्यात मी शहरात नसताना देखील मिटींग लावलेली आहे आणि सन्मा. उपमहापौरांनी मिटींग चालवलेली आहे एकही मिटींग रद्द केलेली नाही.

**मा. महापौर :-**

स्टँडींगच्या चार चार सदस्यांनी मागणी करुन मिटींग लावली नाही.

**नरेंद्र मेहता :-**

चार चार सदस्यांनी मागणी केली तेव्हा टॅक्स वाढवायचा विषय होता.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडुन आलेले उत्तर मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र.५४९३/२०११ हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अंतर्गत अनुसुची – ड मधील प्रकरण २(५) १(ब) अंतर्गत न्यायप्रविष्ठ प्रकरणी चर्चा करता येत नाही असे प्रशासनाचे उत्तर आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मा. महापौर साहेब, माझा जो प्रश्न आहे आम्ही न्यायालयाच्या कुठल्याही प्रक्रियेवर निर्णयावर टिका टिप्पणी करणार नाही पण आमचे जे काही प्रश्न आहेत त्याची उत्तरे प्रशासनाकडुन मिळाली पाहिजेत. त्याला कोणी बंदी घातली आहे का? पानपट्टे साहेब तुमच्याच विभागाचे प्रश्न आहेत मी जे प्रश्न विचारले त्याचे आणि न्यायलयाचा काही संबंध नाही त्याची उत्तरे प्रशासनाने दिली पाहिजेत.

**संभाजी पानपट्टे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो साहेब, चर्चा करता येत नाही लेखी उत्तर ह्यापूर्वीच दिलेले आहे.

**प्रशांत पालांडे :-**

न्यायालयीन बाबींबद्दल चर्चा करायची नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

चर्चा करता येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

पानपट्टे साहेब, साधा प्रश्न विचारलेला आहे की, आपले अधिकारी दिपक खांबितची गुणपत्रिका का उपलब्ध नाही? ह्याच्यात उत्तर द्यायला आपल्याला काय अडचण आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

चर्चा करता येत नाही. माहिती देता येते माहिती दिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

माहिती कुठे दिली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

लेखी दिलेली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

नाही दिली.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

आस्थापनाने माहिती तयार केली होती.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, मिटींग चालु होऊन १५ मिनिटे झाली अधिकारी तुमच्या नंतर येतात तर काय फायदा मा. महापौर साहेब त्यांना शिस्त लावा.

**प्रशांत पालांडे :-**

पानपट्टे साहेब, साधे प्रश्न विचारलेले आहेत मला लेखी माहिती दिली तर सभागृहाला ह्या गोष्टीची माहिती द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

न्याय प्रकरण असल्यामुळे चर्चा करता येत नाही.

**प्रशांत पालांडे :-**

तुम्ही विधी अधिका-यांना विचारा मॅडम मागे जी महासभा होती त्यावेळी सुद्धा हा प्रश्न होता आता दिड-दोन महिने झाले आहेत मध्ये काही घडामोडी घडल्या असतील तर त्याची माहिती द्या.

**विधी अधिकारी (सई वडके) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते समाज विकास अधिकारी ह्याच्या नियुक्ती संदर्भात तुषार गायकवाड म्हणुन याचिकेदार आहेत त्यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे ते मागच्या आठवड्यामध्ये हायकोर्टात हीअरींगसाठी आल्या होत्या आणि मंगळवारी हिअरींग ठेवली आहे.

**प्रशांत पालांडे :-**

मी अग्निशमन बद्दल बोलतो पहिला प्रश्न ५३ नंबर

**विधी अधिकारी (सई वडके) :-**

साहेब, अग्निशमनाचे लेबर कोर्टात मॅटर पेंडींग आहे.

**प्रशांत पालांडे :-**

या संदर्भात दिड महिन्यामध्ये काही झाले का?

**विधी अधिकारी (सई वडके) :-**

मला प्रश्न समजला नाही.

**प्रशांत पालांडे :-**

माझा दिड दोन महिन्यांपूर्वी माझा प्रश्न होता त्यावेळीपण हेच उत्तर होते आतापण हेच उत्तर आहे यामध्ये काही घडामोडी घडल्या का?

**विधी अधिकारी (सई वडके) :-**

घडामोडी म्हणजे कोर्टात मॅटर चालूच आहे हिअरींगला आहेत काही ऑर्डरसाठी आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

मी काय म्हणतो हे जे प्रश्न आहेत त्याला सभागृहात उत्तर द्यायला काही अडचण आहे का? दिपक खांबित ह्यांची गुणपत्रिका का नाही ह्याची उत्तर द्यायला काय हरकत आहे.

**विधी अधिकारी (सई वडके) :-**

साहेब, तो जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो न्यायालयात विचारणा करण्यात आलेली आहे आणि अनुसुचित "ड" प्रमाणे पाच प्रश्न विचारण्याचा हक्क त्याच्यात "ब" मध्ये पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारता कामा नये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे भारताच्या प्रदेशातील कोणत्याही भागातील कोणत्याही न्यायालयातील किंवा कोणत्याही न्यायधिकरणापुढे प्रलंबित असलेला कोणताही वाद किंव कारवाई या संदर्भात किंवा त्याच्याशी संबंधीत असेल असा कोणताही प्रश्न विचारता येणार नाही.

**प्रशांत पालांडे :-**

ठिक आहे, परंतु संबंधीत अधिका-यावर काय कारवाई केली ती तरी माहिती द्यायला पाहिजे. त्याचा संबंध तर नाही पानपट्टे साहेब, आपण त्या कर्मचा-यावर कारवाई केली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

मा. आयुक्त स्वतः चौकशी करतात ती चौकशी करुन शासनाला अहवाल पाठवणार आहेत.

**प्रशांत पालांडे :-**

साहेब, ती चौकशी पूर्ण झाली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

चौकशी करायला वेळ लागतो चौकशी करुनच कारवाई करायची असते.

**प्रशांत पालांडे :-**

चौकशी पूर्ण झाली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

चौकशी झाली नाही.

**प्रशांत पालांडे :-**

स्वतः मा. आयुक्त साहेब म्हणाले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

नाही झाली मला माहित आहे.

**प्रशांत पालांडे :-**

पानपट्टे साहेब, स्वतः मा. आयुक्तांनी सांगितले की, चौकशी पूर्ण झाली आहे.

**नगरसचिव :-**

प्रश्न ५४ स्नेहा पांडे ह्यांचा प्रश्न आहे.

**स्नेहा पांडे :-**

**मुझे समाधानकारक उत्तर मिल गया है।**

**नगरसचिव :-**

प्रश्न ५५ ओमप्रकाश अग्रवाल ह्यांचा प्रश्न आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, जो प्रश्न विचारलेला आहे त्या प्रश्नाचे उत्तर बघितले तर त्यामध्ये वाहतुक बंद आहे त्याला ०४/०१/२००३ ला परवानगी दिली आणि दुसरे २१/०५/२००४ तीन वर्षाची वाहतुकीची परवानगी दिली आणि आज १० वर्ष त्या गोष्टीला झाली त्याबाबत प्रशासनाने का कारवाई केली नाही त्याची जी मंजुरी आहे ती सभागृहामध्ये आणायला पाहिजे ह्याचे मला उत्तर मिळावे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

प्रश्नाचे उत्तर दिलेलं आहे कोणता मुद्दा समाधानकारक नाही ते सांगा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मला तुम्ही सांगा २००३ आणि २००० साल तीन वर्षाकरीता दिले होते. तीन वर्षानंतर ही वाहतुक बेट आहेत ती कोणालाही करारनामा न करता घेतलेले नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त):-**

कार्यकारी अभियंताना माहीती घेऊन बोलावले आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, प्रश्न काय आहे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

वाहतुक बेट जे तीन वर्षाकरीता दिले होते त्याची मुदत संपल्यानंतर त्यांना रिनिव्ह किंवा मुदत वाढ देण्यात आली नाही अशा किती वाहतुक बेट आहे आणि त्यांना का दिली नाही त्याने मागितली नाही किंवा आपण दिली नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, सदरची वाहतुक बेट आहेत ती प्रशासकीय काळात प्रशासकीय ठराव करुन त्यावेळी दिली होती आणि जाहिरात नियंत्रण कायदा जो आहे तो २००३ साली आला.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठरावाने दिली आहेत.

**दिपक खांबित :-**

त्याच्या आधीही दिली आहेत साहेब, स्थायीचा जो ठराव आहे जाहिरात व नियंत्रण कायदा जो आहे तो २००३ ह्या ठरावानंतर आला कायद्यामध्ये अशी तरतुद आहे की, मा. आयुक्तांना अधिकार दिले आहेत तीन वर्षाकरीता मा. आयुक्त देऊ शकतात पण हे तो कायदा व्हायच्या अगोदर ठराव करुन दिलेले आहेत त्यामुळे साहेब, ह्याच्यात मुदत आली नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तीन वर्षानंतर मुदत संपल्यानंतर तुम्ही मुदत घेतली की नाही.

**दिपक खांबित :-**

नाही घेतली काही वाहतुक बेटांना परमिशन देताना...

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मुदत दिली नाही हे प्रशासनाचे काम नाही का कुठलीही वस्तु दिल्यानंतर त्याची झाली असे म्हणणे आहे का? २००३ ते २०१२ दहा वर्ष झाली. माझा हा प्रश्न मिळाल्यानंतर त्याच्यावर काही कारवाई केली आहे का?

**दिपक खांबित :-**

सर्व संबंधित वाहतुक बेट ज्यांनी बांधली आहेत त्यांना आपले पत्र आल्यानंतर पत्र पाठवले. त्यांना जी काही दुरुस्ती होती त्यासाठी पत्र दिले आणि ......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

दुरुस्तीचा विषय नंतर आहे. त्याने मुदत वाढ करुन घ्यावी अशा बाबतीत पत्र दिले आहे का?

**दिपक खांबित :-**

असे पत्र दिले नाही.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

जो पर्यंत त्याला मुदत वाढ मिळत नाही. तो प्रशासन काळातला असला तर त्याला मुदत असते. समजा मुदत नसेल तर त्याला तुम्ही मुदत वाढ करण्यासाठी पत्र दिले पाहिजे. तुमची ही वास्तु आहे आणि तुम्ही प्रशासनाला दिली नाही. याबाबत कुठे प्रशासन चुकल्यासारखे वाटते.

**दिपक खांबित :-**

साहेब, तेव्हा कन्सेप्ट कसा होता तेव्हा वाहतुक बेट बांधण्यासाठी कोणी पुढे येत नव्हते. तेव्हा आपण स्वतः त्या विकासकांना कॉन्टॅक्ट करुन सांगितले तुम्ही ही कामे करा आणि ह्याची देखभाल दुरुस्ती करा आता ॲडव्हाइजमेन्ट मिळते म्हणून बहुतेक लोक येतात. तेव्हा तशी परिस्थिती नव्हती. त्यामुळे त्यांना देताना आपण मुदत टाकली नव्हती.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठीक आहे. आता जे-जे वाहतुक बेट आहे त्याच्यावर कधी गेले आहेत का? ते वाहतुक बेट कशा पध्दतीचे आहे. आपण वाहतुक बेट कशाला बनवले आहे. वाहतुकीला दिशा मिळेला गावात सौंदर्य दिसेल ह्यासाठी आपण दिले आहे. आपण त्याची कधी पाहणी केली आहे का?

**दिपक खांबित :-**

वाहतुक बेटाच्या बाबतीत ऑब्जेक्शन आलेले आहे. तर ह्या बाबतीत आम्ही नवीन सर्व्हे घेतो सर्व्हे करुन वाहतुक बेटाची ठिकाणे निश्चित करतो आणि त्याप्रमाणे तो विषय पुन्हा एकदा आणतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही विषय पुन्हा आणता ते ठिक आहे. एक विषय तुम्हाला सांगतो. सर्व शहरातले नागरिक ह्या सभागृहातले सर्व अधिकारी, सर्व नगरसेवक आपण जेव्हा भाईंदर पुर्वेने येतो तेव्हा गोल्डन नेस्टला जे वाहतुक बेट आहे त्याची काय परिस्थिती आहे लोक हसतात. एखादया मयताला घेऊन चालतात अशा पध्दतीने त्याला ठेवलेले आहे. आणि तिकडून सर्व अधिकारी येतात पण कोणाचेही लक्ष जात नाही की हे वाहतुक बेट ज्या पध्दतीने बनवायला पाहिजे त्या पध्दतीने बनविले नाही. म्हणजे मेलेल्या माणसाला दोन माणसांनी उचलेले आहे. त्याकडे कोणाचे लक्ष नाही. त्यानंतर आम्ही स्वतः आणि आमचे स्थायी समितीचे सभापतीनी पत्र दिले की हे काय चालले आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब ह्या बाबतीत वाहतुक विभागाशी चर्चा करुन पाहणी करुन वाहतुक बेटाची ठिकाणे आम्ही निश्चित करु.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

गोल्डन नेस्ट पोलिस चौकीजवळ जे वाहतुक बेट बांधलेले आहे. त्याबाबत प्रशासनाने ताबडतोब निर्णय घ्यावा. कारण मा. आयुक्तांनी सांगून देखील काही झाले नाही. म्हणून महासभेत प्रस्ताव आणावा लागला.

**दिपक खांबित :-**

साहेब तेच सांगतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते ज्या पध्दतीने होते ते नादुरुस्त झाले आहे. नादुरुस्त झाल्यामुळे शहराची विडंबना होते. शहराची विडंबना थांबली पाहिजे. असे आमचे म्हणणे आहे. तुम्ही निर्णय नंतर घ्या परंतु ते तिन्ही पुतळे काढून टाका.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण लगेच त्याची डिझाइन करुन घेऊ. त्याप्रमाणे त्यांना करायला सांगू.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुम्ही ते जे तीन पुतळे तुटलेले आहेत ते तुम्ही ताबडतोब काढणार की नाही? की ते तसेच ठेवणार.

**दिपक खांबित :-**

त्या संस्थेला आम्ही लगेच पत्राने कळवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती दिवसात.

**दिपक खांबित :-**

आम्ही त्यांना उदयाच पत्राने कळवतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता त्याची मुदत संपलेली आहे. तुम्ही केले असते आणि संस्थेने केले असते तर एवढयात झाले असते. मला प्रशासनाकडून मी मुदत संपलेली आहे आणि मुदत दिलेली नाही तुम्ही नियोजन करणार ती बाब नंतरची आहे. शहराची विडंबना होत आहे.

**दिपक खांबित :-**

सभागृहाने ठरवा आम्ही पूतळे काढतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सभागृहाने ठरवलेले आहे. तुमची मुदत संपलेली आहे.

**दिपक खांबित :-**

ठीक आहे. त्वरीत काढण्यात येतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

किती दिवसात.

**दिपक खांबित :-**

तीन दिवसात.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

बाकीची मुदत वाढ दयायची असेल तर मुदतवाढ दया.

**अनिल सावंत :-**

तीन दिवसात काय?

**दिपक खांबित :-**

ते जे पूतळे आहेत ते बाजूला काढून ठेवू.

**मा. महापौर :-**

पूतळे लावायला आपणच सांगितलेले होते. साहेब, बाजूला बसले आहेत विचारा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सांगितले असेल आतापर्यंत चांगले दिसत होते.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब ते वाहतुक बेट ज्यावेळी बनवले तुम्ही जेव्हा त्या विकासकाना दिले ती डिझाइन तुम्ही अप्रुव्ह केली होती की बिल्डरने स्वतःच्या मनाने लावली.

**दिपक खांबित :-**

साहेब त्यांनीच केले होते.

**अनिल सावंत :-**

अप्रुव्ह तुम्ही केले असेल ना?

**दिपक खांबित :-**

आपण केले.

**अनिल सावंत :-**

त्यावेळी तुम्हाला ते चांगले वाटत होते.

**दिपक खांबित :-**

तेव्हा साहेब एवढी वर्दळ पण नव्हती आणि रस्तेही मोठे होते त्यामुळे ते चांगले वाटत होते.

**अनिल सावंत :-**

आता वर्दळ वाढल्यामुळे चांगले झाले.

**दिपक खांबित :-**

साहेब, आता ते प्रशस्थ करायला पाहिजे आता आर्किटेक्ट नेमून सगळयाची डिझाईन .........

**अनिल सावंत :-**

महासभेचे अप्रुव्हल घेऊन बनवून टाका.

**दिपक खांबित :-**

त्या संस्थेला विचारणा करु आणि करत असतील ...........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते स्थायी मध्ये आणि महासभेमध्ये ठरवू दयायचे की नाही दयायचे.

**मा. महापौर :-**

ह्या लोकानाच काढायला लावा.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, गोल्डन नेस्ट सर्कल चौक का नाम स्वातंत्र्यवीर सावरकर चौक है। वह पूतले निकालकर वहाँ स्वातंत्र्यवीर सावरकर का पूतला लगाया जाए।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब आपल्या शहरात स्वातंत्र्य सैनिक होऊन गेले. एकाही स्वातंत्र्य सैनिकाचा नामनिशान नाही. हे दुस-याच नाव देण्यापेक्षा स्वांत्र्य सैनिकाचे नाव दया ना. आज मोरुभाऊंनी या शहराकरीता त्याग केलेला आहे. अशा स्वातंत्र्य सैनिकांची नावे दया. शहराला त्याची आठवण तरी राहील. जी जूनी पिढी आणि नवीन पिढी आहे त्यांना समलेल. स्वातंत्र्य सैनिक कोण होते आणि कसे होते.

**नगरसचिव :-**

प्रश्न संपलेले आहेत. आजच्या सभेसाठी सन्मा. नरेंद्र मेहता यांची लक्षवेधी आलेली आहे. लक्षवेधीचे वाचन केले (लक्षवेधी टाईप करणे.)

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब जानेवारी २००९ मध्ये आपण १६ प्लेग्राऊंड आणि गार्डनचे वेगवेगळया भागात उद्‌घाटन केले. इंद्रलोक, गोल्डन नेस्ट, नयानगर, भाईंदर (प.), भाईंदर (पुर्व), नवघर रोड ह्या ठिकाणी आणि त्यामध्ये ३-४ करोड खर्च केले. त्यानंतर फक्त एक नयानगर ह्या भागात एक गार्डन प्लेग्राऊन्ड विकसीत झाले. मा. महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब मिरा भाईंदर महानगरपालिका चार करोड आपण खर्च केले त्या जागेवर आज पाहाणी केली तर फक्त तीन प्लेग्राऊन्ड आणि गार्डन सोडून बाकी नऊ गार्डनला केलेले खर्च साधारण दोन ते अडीज करोडचे संपूर्ण नुकसान झालेले आहे. किंवा कामच झालेले नाही. अधिकारी माहिती देतील की काम पूर्ण झाले होते की अर्धवट झाले होते की पूर्ण करुन ते काम जागेवर नाही ह्या प्रकारचे काम केले. तीन वर्षात एवढा मोठा खर्च करुन का त्याचा पाठपुरावा करुन बाकीची कामे केली गेली नाहीत. खांबित साहेब त्याच्यात किती खर्च झाला आणि बाकीचे का विकसीत झाले नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, आपण महापौर असताना ठराव केला होता. उद्‌घाटन करुन कुंपण भिंत आणि ग्रिलची कामे पूर्ण केली होती त्यावेळेला बजेट नसल्यामुळे आतमध्ये पाथ हे करायचे आहेत. लॉज लावायचे, बेंचेस वैगेरे म्हणजे उदयाने सुरु करण्याकरीता जी काही व्यवस्था करायची होती ते करण्यासाठी प्लॅन वैगेरे केले होते. तत्कालिन आयुक्त शिवमुर्ती नाईक असताना ह्याकरीता आर्किटेक्ट कडून ड्रॉईंग डिझाईन करुन घेतले. आणि त्याप्रमाणे हे सगळे महापालिकेने न करता खाजगी संस्थेद्वारे गार्डन विकसीत करावे आणि पाच वर्ष देखभाल दुरुस्ती करावी असा आम्ही विषय आणला होता. आणि २०/०४/२०११ च्या महासभेत ठेवला असता महासभेमध्ये हा विषय पास झाला नाही. त्यामुळे हे काम पूर्ण झाले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

२०/०४/२०११ आणि जानेवारी २००९ ह्याच्यामध्ये किती फरक आहे.

**दिपक खांबित :-**

त्यामुळे गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये ह्या कामासाठी ...........

**नरेंद्र मेहता :-**

सव्वा दोन वर्षांचा फरक आहे ना. ११ ला नाही केले ठिक आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, आठ महिन्याचा फरक आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आमचे असे स्पष्ट म्हणणे आहे की त्याठिकाणी अर्धा खर्च केला गेला .......... खांबित साहेब मी माहिती घेतली की आपण पूर्ण पैसे अदा केले आहेत.

**दिपक खांबित :-**

जी कामे केलेली आहेत तेच पैसे दिलेले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

आपण जागेवरच पाहणी करा.

**दिपक खांबित :-**

हो नक्की.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचे म्हणणे आहे का?

**दिपक खांबित :-**

हो. कामे अर्धवट आहेत मी कुठे बोलतो १२२ नंबर आहे. जेवढे काम झालेले आहे जिकडे अतिक्रमण आहे तिकडे आपण नाही केले.

**नरेंद्र मेहता :-**

ज्या ठिकाणी अतिक्रमण आहे तो भाग वेगळा आहे. परंतु ज्या ठिकाणी अतिक्रमण नाही त्याठिकाणी पूर्ण कामे झाली नाहीत. त्यामध्ये काय अडचण आहे. २०११ नंतर आता २०१२ ला जवळ जवळ एक वर्ष होत आले. आपण बजेटला तरतूद करतो. गार्डन आणि उद्यान विकसीत करण्यासाठी का करत नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब त्याच्यामध्ये आम्ही विषय आणलेला होता. आम्ही खाजगी विकासकाची मिटींग घेतली होती.

**नरेंद्र मेहता :-**

हे शिवमूर्ती नाईक साहेबांच्या काळातले आहे. शिवमुर्ती नाईक पाचव्या महिन्यात रिटायर झाले. त्यानंतर आज जवळ-जवळ एक वर्ष झाले आहे त्यानंतर बजेट प्रोव्हिजन केले. गार्डन आणि प्ले ग्राऊंड विकसीत करण्यासाठी २-३ करोड राखीव ठेवले होते.

**दिपक खांबित :-**

साहेब सात महिने झाले ह्याच्यामध्ये चालू वर्षात तरतूद नसल्याने हे काम केले नाही. मा. आयुक्ताकडे याबाबतीत बरेच प्रपोजल आहे आहेत. त्याची छाननी चालू आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब मला एक सांगा १६ प्ले ग्राऊंडचे उद्घाटन एकत्र झाले त्यातले तीन विकसीत होतात त्यामध्ये ठेकेदाराना दयायचा वाद येत नाही. त्यामध्ये महापालिका ......... ते कोठे येत नाही असे का?

**दिपक खांबित :-**

साहेब आजच्याच प्रकरणामध्ये १११ नंबरचे जे प्रकरण आहे ते हेच आहे त्याच्यामध्ये आमची भुमिका तीच आहे की हे खाजगी संस्थाकडून करुन घ्यावे. त्याच्यामध्ये तुम्ही ठराव केला की तस होईल तर होईल ना. मी १११ मध्ये विषय दिला आहे. महानगरपालिकेने करावे की खाजगी विकासकाने करावे .........

**अनंत पाटील :-**

त्याच्यासाठी जो खर्च झाला आहे त्या खर्चाचे काय?

**नरेंद्र मेहता :-**

तो खर्च फूकट गेला.

**दिपक खांबित :-**

चार-पाच महिन्यात काम पूर्ण होईल.

**नरेंद्र मेहता :-**

हे बोलतात ग्रिल चोरीला गेली किंवा अर्धे लागले ते त्यांनाच माहित. कूंपण भिंत जागेवर नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब तुम्हाला त्याच्यात काही प्रॉब्लेम असेल तर .......

**नरेंद्र मेहता :-**

मला काही प्रॉब्लेम नाही सभागृहाला प्रॉब्लेम आहे.

**दिपक खांबित :-**

गार्डन वाईज किती काम झाले किती खर्च झाले त्याचा हिशोब ठेवतो तुमच्यासमोर.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचे म्हणणे सर्व जागेवर आहे.

**दिपक खांबित :-**

हो.

**नरेंद्र मेहता :-**

हे प्रोसेडिंगमध्ये नोंद आहे. मा. महापौर साहेब पूढच्या वेळेला आम्ही फोटोसहित आणि खांबित साहेबांनी आम्हाला तसे लेखी उत्तर दयावे आणि त्यावेळी नाही झाले तर खांबित साहेब हयाच्यामध्ये दोषी ठरतील. ते आता कबूल करतात की जागेवर आहेत.

**दिपक खांबित :-**

प्रत्यक्ष जे काम झालेले आहे .......... त्याप्रमाणेच आपण ठेकेदाराना पेमेन्ट केलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

जागेवर काम आहे का?

**दिपक खांबित :-**

हो.

**नरेंद्र मेहता :-**

आहे.

**दिपक खांबित :-**

आहे ते मी बघीतलेले मला पुन्हा बघायला लागेल काम जे झाले आहे ते जागेवर असणार. साहेब काम झाली आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

हयाच्यावरुन स्पष्ट होते की जागेवर कोणत्याही प्रकारचे काम नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब, विषय काय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

एन.एच.स्कूल समोरचे सन्मा. अनिल सावंतजी हा कांचन पूजारीचा वॉर्ड आहे.

**दिपक खांबित :-**

हे काम झालेले नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्याचे आपण ग्रिल मंजूर केलेले मग काम का झाले नाही. ते सांगा?

**दिपक खांबित :-**

जागेचा वाद आहे. कोर्टामध्ये केस आहे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब ५०% आरक्षण आलेले त्या खाली काम करत होतो. ५०% तुम्हाला कोठे अडचण होती.

**दिपक खांबित :-**

साहेब ते न्यायप्रविष्ठ आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तीन एके न्यायप्रविष्ठ आहे का?

**दिपक खांबित :-**

आहे ना. जागेवर काम नाही.

**नरेंद्र मेहता :-**

प्रश्नच नाही ५०% महापालिकेच्या ताब्यात आहे. आरक्षण मागवा आणि बघा. ५०% महापालिकेच्या ताब्यात आहे म्हणून तो विषय घेतलेला आहे. दिशाभूल करु नका.

**दिपक खांबित :-**

आम्ही दिशाभूल कशाला करु. जागेचा वाद आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आपण तलावाजवळ ग्राऊंड केले त्याला आपण बादशहा नाव दिले त्याठिकाणी मला वाटत नाही ग्रील वैगेरे झाले असेल. तुम्ही तिकडे असता तिकडे ग्रील वैगेरे झाले आहे का?

**दिपक खांबित :-**

साहेब, विषय दोन आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

हे उत्तर दया. तिकडे काय अडचण आहे सांगा.

**दिपक खांबित :-**

कूठे.

**नरेंद्र मेहता :-**

नवघर रोडला तलावाच्या बाजूला पान टेकडी स्मशाना समोर आपण गार्डनचे उद्घाटन केले त्याठिकाणी ग्रील लागली का?

**दिपक खांबित :-**

साहेब, तिकडे प्रश्न असा आहे की, शाळा आरक्षण आणि उद्यान आरक्षण एकत्र आहे. जर ते गार्डन बांधले असते ना तर ती मुल जी खेळतात त्यांना ग्राऊंड मिळाले नसते.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही सभागृहाची मान्यता कशाली घेतली. त्यावेळी तुम्हाला समजले नव्हते का?

**दिपक खांबित :-**

साहेब, तुम्ही ठरवा.

**नरेंद्र मेहता :-**

चार करोड रुपये गेले कूठे?

**दिपक खांबित :-**

मी चार करोडचा हिशोब देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मला कसला हिशोब देता जागेवर कामे झालीच नाहीत.

**दिपक खांबित :-**

असे तुमचे म्हणणे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचे म्हणणे आहे का एका बाजूला तुम्ही म्हणता ग्रील नाही आहे. केल नाही आणि एका बाजूला म्हणता ग्रील आहे.

**दिपक खांबित :-**

प्रत्यक्षात जी कामे झाली त्याची लेखी माहिती सभागृहासमोर देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, पानटेकडी समोर जे गार्डन आहे. त्यामध्ये खांबित साहेबाचे म्हणणे आहे. स्कुल आरक्षण एकत्र करायचे असेल तरी तीन साईडला बाउन्ड्री बांधायला हरकत नाही. ज्या साईडला स्कूल आहे त्या साईडला हरकत येईल. तीन साईड बांधायला काय हरकत येणार होती. हयानी पहिल्यापासून मानसिकता घेतलेली आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, हया विषयावर आम्ही ते काम महापालिकेमार्फत करायचे जेव्हा डिसीजन झाले आयुक्त स्तरावर की ही कामे खाजगी विकासकामार्फत करायची.

**नरेंद्र मेहता :-**

मी २००९ ची गोष्ट बोलतो. तुम्ही २०११ चे उदा. का देता.

**दिपक खांबित :-**

त्यानंतर असे डिसीजन झाले की, ही कामे खाजगी विकासकामार्फत करायची म्हणून महानगरपालिकेने पूढे कामे करण्याचा प्रयत्न केला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्या गार्डनमध्ये किती खर्च केला आहे तो दाखवा.

**दिपक खांबित :-**

तिथे काहीच खर्च केला नाही. कूठल्या

**नरेंद्र मेहता :-**

तलावाच्या बाजूला जे आरक्षण आहे. तुम्हाला लक्षवेधी दिल्यावर तुम्हाला तयारी करायला वाटत नाही .

**दिपक खांबित :-**

साहेब, माहिती घेऊन देतो.

**नरेंद्र मेहता :-**

आता सभागृहाला माहिती दया.

**दिपक खांबित :-**

माझ्याकडे आता माहिती नाही.

**नरेंद्र मेहता :-**

माझ्याकडे माहिती आहे म्हणूनच सांगतो तुम्ही माहिती दया. खर्च केले आहे ते कामच जागेवर नाही.

**दिपक खांबित :-**

तुम्ही सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

मी तर स्पष्ट आरोप करतो. तुम्ही खर्च केला पण काम केलेच नाही.

**दिपक खांबित :-**

मी सुध्दा सभागृहाच्या समोर सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

सांगाना माहिती. जागेवर ग्रिल नाही, कूंपण भिंत नाही हे तुम्ही कबूल करता.

**दिपक खांबित :-**

प्रत्येक आरक्षणमध्ये किती काम झाले किती बिल दिले त्याचा मी तुम्हाला अहवाल देतो.

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाचा वेळ फूकटचा वाटतो का, की लक्षवेधी असताना तुम्ही माहिती घेऊन उपस्थित राहत नाही.

**दिपक खांबित :-**

साहेब तुमचा तो प्रश्नच नाही. काही ठिकाणी काम झाले नाही हे तुम्ही आता बोललात हयाच्यामध्ये प्रश्न नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तुमची पूर्ण तयारी असली पाहिजे तुम्हाला एक-एक शब्द लिहून दयायचा का? खांबित साहेब, तुम्ही जे आरक्षण बोलतात त्याच्यात किती खर्च झाला ते सांगा.

**दिपक खांबित :-**

माहिती घेऊन सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, लक्षवेधीला आपण वेळ दिलेला आहे. सभागृहाचा आपण वेळ घेतलेला आहे. सचिव साहेबांनी त्यांना प्रत दिली होती. त्यांनी तयारी करुन यायला नको? आम्ही लक्षवेधी परत घ्यायची का? पैसे गेले पण गार्डन विकसीत झालीच नाहीत.

**दिपक खांबित :-**

साहेब, विषय दोन आहेत. गार्डन डेव्हलप करायची, तुम्ही लक्षवेधी कूठल्या विषयावर आणली आणि तुम्ही विषय कोणता घेता. लक्षवेधी आहे की गार्डन डेव्हलप का होत नाही. त्याचे उत्तर दिलेले आहे. खर्चाचे विचारता त्याचे मी उत्तर देतो.

**नरेंद्र मेहता :-**

१६ गार्डन व प्ले ग्राऊंडचे उद्‌घाटन करण्यात आले. मोठया प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे. सदर माती भराव करण्यात आले होते. त्याच्यातले २-३ गार्डन विकसीत झाले आहेत. विषय तोच आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, २२१ नंबर बगिचा विकसीत झालेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

जे विचारले ते सांगा. ११६ काय आत बोलले.

**दिपक खांबित :-**

साहेब, हयाची माहिती देतो.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, खांबित साहेबाकडे माहिती नाहीच आहे.

**दिपक खांबित :-**

मी तुम्हाला तासाभरात माहिती देतो. मी सभागृह चालू असताना माहिती देतो.

**नरेंद्र मेहता :-**

वारंवार सभागृहाचा एकाच विषयावर वेळ वाया घालवायचा नाही. आपल्याला एवढी विनंती राहील की पूढच्या सभेला ह्या विषयावर खांबित साहेबांनी १० मिनिटात माहिती दयावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, ह्यांची विनंती बरोबर आहे. ह्यांचा जो काय वेळ घ्यायचा तो आजच घ्या आणि प्रत्येक वेळेला चार दिवसाचा गॅप दयायचा त्याच्या मागचा उद्देश काय? सभागृहाच्या कदाचीत लक्षात येत असेल नसेल, पत्रकाराच्या आणि जे बसले आहेत त्यांच्या लक्षात येत असेल. मधला वेळ कशासाठी मागता जाऊ दया. १५ मिनिट अर्धा तास अजून जाऊ दया पण आजच घ्या.

**नरेंद्र मेहता :-**

जाऊ दया आम्हाला काय हरकत नाही.

**मदन सिंह :-**

मा. महापौर साहेब, अपने कार्यकारी अभियंता खांबित साहेब आहेत. इनको महासभा और स्टॅन्डिंग का मतलब नहीं समझता। महासभा और स्टॅन्डिंग इनके लिए कूछ नहीं है। छत्रपती शिवाजीरोड पे जो ग्रिल लगी थी। वो ग्रिल कहाँ गई इनको पूछो कहाँ पे रखा है। महासभा में जो ठराव होते है, उनको खांबित साहेब मानते ही नहीं है। महासभा मेो चौपाटी पे कार्यक्रम करने का ठराव मंजुर करके दिया लेकिन अभी तक खांबित साहब को तकलीफ है। इसलिए खांबित साहब कार्यक्रम को परवानगी नहीं देते है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, सर्व्हे नं. १११ मध्ये गार्डन विकसीत होते. त्याठिकाणी सिव्हीलचे पूर्ण काम झालेले आहे. त्या गार्डन बद्दल सर्व ठराव मंजुर होऊन ते सगळे टेंडर आणि कॉन्ट्रॅक्ट झालेले आहेत सिव्हीलचे काम पूर्ण झालेले आहे. माती टाकण्यासाठी इजिनियरना १०० वेळा सांगायला लागते. ही परिस्थिती इंजिनियरची आहे. तिथे असे आहे की जसे गार्डन आपण आपल्यासाठी बनतवतो. इंजिनियर किंवा अधिकारी लोकांचे काही देणे घेणे नाही का? त्यांचे कर्तव्य नाही का?

**:-**

मा. महापौर साहेब, ........... मी राऊत साहेबांना त्यादिवशी फोन करुन सांगितले की माझ्या वॉर्डमध्ये गार्डनचे काम पूर्ण झालेले आहे. माती टाका म्हणून तर टाकतो टाकतो एवढच सांगतात.

**दिनेश नलावडे :-**

सिव्हिलचे काम झालेले आहे. इंजिनियर येत नाही. इलेक्ट्रीकवाले येत नाही. खांबित साहेब, माती टाकण्यासाठी आपल्याला दोन-दोन महिने लागतात का? कूठले अधिकारी ह्याच्यामध्ये कामे करणार.

**मदन सिंह :-**

मा. महापौर साहेब, अपने अधिकारी महासभा को नही मानते तो महासभा लगाने की जरुरत क्या है। स्टॅन्डिंग कमिटी में जो भी आदेश दिया है। एक नगरसेवक क वॉर्ड में दुसरा नगरसेवक काम नहीं करेगा तो खांबित साहेब बोलते है की हमको स्टॅन्डिंग और महासभा से कुछ लेना देना नहीं है। जिस अधिकारी को स्टॅन्डिंग और महासभा से मतलब नहीं है उन अधिकारी को महासभा से बाहर निकालो।

**दिनेश नलावडे :-**

राऊत साहेब, जे गार्डन विकसीत करायला घेतले आहे. .........

**दिपक खांबित :-**

सिव्हिलचे काम झालेले आहे.

**दिनेश नलावडे :-**

सिव्हीलचे काम केव्हा झाले आहे. इलेक्ट्रीकचे काम बाकी आहे. इंजिनियर लोकांना फोन करतो तर आज-उदया करतात ह्या गोष्टीला तीन महिने झाले.

**दिपक खांबित :-**

इलेक्ट्रीकचे जे काम आहे त्या इस्टीमेंट तयार झालेले आहे. उद्यानमध्ये जी माती टाकायची ...... करायचे सगळे काम प्रोसेसमध्ये आहे. आणि १११ नंबरच्या प्रकरणामध्ये तुमचा विषय आहे.

**दिनेश नलावडे :-**

विषय आहे पण त्या कामाला किती महिने झाले. इलेक्ट्रीक इंजिनियर बोलवायला आम्हाला दोन महिने गेले.

**दिपक खांबित :-**

इस्टिमेंट तयार आहे. मी स्वतः मॅडमबरोबर गेलो होतो.

**दिनेश नलावडे :-**

हया गोष्टीला किती वेळ लागतो.

**दिपक खांबित :-**

२० दिवसापूर्वी मी स्वतः मॅडमबरोबर गेलो होतो काम बघीतले इलेक्ट्रीकचे इस्टिमेट सगळ केल त्याची मंजुरी येऊन काम सुरु होईल.

**दिनेश नलावडे :-**

साहेब आपण त्या ग्राऊंडची बाउन्ड्री मारली ती आज आहे का? सगळया जाळया तिकडे चोरी झाल्या ज्या गार्डनचे काम चालू आहे त्याची बाउन्ड्री आहे का बघा.

**दिपक खांबित :-**

केली ना बाऊन्ड्री.

**दिनेश नलावडे :-**

झाले ना नुकसान. सगळया जाळया निघून गेल्या आहेत.

**दिपक खांबित :-**

कोणत्या गार्डनला.

**दिनेश नलावडे :-**

आता जे १११ च्या गार्डनचे काम चालू आहे त्याची बाउन्ड्री आहे का बघा.

**दिपक खांबित :-**

साहेब, पूर्ण बाउन्ड्री आहे.

**दिनेश नलावडे :-**

तुम्ही बघून घ्या. तुम्हाला ते काम पुन्हा करुन दयायला लागेल. हा खर्च महानगरपालिकेचा आहे.

**दिपक खांबित :-**

तिकडे पाठीमागे एस.टी.पी. चे काम चालू आहे.

**दिनेश नलावडे :-**

साहेब, आम्हाला त्याची कल्पना आहे. दुसरे त्या बिल्डींगच्या तिकडून जाळया निघून गेल्या आहेत.

**दिपक खांबित :-**

साहेब, सगळी कामे प्रस्तावित आहेत.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, जी गार्डन विकसीत करण्याची कामे चालू आहेत ती लवकरात लवकर करुन घ्या. इलेक्ट्रिकची माणसे येत नाही. माती भरावासाठी एक महिना लागतो. अजून तीन वर्ष त्या गार्डनचे काम चालू होणार नाही.

**स्नेहा पांडे :-**

खांबित साहेब, गार्डन डेव्हलप करने के लिए पैसे की जरुरत है लेकीन प्ले ग्राउन्डकी कूंपण भिंत बांधके हो गया तो वो शुरु क्यों नही हो रहा है। खांबित साहब, प्ले ग्राउन्ड शुरु करने में क्या तकलीफ है।

**मदन सिंह :-**

महासभा ने चौपाटी कार्यक्रम करने की मंजुरी दिया तो आपको क्या तकलीफ है। आप परमिशन नही लेते हो।

**दिपक खांबित :-**

परमिशन दे दिया।

**मदन सिंह :-**

कहाँ देते हो। आप कहते हो कमिशनर को मिलो, इनको मिलो।

**दिपक खांबित :-**

बरोबर आहे. परमिशन का अधिकार मुझे नहीं था। आयुक्त साहबने मुझे दिन पहले पावर डेलिकेट किया है। मेरे पास जितने ॲप्लीकेशन आए, उनको परमिशन दिया है।

**मदन सिंह :-**

एक-एक संस्था को दो-दो बार दौडना पडता है। पहले प्रभाग कार्यालय से मंजुरी मिलती थी।

**दिपक खांबित :-**

कौन सा पेन्डिंग है बोलो। मेरे पावर में जितने भी ॲप्लिकेशन आए है उनको प्रतिदिन १००० रुपये ५००० रुपये डिपोझिट लेके मैंने परमिशन दिया।

**मदन सिंह :-**

१००० रुपये का मंजुरी दिया है।

**दिपक खांबित :-**

तो १००० लिया है।

**मदन सिंह :-**

मैने भागवत के लिए मैंने आपको दिया था।

**दिपक खांबित :-**

मेरे पास परमिशन की पावर नही थी।

**मदन सिंह :-**

इसके लिए अपको आगे से तकलीफ नही होगी। स्टॅन्डिंग में एक ठराव किया था। एक नगरसेवक के वॉर्ड में दुसरे नगरसेवक के काम का मंजुरी नही दिया जाएगा। तो खांबित साहब मंजुरी नही दिया जाएगा। तो खांबित साहब मंजुरी देकर आपस में राजकारण कर रहे है। मैंने निधी प्रस्तावित किया उसको मंजुरी नहीं दिया और दुसरे नगरसेवक का निधी मेरे वॉर्ड में मंजुरी दिया।

**दिपक खांबित :-**

स्टॅन्डिंग कमिटीने ठराव केला नव्हता. स्टॅन्डिंग कमिटीची सुचना होती की एखादया नगरसेवकांच्या वॉर्डमध्ये काम नसेल आणि त्याला दुसऱ्या नगरसेवकाच्या वॉर्डमध्ये काम करायचे असेल तर त्यांनी नगरसेवकाला विचाराचे अशी सुचना होती आता आपल्या महानगरपालिकेमध्ये पाच टॉप नगरसेवक आहेत आज ते कोणाच्या वॉर्डमध्ये काम करणारच ना?

**मदन सिंह :-**

माझ्याच वॉर्डात करायचे का माझे ऑब्जेक्शन असेल तर?

(सभागृहात गोंधळ)

**मदन सिंह :-**

आमच्या वॉर्डात करायचे नाही.

**शानु गोहिल :-**

सन्मा. नगरसेवक मदन सिंह आप भूल गए है की चौपाटी पे आपके ही नगरसेवक ने .....

(सभागृहात गोंधळ)

**मदन सिंह :-**

चौपाटी सार्वजनिक जगह है। चौपाटी वॉर्ड नहीं है।

**दिपक खांबित :-**

स्विकृत नगरसेवक कही भी काम कर सकते है।

**शानु गोहिल :-**

चौपाटी वॉर्ड नहीं है एसे नगरसेवक बोल रहे है।

**मदन सिंह :-**

चौपाटी सार्वजनिक जगह है।

**शानु गोहिल :-**

खूद के वॉर्ड के झोपडे बनाए।

(सभागृहात गोंधळ)

**कल्पना म्हात्रे :-**

मॅडमना बोलण्याची शिस्त शिकवा. चौपाटी कोणाच्या नावावर आहे आणि सात बारा कोणाच्या नावावर आहे ते ह्यांना विचारा.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब, लक्षवेधीचे विषयांतर झालेले आहे.

**मा. महापौर :-**

ही पांगेनी सुरुवात केलेली आहे. आपण इतर ठिकाणी कामे केली ना? तुम्ही सुरुवात केलेली आहे.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, ते स्विकृत नगरसेवक आहेत त्याच्यासाठी वॉर्ड नाही.

**मा. महापौर :-**

सर्वांना एकच कायदा आहे.

**मदन सिंह :-**

खांबित साहब, वह काम रद्द होगा की नहीं वो काम का मैंने पहले लेटर दिया था मेरा निधी बाकी है। खांबित साहब उसका उत्तर दिजीए।

**मा. महापौर :-**

शिवार गार्डन के आगे काम चालू किया।

**मदन सिंह :-**

वह सार्वजनिक काम नही है। चौपाटी का निर्माण हम लोगो ने किया है।

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. नरेंद्र मेहतानी जो प्रश्न विचारला आहे तो न्यायप्रविष्ठ आहे का?

**दिपक खांबित :-**

१७८ मध्ये न्यायप्रविष्ठ बाब आहे.

**जुबेर इनामदार :-**

राऊत साहेबांना विचारा परिस्थिती काय आहे.

**दिपक खांबित :-**

ह्या विषयावर माहिती देतो.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०६ टाईप करणे.

**प्रभात पाटील :-**

मला एक विचारायचे आहे की, प्रोसेडिंग मंजुर झाले म्हणजे त्याच्यातले सगळे ठराव मंजुर झाले ना? बरोबर आहे. ह्या प्रोसेडिंगमध्ये जे ठराव व विषय आले असतील ते सगळे मंजुर ना? (प्रकरण क्र. १०६ ठराव टाईप करणे.) माझा असा प्रश्न होता की गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये नगरसेवकाच्या दौऱ्यासाठी तरतुद होती ती मागच्या इतिवृत्तांतामध्ये तशी नोंद केली होती. तसा ठराव मांडला आहे तो आता मंजुर करा. फार कमी दिवस राहीले आहेत. सर्वांच्या वतीने मी बोलते.

**जुबेर इनामदार :-**

सचिव अनुपालन अहवाल आला नाही.

**:-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रभात पाटील :-**

आज कमिशनर नाहीत. राऊत साहेब तुम्ही कमिशनर आहात. हा सभागृहाचा ठराव आहे. त्यांच्या पुढे ठेवला आणि त्यांनी नामंजुर केला असे होता कामा नये.

**नरेंद्र मेहता :-**

प्रशासनाने क्लियर करावे.

**भगवती शर्मा :-**

ताईने नगरसेवक दौरे के बारे में जो बोला उसपे ठराव हूआ है। आपने उसको मान्यता दिया। सन्मा. आयुक्त बैठे है इस ठराव को मान्यता देते है की नहीं देते है उनसे पूछा जाये और वह जवाब प्रोसेडिंग में लिया जाये।

**सुधीर राऊत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, या संदर्भात आर्थिक तरतुद आहे. त्यामुळे माझा किंवा मा. आयुक्तांचा आक्षेप असण्याचा प्रश्न नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, प्रश्नोत्तराच्या तासाला प्रशासनाने एका प्रश्नाला उत्तर दिले आहे. ५४ नंबरचा प्रश्न आहे. ड्रामा थिएटर विकसीत करणेबाबत. प्रशासनाने जे उत्तर दिले ते सन्मा. नगरसेविकेला मान्य झाले. त्यांनी असे उत्तर दिलेले आहे. सदरच्या मंजुर विकास योजनेनुसार आरक्षण क्रमांक २६३ हे आरक्षण टाऊन हॉल व ड्रामा थिएटरसाठी आरक्षित असून सदरचे आरक्षण विकसीत करणेकामी अंतीम धोरण निश्चित करण्यासाठीच प्रस्ताव मा. महासभेने पुढे सादर करण्यात आला होता. तथापी मा. महासेभे पुढे सादर करण्यात आला होता. तथापी मा. महासभेने आरक्षण विकसीत करण्यासाठी अंतीम धोरण निश्चित करण्याची आवश्यकता नाही असा ठराव मंजुर केला.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, हे जे उत्तर दिले आहे त्याचप्रमाणेच ठराव मंजुर झालेला आहे.

**अनिल सावंत :-**

म्हणजे महासभेने असा ठराव मंजुर केला की आवश्यकता नाही.

**सत्यवान धनेगावे :-**

हो.

**अनिल सावंत :-**

सभागृहाला शहरामध्ये नाट्यगृह असावे असे वाटत नाही. सभागृहाला हे धोरण मान्य आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मागच्या वेळेला जेव्हा ठराव केलेला आहे. विषय संपलेला आहे.

**अनिल सावंत :-**

प्रश्न संपला कसा? प्रशासनाने उत्तर काय दिले?

**नरेंद्र मेहता :-**

त्यामध्ये आता हे ठरले आहे की, त्याला परत जे धोरण ठरवायचे होते. १५००-१२०० जे काही त्याची आवश्यकता नाही.

**अनिल सावंत :-**

अंतिम धोरण पहिले ठरवलेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही जे ठरवले आहे ते आम्ही कायम ठेवले आहे.

**अनिल सावंत :-**

त्याचा इथे उल्लेख पाहिजे ना. इथे म्हणतात अंतिम धोरण ठरवण्याची आवश्यकता नाही असे सभागृहाला वाटते.

**नरेंद्र मेहता :-**

पहिला जो ठराव आहे तो कायम आहे.

**अनिल सावंत :-**

शहरामध्ये नाट्यगृह नको हा तुमचा ठराव झालेला आहे. तुमचे बरोबर आहे. सभागृहाला उत्तर देते वेळी सभागृहाने अंतिम मंजुरी दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य अनिल सावंतनी जो विषय उपस्थित केला आहे. सभागृहाने हा विषय मंजुर केलेला आहे. जो ठराव झाला त्या अनुषंगाने सहा. नगररचनाकार ह्यांनी उत्तर दिलेले आहे. जो ठराव झाला त्याला अनुसरुन उत्तर दिलेले आहे. पुन्हा-पुन्हा सभागृहाचा वेळ कशाला घेता.

**अनिल सावंत :-**

ठराव झाला म्हणजे सभागृहाला अंतिम धोरण मंजुर करायची आवश्यकता नाही. तुम्ही सभागृहाची दिशाभूल करता.

**आसिफ शेख :-**

तुम्हाला जर ठरावाच्या विरोधात जायचे असेल .........

**अनिल सावंत :-**

जायचे न जायचे तो वेगळा विषय पण तुम्ही सभागृहाची दिशाभूल करु नका.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर तुमचे आहेत तुम्ही फेर प्रस्ताव आणू शकता. प्रशासनाने योग्य उत्तर दिलेले आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

सन्मा. सदस्यानी विचारलेला प्रश्न महासभेत झालेला ठराव आणि त्या अनुषंगाने दिलेले उत्तर बरोबर आहे.

**एस.ए.खान :-**

बरोबर नाही. दिशाभूल केली आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

दिशाभूल करण्याचा प्रश्नच नाही. ठरावाच्या विरोधात मी उत्तर दिलेले नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, २०० एम.एल.डी. पाण्याची योजना सुर्या प्रकल्प ते आपल्या पालिकेने मंजुर करुन टेंडरिंग झालेले आहे त्याच्या कामाची परिस्थिती काय आहे. वॉटर डिपार्टमेन्ट आता उत्तर देत असेल किंवा दोन-तीन विषय झाल्यानंतर उत्तर दिले तरी चालेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, विषय चांगला आहे. ह्याच्यावर दोनदा लक्षवेधी झालेली होती. दोनदा लक्षवेधी होऊन सुध्दा त्याच्यावर काय निर्णय झाला ते सभागृहाला कधी पटलेले नाही. आत सन्मा. नगरसेवकांना पुन्हा आठवण आलेली आहे. प्रत्येक वेळेला तुम्ही सांगता वेळ घालवता आता तुम्ही का वेळ घालवता, आता विषय काय आहे.

**अनिल सावंत :-**

विषयाला सुरुवात झालेली नाही. मी मा. महापौरांची परवानगी घेतो.

**भगवती शर्मा :-**

विषयपत्रिकेवर विषय नसताना तुम्ही कसे घेता सगळयांना चर्चा करायला दया.

**अनिल सावंत :-**

हा महत्वाचा विषय अशासाठी आहे की माझ्या जवळ एक पत्र आहे. हे जे पाणी रिझर्व्ह केले त्यासाठी पूर्नस्थापनेचा २४ करोड खर्च होता. ते पैसे महापालिकेने भरायचे होते. मध्यंतरी जलसंपदा मंत्र्यानी ते पैसे माफ केले असे निवेदन तत्कालीन आयुक्तांनी महासभेमध्ये दिले होते. काही सदस्यांनी दिले होती ...... त्याची नेमकी आजच्या डेटला काय परिस्थिती आहे. अदरव्हाईज तो पाण्याचा कोटा कॅन्सल होणार असे पत्र माझ्याकडे आहे. म्हणून मी हा प्रश्न सभागृहापूढे ठेवतो.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

विषयपत्रिकेवर विषय नसताना तुम्ही कसे पॉईन्ट घेता.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौरांचा अधिकार आहे. हा शहराचा ज्वलंत विषय आहे. आम्हालाच काळजी आहे त्याचा निकालही आम्हीच लावू.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा महत्वाचा विषय आहे. त्यासाठी एक खास सभा बोलवा आणि विषय पटलावर विषय घ्या.

**प्रभात पाटील :-**

हा विषय महत्वाचा का आहे ते ऐकून तर घ्या.

**शरद पाटील :-**

ताई ह्या गोष्टी जेव्हा आम्ही सांगत होतो तेव्हा कोण ऐकत नव्हते.

**एस.ए.खान :-**

मा. महापौरांनी परवानगी दिलेली आहे. पत्र वाचा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, सभागृहाचे कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. जे विषय विषयपत्रिकेवर आहेत त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

नियमाप्रमाणे मा. महापौरांची परवानगी घेतलेली आहे.

**आसिफ शेख :-**

तुम्हाला एवढी शहराची काळजी आहे. तर मग विशेष सभा लावा.

**जयंत पाटील :-**

ही मिटींग कोणत्या मंत्र्याकडे झाली होती.

**अनिल सावंत :-**

हे पत्र आहे मिटींग नाहीत्र

**जयंत पाटील :-**

हे पत्र वाचून दाखवता त्या मिटींगला तुम्ही आले होते का? त्यादिवशी सभा तहकुब झाली. त्या मिटींगला जाण्यासाठी सन्मा. अजित दादाकडे ही सभा मा. महापौरांनी तहकुब केली.

**अनिल सावंत :-**

कोणती.

**जयंत पाटील :-**

१८ जानेवारी २०११ ची मिटींग होती. तुम्ही मिटींगला आलेच नाहीत.

**अनिल सावंत :-**

आमचे आमदार मिटींगला होते.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर का आले नाहीत?

**अनिल सावंत :-**

मा. महापौरांचा विषय असेल ना. आमचे आमदार होते तुम्हाला जायची गरज नाही.

**जयंत पाटील :-**

तुमचे महापौर का नव्हते सांगा.

(सभागृहात गोंधळ)

**जयंत पाटील :-**

पाण्याचे आणि अतिशय महत्वाचे विषय होते त्या मिटींगला महापौर का आले नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब तुम्ही बसलेले असताना उपमहापौर का बोलतात.

**जयंत पाटील :-**

प्रत्येकाला फोन आले होते. मिटींगला जायचे म्हणून सभा तहकूब केली.

**एस.ए.खान :-**

तुम्ही बोलू नका. मा. महापौर बसलेले आहेत.

**भगवती शर्मा :-**

सगळयांना बोलण्याचा अधिकार आहे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. अजित दादानी २४ करोड ८६ लाख अधिकाऱ्यांना बोलवून तिथल्या तिथे रद्द करायला सांगितले. तुम्हाला तुमच्या नेत्यांनी सांगितले की मिटींगला जाऊ नका.

**अनिल सावंत :-**

आमच्या नेत्यांनी काय करावे तो आमचा प्रश्न आहे.

**जयंत पाटील :-**

शहराचा एवढा महत्वाचा विषय असताना तुम्ही मिटींगला येत नाही.

**अनिल सावंत :-**

आमचे आमदार मिटींगला गेले होते.

**मा. महापौर :-**

तुमच्या माहितीसाठी सांगतो मला ह्याठिकाणी पत्र आले नव्हते. मला फक्त फोनवर सांगितले होते. इतर लोकांची नावे होती आणि मा. महापौरांचे नाव नव्हते.

**जयंत पाटील :-**

सभा तहकुब का केली.

**मा. महापौर :-**

आपल्या लोकांनी सांगितले म्हणून ...

**जयंत पाटील :-**

मेजोरिटीने सभा चालू करायची होती.

**जुबेर इनामदार :-**

विषय शहराच्या पाण्याचा होता म्हणून सभा तहकूब केली.

**लक्ष्मण जंगम :-**

त्याची परिस्थिती काय आहे ते अधिकाऱ्याने एका मिनिटात सांगितले असते.

**भगवती शर्मा :-**

साहेब, बरेच विषय आहेत.

**अनिल सावंत :-**

विषय असू दया. हा विषय महत्वाचा आहे.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही मा. महापौरांना सांगून रितसर विषय घ्या.

**अनिल सावंत :-**

मा. महापौरांची परवानगी घेतली आहे. सभाशास्त्र शिकून घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

सभा शास्त्राप्रमाणे सभा चालली पाहिजे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आपल्याला सभा कामकाज माहित नसेल तर सन्मा. सचिव साहेब इथे आहेत त्यांना विचारा कारण पत्रिकेवर विषय नसेल तर चर्चा करता येत नाही.

**अनिल सावंत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने चर्चा करता येते.

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या अधिकाराने चर्चा करता येते.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, पक्षपात करतात.

**भगवती शर्मा :-**

आम्हाला चर्चा करु देत नाही.

**मिलन पाटील :-**

विषय संपले की आपण चर्चा करु.

**अनिल सावंत :-**

जलसंपदा विभागाचे ... पत्र आहे.

**मिलन पाटील :-**

विषयामध्ये घेऊ नको.

**अनिल सावंत :-**

विषय बदल होणार नाही. परवानगी दिलेली आहे.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, पाण्यासंदर्भात विशेष सभा बोलवा, आमचे समर्थन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, विषयपत्रिकेवर विषय आहे मलनिसःरण तो ह्याच्याशी निगडीत आहे.

**अनिल सावंत :-**

सुर्या प्रकल्पामध्ये महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनेसाठी वार्षिक ३६.५ दशलक्ष जलमिटर पाणी आरक्षणास मान्यता देताना महापालिकेकडून पुर्नस्थापनेचा २४८६ लक्ष घेण्याबाबत जलसंपदा विभागाने घातलेली अट रद्द करणेबाबत आपले पत्र क्र. दिनांक .......... उपरोक्त विषयाधीन प्रकरणी सिंचन पुर्नःस्थापनेचा खर्च माफ करण्याविषयीची विनंती मा. जलसंपदा कृष्णा खोरे ...... यांचे दिनांक ११/१०/२०११ च्या पत्राने ह्यापूर्वी अमान्य करण्यात आली आहे. तथापी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार मिरा-भाईंदर महानगरपालिका ह्यांचे १४/०९/२०११ च्या पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की महानगरपालिकेने विनंती केल्यास खालील अटीच्या अधीन राहून सिंचन पुर्नःस्थापनेची रक्कम हफ्त्या हफ्त्याने भरण्यास महानगरपालिकेस परवानगी देण्यात येऊ शकेल सदरहू संस्था सिंचन पुर्नःस्थापनेचा खर्च बिगर सिंचन पाणी आरक्षण मंजुर केलेल्या दिनांकास अथवा ज्या दिवशी अशा ...... अर्ज केलेला असेल त्यादिवशी प्रचलित शासकीय व्याजाच्या दराने स्टेट बँक ऑफ इंडिया वरील दोन्ही पैकीचे अधिक व्याजदर असेल त्या व्याज दराने भरण्यास तयार असावे. सिंचन पुर्नस्थापनेचा खर्च जास्तीत जास्त पाच हफ्त्यामध्ये व दोन वर्षाच्या काळामध्ये भरण्याची तयारी असावी सदरहू संस्थेने सिंचन पुर्नस्थापनेच्या खर्चाच्या १० % इतका रकमेच्या बँक गॅरेन्टी देण्यास तयार असावे तसा करारनामा करण्यात तयार असावे वरील बाबीची पूर्तता गिर सिंचन पाणी वापर संस्थेने न केल्यास त्याची परवानगी आपोआप रद्द होईल. कृपया आपण महापौर मिरा-भाईंदर महानगरपालिका ह्यांच्याशी संपर्क साधून सदरच्या अटी मान्य कराव्या. हा एवढा महत्वाचा विषय आहे. म्हणजे २४ करोड ८६ लक्ष रुपये जे माफ केले ते महापालिकेला भरायचे आहेत. त्याविषयी पालिकेने काय केले आहे. ३१ जानेवारीचे पत्र आहे. २०० एम.एल.डी. पाण्याची आता सध्या जो प्रकल्प आहे त्याची काय परिस्थिती आहे. एवढीच माहिती पाहिजे.

**सुधीर राऊत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, संबधीत अभियंते ह्या मिटींगवरचे विषय झाल्यानंतर ही माहिती स्वतंत्रपणे देतील.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, त्यावेळी मी लक्षवेधी वाचण्यासाठी फक्त दोन मिनिटे मागीतली तर तुम्ही दहा-दहा सेक्यूरीटी मागवले. आज महत्वाचा विषय आहे. त्यादिवशी महत्वाचा विषय नव्हता का?

**प्रमोद सावंत :-**

मा. महापौर साहेब, आपण जो इतिवृत्तांत मंजुर केला त्यामध्ये ११/११/११ च्या सभेचा इतिवृत्तांत आहे. त्यामध्ये माझी लक्षवेधी होती त्या लक्षवेधीवर मा. आयुक्तांना तुम्ही आदेश दिलेले की लक्षवेधीवर चौकशी करुन अहवाल सादर करावा तीन महिने झाले आतापर्यंत अहवाल सादर झाला का? त्याच्यात इतिवृत्तांत मंजुर झाला. अहवाल सादर झाली की नाही झाला? चौकशी झाली की नाही झाली?

**सुधीर राऊत :-**

चौकशी सुरु आहे. चौकशी झाल्यावर आपल्याला अहवाल देण्यात येईल.

**प्रमोद सामंत :-**

मुदत सांगा. तीन महिने झाले.

**सुधीर राऊत :-**

अजून १५ दिवस लागतील.

**प्रमोद सावंत :-**

पुढच्या सभेला मिळेल. धन्यवाद.

प्रकरण क्र. :- १०६

ठराव क्र. :-

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०७ टाईप करणे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनानी जो विषय आणलेला आहे त्याचा गोषवारा स्पष्ट नाही. त्यासंबंधी प्रशासनानी स्पष्टीकरण दयावे. कनेक्शन कसे देणार बिल्डींगपर्यंत कसे पोहोचवायचे. त्यांनी ह्याचे काय धोरण ठरवले आहे. प्रशासनाची भुमिका काय आहे. त्यांनी स्थायी समितीचा ठराव ह्याच्यामध्ये जोडून पाठवलेला आहे. ते कसे करावे लागेल. त्याच्यात येणाऱ्या अडीअडचणी कशा दूर कराव्या लागतील ते काहीच दिलेले नाही. त्या विभागीय अधिकाऱ्याला माझी विनंती राहील त्यानी त्याचे स्पष्टीकरण दयावे. दोन ओळीचा गोषवारा दिलेला आहे तो कसा मान्य करायचा.

**एस.ए.खान :-**

मा. सदस्य बोलतात त्याचा खुलासा करायला सांगा.

**सुरेश वाकोडे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, हा सिवरेज प्रॉपर्टी कनेक्शनचा विषय आहे. आपल्या शहरामध्ये सिवरेजचे जे काम चालू आहे. त्यामध्ये दोन झोनचे काम आपण एप्रिलपर्यंत पूर्ण करतो. पण जो आपण हे प्रॉप्रर्टी कनेक्शन करत नाही तोपर्यंत सिव्हरेजच्या प्लॅनमध्ये येऊ शकणार नाही. त्यामुळे प्रॉपर्टीचे कनेक्शन केल्यामुळे तिथला जो सेफ्टीक टॅन्क आहे तो निघून जाणार आहे. पावसाळयात जे पाणी साचते ते ह्या सिव्हरेजमुळे आपोआप त्याच्यातून निघून जाणार आहे. आरोग्याच्य दृष्टीने पाण्याची जी लाईन गटारातून जाते काही ठिकाणी त्याच्यात दूशीत पाणी जाते तो प्रकार कमी होणार आहे. त्या दृष्टीने महत्वाचे आहे. प्रॉपर्टी कनेक्शन दयावे असे आम्ही ठरवले आणि तो गोषवारा स्टॅन्डिंग कमिटीपुढे दिला त्यानंतर दिनांक १/०२/१२ रोजी स्थायी समितीने जो मेन रोड आहे म्हणजे सिव्हरेजच्या चेंबर पासून ते गटारापर्यंत तेवढी लाईन महापालिकेने टाकून घ्यायची आणि त्याच्या पूढे म्हणजे गटाराच्या पूढची ते सेफ्टीक टॅन्क पर्यंत लाईन सोसायटीने टाकायची असा ह्याच्यामध्ये ठराव केलेला आहे. सर ह्याच्यात अजून एक महत्वाचे आहे, की ही जी लाईन आताच टाकून घेतली तर रस्ता तोडण्याचा खर्च नंतर होणार नाही. आपण नंतर रेट काय आहे ....... टाकून ठेवू ........जोडणे सोपे होणार आहे. पुन्हा पुन्हा खर्च होऊ नये म्हणून एकाच वेळेला लाईन क्रॉसिंग करुन ठेवतो.

**जुबेर इनामदार :-**

वाकोडे साहेब मला थोडक्यात सांगा. आता तुम्ही सांगितले काम होत आलेले आहे. त्याच्यात मलनिःसारण पाईप टाकायचे काम आहे ते कूठपर्यंत गेले आहे. टक्केवारीमध्ये सांगा.

**सुरेश वाकोडे :-**

जो झोन आहे ना पूनम सागर ते शांतीनगर त्याठिकाणी पाच एम.एल.डी. ......

**मिलन पाटील :-**

विषय वेगळा चाललेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

विषयाला अनुसरुन बोलतात. स्थायी समितीत प्रशासनाला उत्तर देऊ देत नाही. मा. महापौर साहेब तुम्ही तरी ती भुमिका घेऊ नका.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, वाकोडे साहेबांनी स्पष्टीकरण केले. सर्व सदस्याची आणि शहरवासियांची जी शंका आहे ती क्लियर होण्याची गरज आहे. मुख्य रोड पर्यंत लाईन टाकलेली आहे. त्याच्या आतमधला कॉम्पलेक्स हजार फूट आतमध्ये असेल तर त्याच्या बाबतीत आपण काय करणार? प्रत्येक कॉम्पलेक्समध्ये म्युन्सिपाल्टीने रस्ते, स्ट्रीट लाईट, पाण्याची पाईपलाईन, गटारे वैगेरे कामे केली नाहीत. काही कॉम्पलेक्स प्रायव्हेट आहेत त्यामध्ये म्युन्सिपाल्टीने कामे केली नाहीत. ती मुख्य रोडपासून १५००० फूटावर एक बिल्डींग आहे. तर अशा ठिकाणी आपण काय करणार? हा फार कॉस्टली खर्च आहे. ह्याच्यात त्यांनी १०००-१५००० फूटावर कनेक्शन करायचे म्हटले तर त्याच्यामध्ये येणारे चेंबर आणि हा एवढा मोठा खर्च सोसायटीला परवडेल का? म्हणून एक सरासरी पूर्ण शहरामध्ये हा प्रोजेक्ट होत असताना प्रत्येक बिल्डींगच्या अमूक फूटावर, अमूक मिटरवर ही लाईन आपल्या माध्यमातून

पान नं. ५१ ते ६१

लाईन टाकली जाईल असे होण्याची गरज आहे. हे जर असे झाले नाही तर प्रत्येक ठिकाणी अडचण निर्माण होईल. गोल्डन नेस्टचा मुख्य रोड पकडला आणि गोल्डन नेस्ट मुख्य रोड पासून आतमधल्या बिल्डींग पकडली तर साधारणतः २००० फुटावर काही बिल्डींग आहेत मग अशा ठिकाणी काय करायचे आहे. म्हणून सभागृहातल्या सर्व सदस्यांनी मा. महापौर, मा. उपायुक्त, अधिकाऱ्यांनी सर्वांनी बसून ह्याच्यावर चर्चा करायची गरज आहे. कोणाला अगदी जर रोडच्या बाजुला लागुन बिल्डींग असेल तर त्याचे ५०-२५ फुटावर कनेक्शन होणार असेल तर ते ठिक आहे. एक ५० ते १०० फुटावर अंडरग्राऊंड ड्रेनेजच्या माध्यमातून घेऊन जातो ती मुख्य लाईन तिथे जाईल आणि त्याच्या नंतर सोसायटीने स्वतःच्या खर्चाने करुन घ्यायचे. काही लोकांची आणि सदस्यांची शंका आहे की, हे कनेक्शन अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टीमवाले करुन देणार आहेत. मुंबई महानगरपालिकेत ज्या-ज्या ठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टम अस्तित्वात आहेत प्रत्येक ठिकाणची माहिती घेतली तर मुख्य ज्या ठिकाणापर्यंत आपली अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टम

गेली आहे तिथपासून बिल्डींगचे जे कनेक्शन होणार ते त्याच्या खर्चाने आणि जी काही अमाऊंट नक्की केली असेल ती पाण्याच्या पाईपलाईन सारखी अमुक डिपॉझिट घेतो अशा पध्दतीचे आणि जे प्लंबर लायसन होल्डर आहेत त्याची त्याच्या माध्यमातून म्हटले करायचे आहे परंतु, हा विषय नक्की होण्याची खरी गरज आहे. प्रत्येक बिल्डींगच्या अमुक फुटावर अंडरग्राऊंड ड्रेनेजची सिस्टम नाणे गरजेचे आहे. त्याच्यानंतरच आपल्याला ह्याची नेमकी रक्कम फिक्स करता येईल आणि त्या लोकांना जे टाईम दिलेले आहे त्या टाईममध्ये कनेक्शन करुन घेतील पण हे होणे गरजेचे आहे ह्या संदर्भात चर्चा व्हावी अशी माझी विनंती आहे.

**कल्पना म्हात्रे :-**

स्टँडींगमध्ये जो ठराव झाला तो सन्मा. जंगम साहेबांनी वाचला नाही कारण ठरावामध्ये आम्ही नमुद केलेले आहे आणि सोसायटीच्या गेटपर्यंत पालिका खर्च करेल आणि सोसायटीच्या आतमधला खर्च करेल आणि सोसायटीच्या आतमधला खर्च बिल्डींगचे रहिवासी करतील.

**जुबेर इनामदार :-**

सन्मा. सभापती महोदय, स्थायी समितीमध्ये ह्या विषयावर चर्चा करुन दिली असती तर हा विषय आज इथे आला नसता.

**कल्पना म्हात्रे :-**

तुम्ही ठराव वाचला असेल कारण ठरावात स्पष्ट नमुद केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही ठराव केला तो तुम्हाला मान्य आहे म्हणून केला विषय तिथेच राहीला.

(सभागृहात गोंधळ)

**शशिकांत भोईर :-**

तांत्रिकदृष्ट्या बाब बघितली पाहिजे आपण जो ठराव मांडलेला आहे त्याच्या विरोधात ठराव का मांडला त्याचाही ठराव देणे गरजेचे होते. कास्टींग वोट केल्यानंतर हा ठराव पारित होणार का?

**लक्ष्मण जंगम :-**

स्थायी समितीच्या सभापती बरोबर बोलल्या, ही आपली झाली प्रशासन काय करणार आहे योजना काय आहे त्याच्याकडुन समजून घेणे गरजेचे आहे आपण ठराव केला तो वेगळा विषय आहे.

**स्टिवन मेंडोंसा :-**

मा. महापौर साहेब, प्रशासनाने आपली बाजू मांडावी.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, ह्याच विषयावर खुलासा होणे गरजेचे आहे.

**विजया वैती :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते जिथे जिथे सिव्हरेजचे काम झाले आहे तेथे पॅचवर्क झालेले आहे का?

**मा. महापौर :-**

तो प्रश्न वेगळा आहे.

**विजया वैती :-**

गेल्या वेळीपण पॅचवर्क केले नाही तसेच ठेवले आणि मग तिकडे चिखल झाला त्याचा त्रास नगरसेवकांना सहन करावा लागतो त्यांना माहित आहे तिकडे हंगामा झाला आणि पब्लिक रस्त्यावर उतरले.

**मा. महापौर :-**

पाईप जोडणीचा विषय आहे तो झाल्यावर खड्डयाचा विषय घेऊ.

**विजया वैती :-**

जोपर्यंत उत्तर मिळत नाही मी बसणार नाही कारण जिथे पॅचवर्क झाले आहे ते होणे गरजेचे आहे.

**कल्पना ठाकुर :-**

हे रोड बनवणे गरजेचे आहे कारण माझ्याकडे सेंट जॉर्ज स्कुल आहे तिकडे रोड पूर्ण खाली आहे त्याचा मुलांना त्रास होतो.

**मा. महापौर :-**

प्रश्न घेतो तेव्हा लगेच घेतो.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, ह्याच्यात आपण सिव्हरेजची मेन लाईन टाकून घेतो. वॉटर सप्लायमध्ये आपण मेन लाईन टाकल्या नंतर इंटरनल छोट्या छोट्या लाईन आपण टाकत असतो जसे प्रभाग समितीच्या माध्यमातून नगरसेवक निधीतून किंवा मनपाच्या फंडातून लाईन टाकतात तसे सिव्हरेज मध्ये ही प्रोसिजर चालू राहणार आहे. इंटरनल लाईन होत जाणार आहेत. आता जिकडे मेन लाईन टाकली आहे तिथे कनेक्शनसाठी जिथे कनेक्शन दुर असतील आणि लाईन टाकणे जरुरी असते महापालिकेचा रस्ता असेल तर महापालिका टाकून घेईल. मेनरोडला आपण टाकणार आणि आतल्या लाईन आहेत त्या त्यांनी टाकायच्या आहेत.

**प्रमोद सामंत :-**

कुठपर्यंत टाकणार ते क्लीअर करा.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, मिरा भाईंदरमध्ये भरपूर कॉम्प्लेक्स आहेत. भरपुर ठिकाणी अडथळे आहेत. वाकोडे साहेब, तुम्ही ठेकेदाराची बाजू घेऊ नका. महानगरपालिकेने ज्या कॉम्प्लेक्समध्ये रस्ते केलेले आहेत. पाण्याची पाईपलाईन टाकलेली आहे गटर निर्मिती केली आहे त्याच कॉन्ट्रॅंकदाराकडुन आतपर्यंत ही लाईन जावी तुम्ही त्याची बाजू घेऊ नका की गेटवर सोडली आणि १५००० ते २००० पर्यंतचे काम कॉम्प्लेक्स वाले काम करतील.

**अनिल सावंत :-**

तो खर्च कोण करणार?

**दिनेश नलावडे :-**

महानगरपालिका ज्यावेळेला रस्ते, गटारे, पाण्याची लाईन टाकते हे सर्व करते तर ही लाईन आतमध्ये का जाऊ शकत नाही.

**सुरेश वाकोडे :-**

महापालिकेने जिथे रस्ता केला असेल त्या ठिकाणी आपण लाईन टाकून घेऊ.

**दिनेश नलावडे :-**

तुम्ही कॉन्ट्रॅक्टवाल्याची बाजू का घेता जेव्हा आपण भुयारी गटार योजना मंजुर केली तेव्हा ॲग्रीमेंट मध्ये काय आहे ते बघा.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, आपले म्हणणे मान्य आहे. ज्याठिकाणी महापालिकेचा रस्ता आहे लाईन टाकली आहे त्याठिकाणी आपण टाकून घेणार.

**दिनेश नलावडे :-**

महानगरपालिकेचे नगरसेवक प्रभाग समिती निधी वापरा किंवा नगरसेवक निधी वापरा हे वापरण्याची वेळ नगरसेवकावर येऊ नये.

**सुरेश वाकोडे :-**

सर, ही प्रोसेस आपली पुढे चालू राहणार आहे.

**दिनेश नलावडे :-**

तुम्ही ह्या ठिकाणी फायनल करा.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, अधिकारी सांगतात ते बरोबर आहे पण ज्याच्यात कमी काय राहते ते सांगतो. पाण्याची लाईन जिथपर्यंत गेलेली असेल तिथून पुढे सोसायटीवाले घेऊन जाता पाण्याची पाईपलाईन घेऊन जाणे हा वेगळा विषय आहे हे कॉस्टली काम आहे हे सर्वसामान्य माणसासाठी किंवा सोसायटीसारख्यांना परवडणारा नाही म्हणून एक तुम्हाला एक अमुक फुटापर्यंत आम्ही घेऊन जाणार त्याच्यानंतर तुम्ही करावे असे धोरण निश्चित करायचे आहे नाहीतर अडचण होणार आहे. चांगली योजना शहरामध्ये होत असताना त्याचा फायदा जर नागरीकांना मिळाला नाही किंवा ते कनेक्शन होऊ शकले तर परिस्थीती खराब होईल. सर्व शहरामध्ये बऱ्याच सोसायट्यामध्ये अशी परिस्थीती आहे की त्यांना हाऊस टॅक्स भरला तर पाण्याचे बिल बाकी राहते त्यासाठी ह्या विषयाचा अभ्यास करुन काम करणे गरजेचे आहे नाहीतर एवढी मोठी योजना राबवली आणि नागरीकांना त्याचा फायदा झाला नाही किंवा सोसायट्यांचे आऊटलेकचे कनेक्शन त्याच्यात झाले नाही.

**मा. महापौर :-**

या शहरामध्ये सर्वसामान्य लोक राहतात तुम्ही सोसायट्यांना ५० लाख खर्च करायला सांगितला तर सोसायट्या एवढा खर्च कुठून करणार?

**अनिल सावंत :-**

ह्यांच्या पॅचवर्कचे उत्तर द्या.

**सुरेश वाकोडे :-**

इंटरनल ज्या रोड खोदुन ज्या लाईन टाकयच्या आहेत त्या लाईन टाकून घेतो आणि नंतर जे पॅचवर्क आहे ते करुन घेतो.

**विजया वैती :-**

माझ्या वॉर्डमध्ये अजून झालेले नाही ह्याची मुदत किती आहे? पावसाळ्याच्या अगोदर पॅचवर्क झाले पाहिजे.

**सुरेश वाकोडे :-**

ही कामे आम्ही एक महिन्यात करुन देतो.

**विजया वैती :-**

मला लवकरात लवकर हे उत्तर नको.

**जुबेर इनामदार :-**

पॅचवर्कचे काम होणार? ज्या ठेकेदारांना ते पॅचवर्कचे काम दिले आहे त्यांना पैसे देत नाही त्याला गाडीमध्ये टाकायला डिझेल नाही त्याच्या गाड्या चार दिवस बंद होत्या मी कमिश्नरला त्याची माहिती दिली शहर अभियंताला

देखिल माहिती दिली समोर पावसाळा आहे. येणारी निवडणुक आहे आम्हाला लोक प्रतिनिधींना लोकांच्या समोर जायचे आहे.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, आम्ही कोणत्याही परिस्थीतीमध्ये हे रोड करुन घेतो.

**जुबेर इनामदार :-**

पाईपलाईन टाकली नाही आणि कनेक्शनचा उद्योग आणला.

**प्रमोद सामंत :-**

मॅडमचा प्रश्न आहे किती दिवसात केले पाहिजे?

**कल्पना ठाकूर :-**

माझ्या इथे सेंट जॉर्ज स्कुल आहे त्याच्यात सात हजार मुलं शिकतात. तो रोड काय झालेला आहे तो रोड करुन घ्या. तो रोड कधी करणार?

**सुरेश वाकोडे :-**

१५ दिवसात करुन घेतो आम्ही.

**विजया वैती :-**

एखादी लाईन खोदतात आणि पूर्व रोड खराब करतात.

**कांचन पुजारी :-**

मा. महापौर साहेब, ..............गटारात माती जाते आणि त्यामुळे गटार ब्लॉक होते. ह्या लोकांना सांगितलेले तर ही लोक त्या लोकांचे नाव बोलतात की जे कचरा उचलतात त्यांना सांगा आणि त्यांना सांगितले तर ती लोक ह्यांची नावे सांगतात मग आम्ही जायचे कुठे आम्ही त्या घाणीत राहणार का?

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम मी कोऑर्डीनेशन करुन घेतो.......

**कांचन पुजारी :-**

तुम्हाला मी फोन करुन सांगितले तुम्ही सांगता की मी पाठवतो कुठे पाठवले.

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम थोडेफार मागेपुढे झाले असेल मॅडम ते करुन घेतो.

**कल्पना ठाकुर :-**

मा. महापौर साहेब, माझे उत्तर द्या. माझ्या इथे शाळेला त्रास आहे तुम्हाला माहित आहे पुर्ण रोड खराब झालेला आहे.

**सुरेश वाकोडे :-**

पॅचवर्कचे करुन घेतो.

**प्रमोद सामंत :-**

साहेब, किती दिवसात.

**विजया वैती :-**

वाकोडे साहेब, ह्या महासभेत आम्हाला तारीख द्या.

**एस.ए.खान :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो वाकोडे साहेब, ड्रेनेजसाठी जे रोड खोदले आहेत त्याच्या बाजूला सुध्दा ........ झाले आहे पुर्ण रस्ता बनवायची गरज आहे. पॅचवर्कचा काही फायदा होत नाही.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, ते पाहणी करुन बघु.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब सर्व नगरसेवकाच्या बाबतीत ....... आणू शकतो जेएनएनयुआरएम चे आता जे काम चालू आहे ते इस्टीमेट प्रमाणे चालू नाही.

**प्रमोद सामंत :-**

बरोबर आहे.

**मिलन पाटील :-**

ते काम करण्यासाठी आम्ही सक्षम आहोत आणि ते काम आम्ही करुन घेणार आपल्याला ह्या इस्टीमेट प्रमाणे पिवळी माती लागते पिवळी माती टाकली जात नाही हा जो चिखल असतो तोच टाकला जातो. इस्टीमेटप्रमाणे ८० एमएम चा दगड ४० एमएम ची ४ एमएम ची खडी ती दाबली पाहिजे ते दाबलं जात नाही आणि त्याच्यावर डांबर केला जातो तो डांबर पावसाळ्यामध्ये निघतो दोन ते तीन फुट पाणी त्या पाईपामध्ये गेले की पून्हा ते खड्डे बसणार आहेत. मा. महापौर साहेब, आपण बिल्डर आहोत आपण जेव्हा प्लिन्थ बनवतो त्याच्यामध्ये पारई मारतो तो पाणी त्याच्या आतमध्ये बसवतो. पाणी गेल्यानंतर ते पूर्ण भरुन ठेवतो. ते पाणी गेल्यानंतर एक रात्रीमध्ये ८ ते १० इंच पाणी बसते ते पाणी बसत नाही...

**वंदना पाटील :-**

मा. महापौर साहेबांच्या परवानगीने बोलते. मागच्या महासभेत खांबित साहेबांनी उत्तर दिलेले की, तुमची भुयारी गटार योजना सरस्वती रोडला आणि कॅबिन क्रॉस रोडला होणार आहे ते काढलेले टेंडर कॅन्सल केलेले आहे. मागच्या महिन्यात मी त्यांना लेटर पाठवले आहे तर ते बोलले की, मला माहिती नाही. तुम्ही पाणी डिपार्टमेंटला विचारा त्यांनासुध्दा मी लेटर पाठवले तर त्यांनी मला असे उत्तर दिले की हे भुयारी गटर योजना होणार नाही कारण तिथे केबल आणि पाण्याच्या लाईन खुप आहेत मग टेंडर का थांबवले गेले ह्याचे उत्तर मला ह्या महासभेत पाहिजे कारण मी तीन वर्ष झाली भांडते ह्या रोडसाठी लेटरवर्क करते तरी मला कोणी सपोर्ट करत नाही. माझ्या वॉर्डमध्ये जी सरस्वती शाळा आहे तिकडे १०,००० मुले रोज ये-जा करतात.

**जुबेर इनामदार :-**

वाकोडे साहेबांचे निवेदन होऊन जाऊ द्या ह्या विषयावर प्रश्न बाकी आहेत कारण आम्ही प्रश्न विचारले नसते पण प्रशासनाने त्याची भुमिका स्पष्ट केली नाही.

**वंदना पाटील :-**

मला उत्तर द्या आणि मग तुम्ही बोला.

**वंदना चक्रे :-**

वंदना पाटीलांचे उत्तर द्या.

**(कॅसेट १ संपली)**

**मा. महासभा**
**दि. १८/०२/२०१२**
**कॅसेट क्र. ०२**
**पान क्र. १ ते ६४**

**मिलन पाटील :-**
वाकोडे साहेब ह्याचे उत्तर दया.

**जुबेर इनामदार :-**
वाकोडे साहेब तुम्ही उत्तर देऊ शकत नाही असे आहे का?

**सुरेश वाकोडे :-**
खारीगाव व त्या परिसराचे काम आपण पावसाळया नंतर हाती घेणार आहोत. तिथे आपण आता करणार नाही. ते काम आता करणार नाही. तसे मी पत्र दिलेले आहे.

**वंदना पाटील :-**
मग तुम्ही निघालेले टेंडर का कॅन्सल केले.

**सुरेश वाकोडे :-**
ह्यामध्ये आपण एस.टी.पी. सुरु केलेली आहे. खारीगाव परिसरचा आणि नवघर काम आपण पावसाळयानंतर हाती घेणार आता घेऊ शकत नाही. आता ज्या भागातले काम हाती घेतले आहे ते पूर्ण करुन चालू करायचे आहे.

**मिलन पाटील :-**
तुम्ही त्यांना लेखी उत्तर दया. पावसाळयानंतर त्या नगरसेवकासाठी उभ्या राहील्या तर त्यांना पब्लिक उभे राहून देईल का?

**वंदना पाटील :-**
तुम्ही टेंडर का कॅन्सल केले.

**सुरेश वाकोडे :-**
मॅडम सिव्हरेजचे काम नंतर होणार आहे. रोडचे काम करुन घ्या.

**वंदना पाटील :-**
रोड इसलिए बंद किया क्योंकी भुयार गटार योजना चालू करने का था।

**भगवती शर्मा :-**
वाकोडे साहेब, तुम्ही ह्यांना उत्तर दया आणि सार्वजनिक बांधकामला देखील दया. त्यांच्या रोडचे काम अडकले आहे.

**श्रीप्रकाश सिंह :-**
वाकोडे साहब, केबीन रोड का रोड पास हुआ था। अभिनव स्कूल के सामने नर्मदा नगर और खारीगाव का रोड वह रोड पास हुआ था। दो साल के बाद इन्होंने लेटर दिया पैसा नही है। बिच में और एक पास हुआ था। साहब ने, काम इसिलिए कॅन्सल किया कि उधर भुयारी गटर बनाना है। बनाने का है तो बनाऐंगे कभी बारीश आ रही है। समाधानकारक जवाब तो दिजिए।

**सुधीर राऊत :-**
मा. महापौरांच्या वतीने बोलतो की सध्या कार्यकारी अभियंता नाहीत. परंतु सिव्हरेजचे काम पावसाळया नंतर होणार असेल तर रोडचे काम करण्यासाठी कार्यकारी अभियंताना सुचना दिल्या जातील.

**वंदना चक्रे :-**
मा. महापौर साहेब, सिव्हरेजच्या लाईन बद्दल मला बोलायचे आहे. वाकोडे साहेबांचा विषय आहे. आमच्यावर सिव्हरेजची लाईन टाकलेली आहे. २०११ मध्ये लाईन टाकली होती. त्या रस्त्याची कंडिशन बघा. वाकोडे साहेब आपण ऐका आणि माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. फार वाईट परिस्थिती आहे. बांधकाम विभागाला आणि आपल्याला सुध्दा सांगितले करतो करतो म्हणतात वरवर करतात आणि मग तो रस्ता तूटतो. तो रस्ता लवकरात लवकर दयावा असे ब-याच वेळेला सांगितले आहे. रस्ता कधी करुन देणार त्याचे उत्तर दया. कॉन्ट्रॅक्टर म्हणतो आम्हाला बिल मिळत नाही. आम्हाला त्याच्याशी मतलब नाही. आमचा संबध नाही. सिव्हरेजच्या लाईनचे ज्यांनी कॉन्ट्रॅक्ट घेतले त्यांनी आणि जो सब कॉन्ट्रॅक्टर आहेब ते बघतील. आम्हाला आमच्या वॉर्डमधला रस्ता जसा तोडला तसा पक्का करुन पाहिजे. जर रस्ता करुन दिला नाही तर तुमच्यावर आणि तुमच्या कंपनीवर काय करु तो पुढचा विषय. ह्याचे उत्तर मला दया.

**सुरेश वाकोडे :-**
मॅडम आपल्या वॉर्डमधले जे पॅचवर्कचे काम आहे ते १५ ते २० दिवसात करुन घेऊ.

**वंदना चक्रे :-**
साहेब, ज्यांना तुम्ही कॉन्ट्रॅक्ट दिले आहे त्या कॉन्ट्रॅक्टरचे काळया लिस्टमध्ये नाव टाका आणि दुस-याला कॉन्ट्रॅक्ट दया. वाकोडे साहेब, माझ्या प्रश्नाचे उत्तर दया काम बरोबर झाले नाही. खालच्या दर्जाचे काम केले आहे. काम व्यवस्थित करुन दया. साहेब तो रस्ता खोदला आहे ना लोक आम्हाला शिव्या घालतात. परिस्थिती वाईट आहे.

**सुरेश वाकोडे :-**

पॅचवर्कच्या कामामध्ये जो दबलेला पोर्शन आहे. त्याठिकाणी आम्ही रिपेयर करुन हे काम १५-२० दिवसात करुन घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

वाकोडे साहेब, तलाव रोडचे क्रॉसींग करण्यासाठी किंवा जुन्या लाईन काढून नविन लाईन देण्यासाठी दोन तीनदा खोदून झालेला आहे. परंतु तो अजून रिपेयर झालेला नाही. मा. आयुक्त स्वतः तिकडे येऊन गेले की नविन रस्ता बनवणार म्हणून. खांबित साहेब ते काम कधी होणार आहे.

**सुरेश वाकोडे :-**

सिव्हरेजची लाईन टाकली असेल तर त्या ठिकाणचे रिपेयरींग करुन घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या रस्त्याचे काम कधीपर्यंत होणार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, सर्वात मोठी योजना ह्या शहरात आपण राबवत आहोत. अंडरग्राऊंड ड्रेनेज. आणि भविष्यात मोठा फायदा होणार आहे. मच्छरचे प्रमाण कमी होणार आहे. ओपन नाले जे आहेत त्याच्यात आपण सिव्हरेजचे पाणी सोडतो त्याच्यात आरोग्याचा जो प्रॉब्लेम आहे तो सॉल्व होणार आहे. सन्मा. जंगम साहेब, इनामदार साहेब आणि अनिल सावंतचा प्रश्न आहे की हे सगळे करताना त्याचा बोजा नागरिकांवर पडता कामा नये. आपण ज्या योजनेला मंजुरी दिली आहे. त्या योजनेत इंटरनल कनेक्शन महापालिकेने किंवा ठेकेदाराने करावे असा कूठेही उल्लेख नाही. हा प्रस्ताव प्रशासनाने दिला होता की, एस.पी.एम.एल. चा जो मेन होल जिकडे आहे. होल रस्त्याच्या सेंटरला असतात. त्या होलपासून सोसायटीच्या सेफ्टीक टॅंकपर्यंत सोसायटीने करावे. आमचा असा प्रश्न होता की दोन फूटाची गल्ली आहे चार बिल्डींग आहेत. भाईंदर पूर्वेला तिकडे रस्त्याच नाही मग तो खर्च त्यांनी करायचा का? रस्त्यावर किती लाईन आणायची. मग त्यासाठी ............ असा मार्ग काढला गेला ह्यांचे म्हणणे असे होते की जो रस्ता सोडला आहे त्याचेही पैसे भरा रस्त्यामध्ये येणारी पाईपलाईन टाका आणि सोसायटीच्या आतलीही टाका. आमचा त्याच्यामध्ये स्पष्ट नकार होता की, महापालिकेच्या सार्वजनिक जागेवर सोसायटीने का खर्च करावा. प्रत्येक सोसायटीने आपल्या सेफ्टीक टॅन्कचे आऊटलेड जो आहे तो आपण रस्त्याच्या नाल्याला आणलेलाच आहे म्हणजे रस्त्याचे जे ओपन गटार आहे तिथपर्यंत आणलेले आहे. तुम्हाला तो ही डायरेक्ट वळवता येईल. सेफ्टी टॅन्क डिसकनेक्ट करुन तो कनेक्ट केला तर तुमची तीच लाईन बाहेर येईल. त्याला कनेक्ट करता येईल. सन्मा. जंगम साहेबांना समजायला गडबड झाली त्यांचे बोलताना चूकले की, पाण्यासारखे नक्कीच नाही पाण्याची लाईन आपण सोसायटीच्या टॅन्कपासून रस्त्यापर्यंत घेतो .... असे नाही सोसायटीच्या गेटपर्यंत उदया माझा बंगला किंवा मा. महापौरांचा बंगला आहे तर त्यांनी ते बाहेर गेटपर्यंत आणावे गेटच्या बाहेरचा खर्च महापालिका करणार. तिकडून एक किलोमिटर राहू दया. एक मिटर किंवा शंभर किलो मिटरवर राहू दया. गेटच्या आतलेसुध्दा महापालिकेने करावे अशी कुठल्या कायदयात तरतुद नाही की इंटरनल काम सुध्दा महापालिकेने करावे. माझा बंगला सेफ्टीक टॅन्कपासून कमीत कमी पाचशे मिटर आतमध्ये राहतो तर मग ते काम महापालिकेने करावे का? त्यामुळे सार्वजनिक जागा आणि खाजगी जागा त्यांना जी सुविधा पाहिजे त्यासाठी थोडा फार खर्च आपल्याला पडणार आहे. आणि सेफ्टी टॅन्क पर्यंत महापालिकेने ठरवले की सर्व खर्च आपण करायचा तर आपण इमॅजीन करु शकतो की एका वॉर्डमध्ये साधारण १०० बिल्डींग असतील तर ८० वॉर्डमध्ये किती बिल्डींग असतील. मग एका बिल्डींगला किती खर्च आणि त्याची टोटल अमाउन्ट केली तर साहेब ते संपूर्ण जॉईन्ट करायला म्हणजे बांधायला तीन वर्ष लागली तर जॉईन्ट करायला कमीत कमी पाच वर्ष म्हणजे बजेट प्रोव्हीजन केली तर करु शकतो. आपण निर्णय घेतला की नागरिकांवर भूर्दंड कशाला? महापालिकेने करावे ठीक आहे. पण साहेब मला सांगा आठ हजार बिल्डींगला महापालिकेने खर्च केला तर किती वर्ष बजेटमध्ये प्रोव्हिजन करायला लागेल ते करता करता वीस वर्ष जातील म्हणून सोसायटीची जी जागा आहे त्या गेटपर्यंत सोसायटीची जागा १५ फूटपर्यंत असेल तरीही तिकडे टाकू नये. फक्त गेटपर्यंत टाकायलाच लागेल. तेवढे आपल्याला सहन करायला लागेल. आज एक मताने निर्णय व्हावा बाकी तुम्ही बोलणार. आम्ही तुमच्या बरोबर आहोत. एस.पी. तीन वर्षाने प्रोजेक्ट तयार करतो आणि त्याला कनेक्ट करायला दहा वर्ष लागतील तर ते शक्य आहे का? मग त्यासाठी काय करावे? त्यासाठी एक व्हाया मिडीया काढले आहे. २५,०००/- कनेक्शन चार्जेस आणि त्यामध्ये हे तरी ही महापालिकेला अजून पैशाची गरज पडणार आहे. कारण त्या २५,०००/- मध्ये मेन होल पासून सोसायटीच्या गेटपर्यंत कनेक्शन होऊ शकत नाही. आम्ही पहिलेच सांगितले लायसन्सी प्लंबर नको ते बोलतील की आम्हाला सर्टिफिकेटसाठी दहा हजार वेगळे दया, पाच हजार वेगळे दया म्हणून आम्ही ते रद्द केले. महापालिकेने ती डिझाइन दयावी. त्या डिझाइनप्रमाणे सोसायटीने ते टाकावी. ह्या सगळया गोष्टीचा विचार करता स्टॅन्डिगने जो ठराव केला आहे त्याच्यावर चार-पाच वेळा चर्चा झाली आणि नंतर एक व्हाया मिडीया काढला आहे की नागरिकांवर तो भुर्दड पडू नये. पण हे ही एक सत्य आहे की तीन वर्षाची योजना मिरारोडला पूर्ण झाली. एप्रिलमध्ये चालू करायची त्यांची तयारी आहे. हे केल्यानंतर तुम्ही किती बजेट प्रोव्हिजन करणार ते सांगा. पाच करोड ठेवणार, दहा करोड ठेवणार त्या पैशाची कॅपेसीटी कोठे आहे. साहेब ते प्रोजेक्ट होऊ शकत नाही. आज आठ हजार बिल्डींगला कनेक्ट करण्यापर्यंत जे युआयडी कार्डसारखे होईल की दिवसाला ४०० होतात आणि ४०० नी लोकसंख्या वाढते. म्हणजे आपण ४०० कार्ड काढल्यावर ४०० लोकसंख्या वाढते.

इकडे चार बिल्डींग दिवसाला फंडप्रमाणे कनेक्ट करतो आणि दुसऱ्या चार बिल्डींग तयार होतात. हे कूठेतरी शहराच्या हिताचे आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा विचार करीत असताना आपण सोसायटीचा विचार करतो. मिरा-भाईंदर शहरामध्ये अशी बरीच गावे आहेत. त्याची स्वतःची घरे आहेत सेफ्टी टॅन्क आहेत. हा विचार करताना त्यांचाही विचार करा. गावामध्ये जे सेफ्टी टॅन्क आहेत त्यांचे रस्ते महापालिकेने बनवले आहेत त्यांचा ही विचार करण्यात यावा.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांचे पण आम्ही सांगितले की त्यांनी घराच्या बाहेर पाइप सोडायचा आहे. जे गावात आपण कॉंक्रीट रोड केले तिकडे महापालिकेने करावे. त्यांनी घराच्या बाहेर आणावे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, सोसायटीला एक कनेक्शन जोडण्यासाठी २५,०००/- खर्च स्थायि समितीने नक्की केला आहे. मा. महापौर साहेब आमच्या प्रभागामध्ये २० ते २५ वर्षाच्या बिल्डींग आहेत. आमच्या प्रभागामध्ये १० बिल्डींगच्या सोसायट्या अस्तित्वात नाहीत. त्यांचे ड्रेनेज नाही. त्याच्या ड्रेनेजचे पाणी बाहेर रोडवर येते. त्याच्याकडे खर्च करायची ऐपत नाही. अशा सोसायट्या माझ्या वॉर्डमध्ये आहेत. इस्टमध्ये अशा कितीतरी सोसायट्या आहेत की, त्या २५,०००/- रुपये भरु शकत नाही. त्याच्यासाठी निधी असेल तर आपल्याला ह्याच्यामध्ये तरतुद करायला लागेल. साहेब, मिरा-भाईंदर मध्ये एवढी मोठी योजना आपण राबवतो. परंतु २५ ते ३० % सोसायट्यांना पैसे भरायचे असतील तर त्या सोसायट्या कनेक्शन जॉइन्ट करु शकणार नाही. मिरारोड, कनाकिया, भाईंदर वेस्ट ही बाजू वेगळी आहे. परंतु इस्टमध्ये अशी परिस्थिती आहे. त्यासाठी नगरसेवक निधी, प्रभाग निधी नगरसेवकांनी जर ह्याच्यामध्ये तरतूद ठेवली तर हा प्रकार व्यवस्थित हाताळता येईल.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर साहेब मी एक सुचना देतो. मागील कमिशनर राजीव ह्यांनी आपल्याला ड्रेनेज आणि सिव्हरेजचे दाखवले होते. जवळ जवळ शेकडो करोड रुपये आपण शहराचा विकास करतो ती अभिनंदनास्पद गोष्ट आहे. परंतु मोरवा ते उत्तन परिसर ह्या पाच-सहा वॉर्डाचा ह्या प्रोजेक्टमध्ये विचार केला गेला नाही. ह्या प्रभागाचे एम.एम.आर.डी. मध्ये आपण दिलेले आहे. ह्या लोकांना सुविधा काय तर जास्त खर्च होईल म्हणून ह्याचा गाजावाजा आहे. पण त्या विभागाचा विचार केला नाही की, त्यांना काय सुविधा दिल्या आहेत. आज बोजा त्याच्यांवर आणि आमच्यावर देखील पडणार आहे. तर त्याचा विचार व्हावा. त्या समाजाला एम.एम.आर.डी. मध्ये दिले आहे आणि प्रत्येक वर्षी वसुली आपण करतो. एम.एम.आर.डी. चा विषय येणार आहे. सिव्हरेजसाठी शेकडो रुपये संपवले आणि त्या विभागावर अन्याय झाल्यासारखे आहे. ते का केले नाही आणि का करत नाही त्याचे उत्तर मला कमिशनरने त्यावेळेला दिलेले होते. त्या शेकडो रुपयात काही भाग त्या वॉर्डनूसार येत असेल तर ते उत्तन आणि इतर प्रभागासाठी खर्च करण्यात यावा. एवढे शेकडो खर्च करुन देखील आज जर २५,०००/- खर्च सोसायटी सहन करु शकत नसेल तर प्रभागावर अन्याय नाही का होणार? त्याचा विचार व्हावा. तिथे का नाही, आणि नाही केले तर पूढे काय करावे.

**सुधीर राऊत :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, मोरवा ते उत्तन हा भाग मूळ योजनेमध्ये समाविष्ठ नाही. त्याच्याकडून दिलेले कारण की हा भाग विरळ वस्तीचा आहे. आणि तिथे वॉटर टेबल आणि बाकी सगळया गोष्टीचा विचार करता तो भाग मूळ योजनेमध्ये समाविष्ठ नाही.

**बर्नड डिमेलो :-**

जर तो भाग योजनेमध्ये समाविष्ठ नाही तर त्याच्यावर कर आणि इतर गोष्टी का लादल्या जातात. त्याच्यावर टॅक्स का लावतात त्यांना टॅक्समधून मुक्त करायला पाहिजे. तो कर आमच्यावर कशाला.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, हा भाग योजनेमध्ये समाविष्ठ नाही तर त्यांना टॅक्स का लावला जातो. हा त्यांच्यावर अन्याय का आहे. तुम्ही टॅक्स लावू नका. राऊत साहेब आम्ही तुम्हाला विचारतो. तुम्ही टॅक्स का समाविष्ठ केले.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा जो मलनिःसारण प्रकल्प आहे त्याच्यात आमच्याकडुन मलनिःसारणाचा टॅक्स वसुल केला जातो. मग आमचा टॅक्स वसुल करु नका जेव्हा ही योजना मंजुर होईल तेव्हा हा टॅक्स वसुल करा ह्या ठरावाला आम्ही त्यावेळेला विरोध केला होता.

**बर्नड डिमेलो :-**

पाटील साहेब, टॅक्स जास्त नाही. मा. आयुक्त साहेब, त्याच्यावर जरी टॅक्सचा प्रश्न नसला तरी शेकडो कोटी रुपये इथे जो खर्च केला जातो त्यातील जो भाग ह्याच्यामध्ये येणार असेल तर तो विकासाकरीता तिथे द्यावा. टॅक्स जसा लावला तो समान असावा कारण त्याला संगणक प्रक्रीयेने प्रत्येक गोष्टीत बदल करावा लागेल आपण जर शहरामध्ये १०० रुपये खर्च करतो आणि जर त्या प्रभागावर अन्याय होत असेल तेवढे टक्केवारी खर्च दुसऱ्या विकासासाठी उत्तन मोरवामध्ये का खर्च करु नये. तो पर्याय करा ह्याच्यावर सभागृहामध्ये विचार व्हायला पाहिजे. तुमचे काय मत आहे. टॅक्स बद्दल आमचे बंधन नाही पण मला वाटते पुढील सामाजिक कार्य आणि शहराला लागणारी शिवरेजचे कोटी किती आहेत.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, तत्कालीन आयुक्त राजीव जाधव होते त्यावेळी ह्या सभागृहामध्ये योजना सांगितली होती.

**बर्नड डिमेलो :-**

५०० कोटी आहेत ना ५०० भागीले करा.

**अनिल सावंत :-**

ही योजना तत्कालीन आयुक्त राजीव जाधव साहेबांनी सादर केली होती त्यावेळी हा मुद्दा निघालेला होता. उत्तन, राई, मुर्धा, मोरवा त्यावेळेला त्यांनी सांगितले होते की, सेकेंन्ड फोर्समध्ये आम्ही ही योजना त्याठिकाणी राबवणार आहोत त्याठिकाणी योजना कॅन्सल केलेली नाही त्या गावामध्ये सेकेन्ड स्पेसमध्ये राबवणार आहोत तर त्याच्यासाठी तुमची काय तयारी आहे.

**जुबेर इनामदार :-**

इथे १७ एम.एम. पडद्यावर दाखवले आहे तिकडे सेकेन्ड पेसमध्ये उत्तन, मुर्धा, मोरवा योजना करणार त्याचे काय झाले?

**अनिल सावंत :-**

सन्मा. मिलन पाटील तुम्ही जो मुद्दा उपस्थित केला त्याचे उत्तर दिले नाही.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य दिनेश नलावडे साहेबांनी सांगितले की, आम्ही पाण्यासाठी सक्षम नाही त्यांना कुठलीही सुविधा नाही त्यांना टॅक्स लागलेला आहे असे सांगतात ठराव मंजुर.

**जुबेर इनामदार :-**

ठराव मंजुर नाही त्याच्यावर चर्चा करायला पाहिजे. तुम्ही स्थायी समितीमध्ये चर्चा करुन देत नाही. महासभेमध्ये चर्चा होणार नाही ते शक्य आहे का?

(सभागृहात गोंधळ)

**लक्ष्मण जंगम :-**

ह्या विषयावर चर्चा आपण सगळेच करतो. सन्मा. नरेंद्र मेहतांनी सांगितले की माझ्या गेटपर्यंत गेल्यानंतर आतमधला सगळा खर्च करायची जबाबदारी माझी आहे. ते बरोबर आहे पण कसे आहे पण काही ठिकाणी होण्यासारखे आहे त्याठिकाणी लोक करतील पण जिथे अडचण असेल तर काही ठिकाणी अडचण असेल मी मघाशी सांगितले आता देखील सांगतो. काही ठिकाणी अशी अडचण आहे की, नळाच्या बाहेरच्या मेनलाईन मधुन एक कनेक्शन करुन घेऊन आपण आपल्या टाकीत सोडतो आता प्रक्रिया उलटी आहे की, आपल्या टाकीतून एक कनेक्शन नेऊन मेन लाईनमध्ये सोडायचे. पाण्याच्या पाईपलाईनचा जो खर्च आहे तो खर्च लोकांना पेलण्यासारखा नाही. पाण्याच्या पाईपलाईनचे एक ठिक आहे ५० स्के.फुट एका पाईपची किंमत आहे तर तो फार मोठा खर्च नाही. परंतु, हे खोदण्याचा कमीत कमी सात-आठ फुट खाली खोदायचा खर्च आहे.

**नरेंद्र मेहता :-**

म्हणून मी तुम्हाला काय सांगितले की, नळाचे कनेक्शन तिथपर्यंत घेऊन जायची आवश्यकता नाही. फक्त तुमच्या गेटपर्यंत म्हणजे रोड घरापासुन २० फुट लांब असेल तिथपर्यंत घेऊन जायची आवश्यकता आहे आणि आतले तुम्हाला ८ ते १० फुट जायची आवश्यकता नाही. महापालिकेत जे बाहेरचे करतील ते त्यांना किती जायचे ते त्यांच्या लेवलप्रमाणे जातील तुम्हाला काय जायची गरज नाही.

**प्रमोद सामंत :-**

त्याचा खर्च कोण करणार?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, एका नगरसेवकाला मानधन फक्त साडेसात हजार आहे ह्यांना पगार ५०,००० रुपये आहे आणि उत्तर लोकप्रतिनिधी देतात.

**लक्ष्मण जंगम :-**

तुमची शंका दुर करतो तुम्हाला सांगतो तुम्ही म्हणता ना एवढे खाली जायची गरज नाही. अंडरग्राऊंड ड्रेनेजचे असे आहे की, बाहेरच्या ॲव्हरेजप्रमाणे तुमच्या बिल्डींगचे कनेक्शन त्याच्या खाली जाऊन होईल.

**नरेंद्र मेहता :-**

वरती चालते खाली चालत नाही. सोसायटी खाली चालत नाही वरती चालते. टेक्नीकली वरती असते सांगतो ना.

**लक्ष्मण जंगम :-**

नाही पण वरती एक फुटावर चालणार नाही. कनेक्शन करताना तुम्हाला त्या लाईनला करायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

वाकोडे साहेब बरोबर आहे की नाही.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, एक तास झाला टाईमपास चाललेला आहे.

**सुरेश वाकोडे :-**

ह्यामध्ये प्रॉपर्टी कनेक्शन आहे. प्रॉपर्टी कनेक्शन हे एक,दोन,तीन, फुट असे देत असतात. त्यामध्ये जास्त देत नसतो. तुमच्या सेफ्टीक टँकच्या इनलेडची जी लेव्हल असते, ती लेव्हल आपल्याला त्यामध्ये घेऊन जायची आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

आणि जोडताना कसे जोडायचे?

**सुरेश वाकोडे :-**

जोडताना आम्ही त्या चेंबरमध्ये छिद्र पाडुन, पाईप टाकून तो सोसायटीच्या गेटपर्यंत आणणार.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, सेफ्टी टँकच्या इनलेट आणि आऊटलेट लेव्हलमध्ये जास्तीत जास्त सहा इंचाचा फरक आहे. सेफ्टी टँकमध्ये जाणारे मलनिःसारण त्याला फिल्टरायझेशन सिस्टम असते तीन पडदे असतात साहेब तुम्ही इंजिनिअर आहात आत्ता आम्हाला शिकवावे लागेल तुम्ही मला एक सांगा, तुमच्या मेन रोडवर जिथून तुमच्या मलनिःसारणच्या सिव्हरेजच्या पाईपलाईन गेलेल्या आहेत रस्त्याच्या मधोमध आहेत. मेन रोडवर आहेत आत्ता तुम्ही दोन मिनिटांपूर्वी तुमच्या निवेदनामध्ये सांगितले की, आपल्याला सेफ्टीटँकची प्रथा बंद करायची आहे परत बोलता सेफ्टीक टँक मधुन लाईन आणायची आहे काय चालले आहे नक्की काय करायचे आहे.

**सुरेश वाकोडे :-**

सेफ्टीटँक बंद करायचा आहे सेफ्टीक टँकचा इनलेट पाईप जो आहे त्याची लेवल खाली घ्यायची आहे.

**जुबेर इनामदार :-**

मला सांगा तुमची बिल्डींग तिकडे असेल तर ती सेफ्टीक टँकच्या दर्शनी भागी असते की मागे असते.

**सुरेश वाकोडे :-**

मागे असते.

**जुबेर इनामदार :-**

मागे असते ना मेन रोडवरुन सिव्हरेजची लाईन गेलेली आहे. सेफ्टी टँक मागे येणाऱ्या इनलेटचा संपूर्ण पाणी त्याची लेवल सेफ्टी टँक पर्यंत तिथुन पाणी परत आणायचे कसे? जेसल पार्क आहे शांती नगर आहे सृष्टी मध्ये तेथे आधी मलनिःसारण केंद्र वगैरे आहे तिकडे काम चालु आहे त्यांना अडचण नाही कारण बिल्डरांनी बिल्डींग बांधताना काम केलेले आहे. आपली अशी परिस्थीती आहे की, ज्या २५-२५ वर्षाच्या जुन्या बिल्डींग आहेत त्यांना मेन्टेनन्ससाठी पैसे नाहीत तिकडे ही कामे होणार कशी? बिल्डींगमध्ये कमीत कमी दहा फुट खाली खोदायला लागेल तेव्हा तुमच्या लाईन येतील पाण्याच्या लाईन सहा फुट खाली आहेत. तुमच्या मेन रोडवर येणारा ...... मोटर ड्रेनेज कमीत कमी तीन मीटर डीप आहे. त्यातुन खालुन आणावा लागेल त्याच्यानंतर ती लाईन चेंबरपर्यंत जाईल तुम्ही ह्यास विषयावर काही स्टडी केली नाही.

**सुरेश वाकोडे :-**

साहेब, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे. आपण काय करतो ........ मोटर ड्रेनेजच खालून समोर लाईन आणणार आणि ते चेंबर देणार त्या चेंबरला आपण इकडची लाईन जोडताना एकदम खालच्याच लेवलला जोडली पाहिजे असे नाही ते तुम्ही जोडु शकता.

**जुबेर इनामदार :-**

ते पुन्हा वरती येणार.

**लक्ष्मण जंगम :-**

साहेब, एक गोष्ट सांगा की, बिल्डींगच्या तिथुन लाईन खोदुन घेतली तर साधारणतः एक चेंबर किती फुटावर बांधायला लागेल.

**सुरेश वाकोडे :-**

साधारणतः २० मीटरवर चेंबर यायला पाहिजे.

**लक्ष्मण जंगम :-**

२० मीटर म्हणजे किती रनिंग फुट झाले.

**सुरेश वाकोडे :-**

६० फुट.

**लक्ष्मण जंगम :-**

६० फुटावर आपला एक चेंबर येणार.

**सुरेश वाकोडे :-**

हो.

**लक्ष्मण जंगम :-**

आता मला सांगा मुख्य लाईनला येईल तोपर्यंत डायरेक्ट अशी लाईन त्या चेंबरमध्ये जोडली तर चालेल की, मध्ये एक चेंबर कम्पलसरी द्यायची गरज आहे.

**सुरेश वाकोडे :-**

आपण रोडच्या बाहेर एक चेंबर ह्याच्यासाठी घेतो की तिकडे एक जाळी लावणार म्हणजे काही अडकले तर साफ करण्यासाठी.

**लक्ष्मण जंगम :-**

बरोबर आहे.

**जुबेर इनामदार :-**

जाळी कोठे लावणार.

**लक्ष्मण जंगम :-**

सोसायटीच्या आणि मुख्य लाईनच्या मध्ये चेंबर देण्याची गरज आहे की नाही?

**सुरेश वाकोडे :-**

मुख्य लाईन आणि रोड क्रॉस केल्यानंतर एक चेंबर ठेवणार आहेत.

**लक्ष्मण जंगम :-**

मला सांगा चेंबर बांधताना तो चेंबर वरती बांधून चालेल का? चेंबर बांधताना अंतर घेऊनच बांधायला लागेल की तुम्ही एकदम वर बांधणार.

**सुरेश वाकोडे :-**

नाही खाली बांधणार.

**लक्ष्मण जंगम :-**

मग पाण्याच्या पाईपलाईनमध्ये आणि ह्याच्यामध्ये फरक आहे की नाही, साधारणतः ह्याच्यामध्ये ५ फुटापेक्षा कमी खोदुन चालणारच नाही.

**सुरेश वाकोडे :-**

आम्ही खोदणार ते आपले मान्य आहे परंतु, सोसायटी जेव्हा जोडणार तर त्यांना पाच फुटाप्रमाणेच खोदायची गरज नाही. सेफ्टी टँकचा इनलेडचा जो पाईप आहे तो त्याप्रमाणे दोन फुटापर्यंत आणू शकत असतील तर दोन फुटात आणु शकतात काही ठिकाणी तीन फुटात आणु शकणार.

**लक्ष्मण जंगम :-**

हे काम मी स्वतः बघितले आहे एक महिना हे काम मी स्वतः उभे राहून काम केले आहे म्हणून तुम्हाला सांगतो की तिकडे पाच फुटापेक्षा कमी खोदले जाते. तुमचा अनुभव जास्त असेल पण हे काम मी एक महिना स्वतः बघितले आहे पाच फुटापेक्षा खाली त्याचे कनेक्शन होतच नाही. सन्मा. नरेंद्र मेहताजी ते पाच फुटापेक्षा कमीने होत नाही जर एखाद्या सोसायटीला लांबलचक खोदुन आणायचे तर ते कॉन्ट्रॅक्टर तुम्ही सांगितले लायसनशी त्याचा रेट भरमसाठ आहे. आणि त्या हिशोबाने करायला लागेल आणि ते प्रत्येक सोसायटीला परवडणार नाही म्हणून अंतर निश्चित करा अंतर नक्की केले नाही तर प्रॉब्लेम होईल. आपण एवढी मोठी योजना राबवतो तर त्याचा बेनिफीट सगळ्यांना मिळायला पाहिजे. आपल्या शहरात अंडरग्राऊंड ड्रेनेज सिस्टम अस्तित्वात आली आणि त्याच्यात काही कनेक्शन व्हायचे ते झालेच नाही तर त्याचा उपयोग काय? जोपर्यंत लोकांची खर्चाची तयारी होणार नाही तोपर्यंत ती कनेक्शन होणार नाही जर कनेक्शन झाली नाही तर उपयोग काय? म्हणून चर्चा करुन अंतर नक्की करायची गरज आहे.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, शांती नगर सेक्टर नं. ५ ह्याठिकाणी गेल्या ३० वर्षापूर्वी शांती स्टार बिल्डरने अंतर्गत गटर योजना त्याने केलेली आहे. ती कार्यरत नाही आणि शितल नगरपर्यंत अंतर्गत गटर योजनेची लाईन जोडण्यात आलेली आहे आणि सेक्टर ५ आणि ६ मध्ये पावसाळ्यांत मोठ्या प्रमाणात पाणी साचते. ड्रेनेज जे आहे ते तुटलेले आहेत त्याच्यामुळे मल जे आहे ते संपूर्ण रस्त्यावर येते. प्रत्येक घराच्या ग्राऊंडफ्लोरला ३-४ फुट एवढे पाणी येते तर ती योजना शितल नगर परिसरापर्यंत न ठेवता ती सेक्टर ५-६ पर्यंत काम करण्यात यावे.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

संपूर्ण शाती नगरमे पीने के पानी मे ड्रेनेज लाईन मिक्स होते.

**मा. महापौर :-**

बसा.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही बसा कशाला सांगता. आम्हाला पावसाळ्यात किती त्रास सहन करावा लागतो तुम्हाला माहित आहे. सेक्टर ५-६ मध्ये तुम्ही पावसाळ्यात व्हिजीट दिली आहे का? पावसाळ्यांत तिथे पुरग्रस्त परिस्थीती निर्माण होते.

**नरेंद्र मेहता :-**

हा विषय घेतल्यानंतर प्रॉब्लेम सॉल्व होईल.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

वाकोडे साहेब, तुम्ही उत्तर द्या. तुम्ही फक्त गोड बोलायचे काम करता पुढचे काम करत नाही. प्रत्येक वेळेला विचारणा करतो तर तुम्ही बोलता करु पण ते कधी करणार.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, ही योजना सभागृहामध्ये सादर झाली.......

**चंद्रकांत म्हात्रे :-**

वाकोडे साहेब, ह्याचे उत्तर द्या शांतीनगर सेक्टर ५-६ ह्याठिकाणी पावसाळ्यांत पाहणी केली तर तुमच्या लक्षात येईल की, तिथे किती पुरजन्य परिस्थीती निर्माण होते. प्रत्येकाच्या घरी पूर्ण गटाराचे पाणी येते. दुकानामध्ये पाणी जाते त्यामुळे शितल नगरमध्ये जी भुयारी गटर योजना राबविलेली जे काम चालु करण्यात यावे अशी मी मागणी करतो. शितल नगरला जी भुयारी गटर योजना झालेली आहे त्याठिकाणी पॅचवर्कचे काम झालेलंच नाही. पाणी विभागातले लोक म्हणतात भुयारी गटर योजनेचे काम त्यांनी केले आहे त्याच्याकडे जा.

**पान क्र. २१ ते ३०**

**जुबेर इनामदार :-**

उदया ज्या तांत्रिक अडचणी येणार असतील त्याला .......

**चंद्रकांत मोदी :-**

पीने के पानी के अंदर ड्रेनेज लाइन मिक्स होता है। चूहे ने पूरा खोकला कर दिया है। उसको रिपेयर किया जाए।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

वाकोडे साहेब, आपण ह्याचे उत्तर दया. आपण ह्या पावसाळया अगोदर करणार की नाही.

**सुरेश वाकोडे :-**

आपण जे काम सांगता ते मी स्वतः तिकडे येऊन पाहणी करतो आणि ते कसे करता येईल ते करुन घेऊ.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आता पावसाळा नाही तर तुम्ही म्हणाल पावसाळा नाही.

**सुरेश वाकोडे :-**

प्रॉब्लेम कूठे येतो ते दाखवा. मी तुमच्याकडे येतो.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

आपण कधी येणार.

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, आपने व्हिजीट किया था। गटर का पानी जो पीने के पानी में मिक्स होता है। आज भी शांती नगर में ड्रेनेज का पानी मिक्स होता है। पूरा शांती नगर की बात करता हूँ। आपने व्हिजीट किया था। अभी तक हूआ नहीं।

**सुरेश वाकोडे :-**

दोन दिवसांनी पाहणी करायला येतो.

**मर्लिन डिसा :-**

वाकोडे साहेब, मला एक सांगा माझा वॉर्ड शितल नगरमध्ये ८-१० दिवस झाले माती खोदून ठेवली होती तर काहीतरी टेक्नीकल प्रॉब्लेम आला होता. तिकडे सर्व पाणी मी तुम्हाला मेसेज पाठवले. भालेराव साहेबांनी देखील मेसेज पाठविले. ते काम टेक्नीकल प्रॉब्लेममध्ये थांबवले का? दुसऱ्या एका ठिकाणी शॉर्टसर्किट होऊन आग लागली होती अशी कामे करताना लोकांची सेफ्टी बघायची. माझ्या वॉर्डमध्ये दोन रोड बाकी आहेत ते कधी चालू करणार आणि कधी संपवणार.

**सुरेश वाकोडे :-**

मी ते बघून मी तुम्हाला भेटून इन्डीव्ह्यूजवली उत्तर देतो. त्या दोन रोडचे प्लॅनिंगप्रमाणे कधी सुरु करणार ते आपल्याला पत्राने उत्तर देतो.

**मर्लिन डिसा :-**

तुमची पावसाळया अगोदर डेडलाईन कधी आहे.

**सुरेश वाकोडे :-**

मॅडम ते बघून सांगतो.

**प्रभात पाटील :-**

प्रकरण क्र. १०७ चा ठराव टाईप करणे.

**दिनेश नलावडे :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नरेंद्र मेहता :-**

ठराव पुन्हा वाचून दाखवा.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब मेरी सुचना है। इसमें शांतीनगर का समावेश किया जाए।

**लक्ष्मण जंगम :-**

ह्या ठरावाला माझी एक सुचना आहे. मालमत्तेची मलनिःसारण कोणत्याही मालमत्तेची जोडणी मुख्य लाईनपासून साधारण ५० रनिंग फूटापेक्षा जास्त अंतर नसावे अशी माझी सुचना समाविष्ठ करावी.

**जुबेर इनामदार :-**

माझी एक सुचना आहे. भुयारी गटर योजनेची सिव्हरेज लाईन टाकण्याचे काम चालू आहे व रस्ता खोदण्याचे काम चालू आहे. त्या जागी इमारती पर्यंत लाइन टाकण्याचे काम ह्या कामाबरोबरच करण्यात यावें.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब मी एक सुचना दिली आहे. नगरसेवक निधी ज्या सोसायटीमध्ये ज्याची कॅपेसिटी नाही. जे जॉइन्ट करु शकणार नाही अशा सोसायटीचे काम नगरसेवक निधी, प्रभाग समिती निधीमधून नगरसेवकांना करण्यात यावे.

**शरद पाटील :-**

मा. महपौर साहेब, अशी गुणवत्ता कशावरुन पकडणार.

**दिनेश पाटील :-**

एवढी मोठी योजना आखून या शहरामध्ये ब-याच सोसायटया कनेक्शन जॉइन्ट करणार नाही.

**शरद पाटील :-**

पण गरिब आणि श्रीमंत कसे पकडण्यात येईल ते सांगा.

**दिनेश नलावडे :-**

ते मघाशी मंजुर केले आहे. शिवसेनेचे नगरसेवक ह्याला मान्यता देतात. आमच्या सारख्या प्रभागामध्ये अशी परिस्थिती आहे. पैशापोटी पाण्याचे कनेक्शन घेत नाही.

**शरद पाटील :-**

ते बरोबर आहे.

**दिनेश नलावडे :-**

मी सांगतो ही जबाबदारी संपूर्ण नगरपालिकेची आहे. मग कशाला २५,०००/- लावता.

**शरद पाटील :-**

मा. महापौरांना त्यासाठीच विचारतो की ते कसे पकडले ते सांगा.

**जयंत पाटील :-**

सन्मा. नलावडे साहेब ह्या गोष्टीमध्ये तुम्हाला भेदभाव कसा करता येईल. या शहरातील सर्व लोक समान ठेवायला लागतील. तुम्ही गरिबाला माफ कराल आणि श्रीमंताला असा भेदभाव करता येणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही काहीपण काय बोलता.

**दिनेश नलावडे :-**

काही पण बोलत नाही ही परिस्थिती आहे. आज सोसायटया अस्तित्वात नाहीत. कमिटया नाहीत, ते पैसे काढत नाही. अशा सोसायटया माझ्या प्रभागामध्ये आहेत. मग त्यांनी कनेक्शन लावली नाही तर त्याच्यावर दंड ठोकणार की त्याच्यावर कारवाई करणार.

**मा. महापौर :-**

त्या ठिकाणी नाही लावायचे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, ठराव वाचा. ते ऐकून नंतर ठराव मांडू.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०७ च्या ठरावाचे वाचन केले. (टाईप करणे.)

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, ह्या शहरात ८,००० पेक्षा जास्त इमारती आहेत. ह्या खर्चात ही योजना पूर्ण होऊ शकत नाही तरी सभागृहाचे असे मत आहे की माहिती नाही. आम्ही एक वेगळा ठराव मांडतो. आमचे असे मत होते की, स्टॅन्डिंगमध्ये जो ठराव केला आहे तो केला असता तर कामाला सुरुवात झाली असती. शांतीनगर एरियात मार्च किंवा एप्रिलला कामाला सुरुवात झाली असती. तरी सभागृहाचे मत पटत नाही म्हणून आम्ही ठराव मांडतो. (ठरावाचे १०७ वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रमोद सामंत :-**

शांतीनगरमध्ये खर्चच नाही. काय ठराव मांडता शांतीनगरमध्ये सर्वांचे कनेक्शन झाले आहेत. शांतीनगरचा काही प्रश्नच नाही. शांतीनगरमध्ये सिव्हरेजचे कनेक्शन झालेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

बिल्डरने करुन दिलेले आहे.

**अनिल सावंत :-**

ज्यांनी ठराव मांडला आहे, शांतीनगरमधून किती पैसे मिळतील. शांतीनगरमध्ये कनेक्शनच नाहीत. कशाच्या आधारे तुम्ही कनेक्शन चार्ज घेणार.

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

सिव्हरेज प्रकल्पात मुर्धा, राई, मोर्वा, उत्तन, पाली, चौक या परिसरात येत नाहीत म्हणून प्रकल्पाच्या ५०० कोटी खर्चामध्ये एकही पैसा सदर गावात खर्च होत नाही. तसेच कर लावताना वरील गावात सुध्दा कर लावला आहे. तसेच ५०० कोटीच्या हिशोबाने सदर प्रभागवार ४० कोटीचा भार पडणार आहे. करिता वरील प्रभागात विशेष विकासाकरीता विशेष निधी मंजुर करावे.

(सभागृहात गोंधळ)

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, माजी महापौरांना सांगा माहिती घ्या आणि त्याच्यानंतर सांगा. कुठे भुयारी गटारच्या ऑर्डरी आहेत.

**चंद्रकांत मोदी :-**

माजी महापौरने अभ्यास नहीं किया।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, विषय असा आहे की ह्या शहरामध्ये मच्छर आणि इतर दुर्गंधीमुळे लोक नाक मूठीत धरुन चालतात. एवढया वर्षानंतर अंडरग्राउन्ड ड्रेनेज सिस्टम आपल्या शहरात अस्तित्वात आले आणि काही फेजमध्ये कामही पूर्ण झाले आणि आता त्याचे कनेक्शन करण्याचे, ठराव होत असताना अशा पध्दतीचे अडाणी पध्दतीचे धारेण करणार असू आणि लेट होणार असेल तर एवढी मोठी योजना शहरामध्ये आणून काय फायदा. ज्या ज्या ठिकाणी झालेली कामे आहे. त्या ठिकाणी ........

**नरेंद्र मेहता :-**

त्या पैशात होणार आहे तर करुन फायदा काय.

**लक्ष्मण जंगम :-**

ज्या-ज्या ठिकाणी कामे झाली आहेत त्याठिकाणी धोरण नक्की करा आणि करा. ठरावामध्ये स्पष्ट आहे प्रत्येक कनेक्शनची रक्कम नक्की केलेली आहे. त्याच्यामध्ये आपल्याला फक्त अंतर नक्की करायचे आहे आणि फायनल करायचे आहे तर त्याच्यात आपल्याला लेट करण्यात काय अर्थ आहे. एवढी मोठी योजना शहरामध्ये आणायची आणि त्याला लेट करायचे तर काय फायदा. तुमचे मत काय आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, मला उपमहापौर साहेब, हा सेम विषय आठ दिवसापूर्वी स्थायी समितीत येतो त्याच्यावर ह्यांचेच सदस्य, त्यांचेच सभापती त्याच्यावर निर्णय घेतात. पैसे आकारणी करतात ह्याच्यापेक्षा जास्त आकारणी करतात आणि तो ठराव पास होतो आणि आज तो पूढे ढकलायचा. हा सभागृहातला विरोधाभास बघा की ह्यांच्याकडे तो जास्त दराने पास होतो. आम्ही शहरातल्या नागरिकांचे हित लक्षात घेऊन दर कमी करुन तो आणतो त्याला लांबवून लावायचा हा कूठला न्याय आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सचिव साहेब, मतदान घ्या.

**लक्ष्मण जंगम :-**

मतदान घेण्यापूर्वी ह्या सभागृहातल्या सर्व सदस्यांना आणि पत्रकार बंधू ह्याठिकाणी आहेत. त्यांनी ह्याची नोंद घ्यावी की स्थायी समितीमध्ये २५ चे ५० आणि १५ चे ३० अशा पध्दतीचे ठराव मंजुर होतात. सभागृहात ठराव मांडायला तुम्हीच होते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

पत्रकाराने नोंद घेतलेली आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

प्रशासनाच्या अंदाजापेक्षा तुमचा अंदाज होता.

**नगरसचिव :-**

प्रकरण १०७ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील, अनुमोदन सन्मा. अनिल सावंत. दुसरा ठराव सुचक सन्मा. नरेंद्र मेहता, अनुमोदन सन्मा. मिलन पाटील. मी अनुक्रमे दुसरा ठराव मतदानास टाकतो. सन्मा. नरेंद्र मेहता ह्याच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोण आहे का? पहिला ठराव सुचक सन्मा. प्रभात पाटील अनुमोदन सन्मा. अनिल सावंत. ह्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहता ह्यांना ४० मते पडलेली आहेत तसेच विरोधात ३० पडलेली आहेत म्हणून सन्मा. नरेंद्र मेहता ह्याचा ठराव पास झालेला आहे. ठराव कायम करण्यात आलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, खांबित साहेब आले आहेत तर लक्षवेधीच्या विषयावर माहिती उपलब्ध झाली का विचारा?

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, मॅडमने अभी प्रश्न पूछा की टेंडर निकले थे वो कॅन्सल क्यों हो गये। ऐसे मेरे वॉर्ड में भी दो रोड है। की टेंडर निकला था वह कॅन्सल हो गया। उसका यह रिजन दिया की भुयारी गटर योजना आनेवाली है। उसके बाद बनाएगे। अगर बारिश के बाद भुयारी गटर योजना आती है, तो रस्ता लोगो को चलने लायक नही रहेगा तो ऐसे परिस्थिती में बारिश के पहले वह रोड बनाया जाए। खांबित साहब क्या रिजन था जो कॅन्सल किया। खांबित साहब ............ रस्ता और केबीन क्रॉस रोड जो अभिनव स्कुल तक जाता है, दोनो का टेंडर निकला था। वह क्यों कॅन्सल हूआ।

**दिपक खांबित :-**

वहाँ पे सिव्हरेज लाईन डालनी है। सिव्हरेज लाईन डालने के बाद वापस टेंडर निकाला जायेगा।

**स्नेहा पांडे :-**

सिव्हरेज लाईन का प्लान बारीश के बाद का है।

**दिपक खांबित :-**

डबल खर्चा होता है।

**स्नेहा पांडे :-**

बारिश में रस्ता चलने लायक नही रहेगा। बच्चे स्कूल से आते जाते रहते है। पब्लिक कैसे बैर करेगी।

**दिपक खांबित :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, लक्षवेधीला उत्तर देतो. तुम्ही म्हटल्याप्रमाणे, जी-जी आरक्षणे डेव्हलप केली आहेत त्याची माहिती देतो. नवघर आरक्षण क्र. १०९.

**नरेंद्र मेहता :-**

१०९ कूठला.

**दिपक खांबित :-**

नवघर.

**नरेंद्र मेहता :-**

नवघरला कूठे.

**दिपक खांबित :-**

साहेब नवघरला गुरुद्वाराच्या समोर तिथे कुंपण भिंत बांधून गार्डन सुध्दा डेव्हलप झाले.

**नरेंद्र मेहता :-**

किती खर्च झाला?

**दिपक खांबित :-**

सदर ठिकाणी २५ लाख ५२ हजार खर्च झाला.

**नरेंद्र मेहता :-**

उद्यान आज व्यवस्थित सुरु आहे.

**नरेंद्र मेहता :-**

अभिनंदन.

**दिपक खांबित :-**

दुसरे आरक्षण क्रमांक १११ तिथे कुंपण भिंतीचे काम पूर्ण झाले त्याच्यासाठी १५ लाख ५६ हजार खर्च झाला. सदर ठिकाणी आतमधले काम पूर्ण झाले आहे. फक्त इलेक्ट्रीक फिटींग, गार्डनिंगचे जे काम आहे ते काम होऊन

**नरेंद्र मेहता :-**

ते काम कधी केले.

**दिपक खांबित :-**

साहेब ते काम ९/०४/२०१० ला कम्पाऊंडचे काम पूर्ण झाले आणि आता हे काम सुरु आहे. त्यानंतर आरक्षण क्रमांक ११७ तुम्ही जे बोलता ते नवघरच्या पाठीमागचे. इकडे आपण हे काम पूर्ण केले. ह्या कामामध्ये बाजूला जे शाळेचे आरक्षण आहे त्याला कंम्पाऊंड बनवून ते आतमध्ये घेतले. कारण तिकडे मूले क्रिकेट खेळतात.

**नरेंद्र मेहता :-**

ते पूर्ण आरक्षण ग्रिल आणि बाऊन्ड्री झालेली आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब, झालेले आहे. उलट एक्स्ट्रा झालेले आहे. कारण शाळेच्या आरक्षणाला देखील आपण बाऊन्ड्री करुन घेतली आहे. त्यानंतर गोल्डन नेस्टचा आरक्षण क्रमांक ११९ इकडे कुंपण भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. तिकडे ते एस.पी.एम.एल.चे पाईप पडले. त्यानंतर गोल्डन नेस्ट आरक्षण क्रमांक १२२ साहेब हे काम अर्धवट आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आतापर्यंत त्याच्यात किती खर्च केला.

**दिपक खांबित :-**

साहेब तिथे ५० लाख खर्च झाला.

**दिनेश नलावडे :-**

साहेब शाळेचे आपण जे आरक्षण म्हणता त्या शाळेच्या आरक्षणाला कंम्पाऊंड वॉल झालेली नाही. ते आपेन आहे.

**दिपक खांबित :-**

ते तिकडचे मी बोलत नाही.

**दिनेश नलावडे :-**

नवघरचे आता बोलले ना.

**दिपक खांबित :-**

सन्मा. प्रभात मॅडमनी जी सुचना मांडली.

**दिनेश नलावडे :-**

ठीक आहे. आमच्याकडे शाळेचे आरक्षण आहे त्याला कंम्पाऊंड झालेली नाही.

**दिपक खांबित :-**

आरक्षण क्रमांक २२१ हे साहेब तुमच्या शाळेच्या पुढेच आहे. तिकडे काम पूर्ण झाले आहे. तिकडे कंम्पाऊंड आणि ग्रिलसाठी २७ लाख १३ हजार खर्च झालेला आहे. त्यानंतर आरक्षण क्रमांक २४२ जे तुमच्या शाळेच्या बाजूला आहे. त्याला १८ लाख ७६ हजार खर्च झाला आणि ते काम अपूर्ण आहे. आरक्षण २६९ कनाकियाच्या इकडे त्याला कंम्पाऊंड आणि ग्रिलचे काम पूर्ण झाले आहे. त्याला ३८ लाख ३१ हजार खर्च झालेला आहे. आरक्षण क्रमांक १७८ मिरारोड इथे कामावर काही खर्च झालेला नाही. ते न्याय प्रविष्ठ बाब आहे. त्याच्यावर कोर्टात केस चालू आहे. आरक्षण क्रमांक १७० ...... हॉटेलच्या पाठीमागे. तिकडे २५ लाख ३ हजार खर्च झालेला आहे. आरक्षण क्रमांक १०० भाईंदर वेस्ट ब्रिजच्या बाजूला त्याची कुंपण भिंत पूर्ण झालेली आहे. त्याच्यासाठी २० लाख ४६ हजार खर्च झालेला आहे. आणि त्याच्या आतमधले जी कामे आहेत त्याच्यासाठी आमदारांनी २० लाख उपलब्ध करुन दिले त्याच्यातले ...... केले आणि उर्वरित कामाकरीता सभापती स्थायी समिती ह्यांनी १५ लाख उपलब्ध करुन दिले त्या कामाचे टेंडर मागवले आहे. अशी जी कामे झाली आहेत त्याचाच खर्च पडला आहे.

**स्नेहा पांडे :-**

खांबित साहेब आरक्षण क्रमांक ११९ प्ले ग्राऊंड है, उसमें पाईप रखा है तो कॉन्ट्रॅक्टर अपना प्ले ग्राऊंड कब तक यूज करेगा। कॉन्ट्रॅक्टर को पाईप रखने के लिए अपनी व्यवस्था करनी चाहिए।

**दिपक खांबित :-**

अपना काम है। अपने को जगह देनी पडती है।

**स्नेहा पांडे :-**

कुछ मुदत रहना चाहिए दो साल से ऐसे ही पाईप पडे है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, तो तुमचा वॉर्ड आहे तर तुम्हाला माहिती नाही का?

**मा. महापौर :-**

ते नगरपालिकेचे पाईप आहेत. नगरपालिकेचे काम आहे तर नगरपालिकेच्याच कंम्पाऊंड मध्येच ठेवणार.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर साहेब, एक मूदत होती है। प्ले ग्राऊंड है बच्चों को .........

**मा. महापौर :-**

जैसे काम होगा पाईप हटाया जाएगा।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, खांबित साहेबांनी जी आरक्षणाची माहिती दिली त्याच्यात काही माहिती बरोबर दिली काही माहिती चूकीची दिली. मला वाटले होते खांबित साहेब ते कबूल करतील. आम्ही ह्या सभेत पूरावे आणणार होते पण ह्या प्रकारचे काही झाले नाही. कनाकिया विभागाचे जे आरक्षण बोलता ती जी कुंपण भिंत बांधलेली आहे ती आरक्षणावर न बांधता मध्ये एक पट्टा सोडून दिलेला आहे. बिल्डींग वाल्यांनी त्याची लाईन आरक्षण लाईनला बांधली आणि आपण तिकडे अर्धा एकर जागा अशीच सोडून दिली आहे. कारण आरक्षणाची भिंत जिकडे पाहिजे तिकडे बांधली नाही परत ती भिंत पाडावी लागणार आहे. ते डीमार्केशन कोणी दिले आणि ती जागा कोणासाठी सोडली तो खुलासा करावा. एन.एच.स्कुलच्या समोर प्ले ग्राऊंड आहे त्यामध्ये ५०% जागा ताब्यात आली होती म्हणून आपण विकसीत करण्यासाठी सुरुवात केली. एखादे होऊ शकते न्यायप्रविष्ठ असू शकेल पण सगळया ठिकाणी एका रिर्झव्हेशनमध्ये ५० प्लॉट असतील किंवा २५ असतील सर्वांमध्ये न्यायप्रविष्ठ नाहीच आहे. मग ते करायला त्यांना करायला काय प्रॉब्लेम होता. आता हे जे बोलतात आरक्षणे नक्की जी नावे सांगितली ती बाऊन्ड्री ते बाऊन्ड्री बांधली असेल. खांबित साहेब बरोबर आहे. मध्येच कोठे बांधली नसेल हे स्पष्ट आहे. कोठेही अर्ध्यापेक्षा जास्त आरक्षण कामे झाली नाहीत. १२२ चे जे थिएटर होते त्याला जी लागून जागा आहे. तिकडे आपण किती खर्च केला. तिकडे मला सांगा ५० लाखाचे काय

आहे. ते सन्मा. जंगम साहेबांचा वॉर्ड आहे. आपण तिकडून रोज जातो येतो. ५० लाख खर्च केले. नयानगरला २५ लाख खर्च केले. गार्डन रेडी झाले. तिकडे ५० लाख खर्च केला तिकडे बाऊन्ड्री आणि ग्रिलही दिसत नाही. म्हणजे नक्की कोठे केले आहे.

**दिपक खांबित :-**

तुम्ही माहिती मागवली तर ती माहिती दिली लेखी पाहिजे तर लेखी देतो. जागेवर व्हेरीफिकेशन करायचे असेल तर तिकडेही आपण जाऊ.

**नरेंद्र मेहता :-**

ठीक आहे.

**नरेंद्र मेहता :-**

विधी अधिका-यांनी क्लिचर करावे. न्यायप्रविष्ठ जे बोलले ते खरोखर न्यायप्रविष्ठ आहे का?

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, एक विषय तुम्ही खर्चाच्या बाबत बोलले आता तुम्ही बोलले अर्धा एकर जागा अशीच सोडून दिली. महत्वाच्या विषयावर सदस्यांनी लक्ष दया. अर्धा एकर जी जागा सोडून दिली तो नेमका काय विषय आहे. कमिशनरच्या बंगल्याकडून पुढे पुढे गेला. आपला एस.पी.एम.एल.चा प्लान्ट त्याच्यामध्ये आहे. तर अर्ध्या एकरच्या जागेचा खुलासा तुम्ही मागत नाही. त्याच्यामध्ये कोणताही विषय न्याय प्रविष्ठ नाही.

**नरेंद्र मेहता :-**

माझे तेच म्हणणे आहे की तुम्हाला ते डीमार्केशन दिले कोणी. ती अर्धा एकर जागा कशी सुटली.

**दिपक खांबित :-**

व्हेरिफिकेशन करतो.

**नरेंद्र मेहता :-**

आता अतिक्रमण झाले आहे.

**दिपक खांबित :-**

...........................

**नरेंद्र मेहता :-**

मी बोललो माझे काम आहे का?

**लक्ष्मण जंगम :-**

त्यांनी अतिक्रमण केले की दाखवले. त्यांनी दाखवेपर्यंत तुमच्या लक्षात आले नाही म्हणजे अडचणीचा विषय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

नगररचना विभागाने माहिती दयावी. टेक्नीकल विषय आहे. नगर रचना विभाग आपण एका बिल्डींगला इमारतीची गार्डनला लागून परवानगी दिली त्याची अर्धी जागा गार्डनमध्ये अर्धी जागा ...... मध्ये त्यांनी गार्डनचा एफ.एस.आय. वापरला. आणि हद्द कायम झाली. खांबित साहेबांनी मध्येच पूर्ण पट्टा सोडून दिला.

**सत्यवान धनेगावे :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, आरक्षण क्रमांक २६९ मध्ये दिलेली बांधकाम परवानगी आणि रिर्झव्हेशनची आणखी ह्याच्यामध्ये तफावत निर्माण झालेली आहे. त्याची मी स्वतः पाहणी केली आहे. त्यानुसार ते कंम्पाऊंड रितसर करण्यात येईल आणि अतिक्रमणने त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब तुम्ही बोलता ५० लाख खर्च केला आहे. आणि एका साइडला १० लाख महापालिकेने पुन्हा तोडून खर्च करायचे का? तुमच्या चूकीमुळे १० लाख आम्ही भरायचे का?

**सत्यवान धनेगावे :-**

ते तपासून घेऊ. ते टी.डी.आर. कोणाला दिले आहे त्याच्याकडून करुन घेऊ.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांनी ऑलरेडी भिंत केलेली आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

ते बघून तुम्हाला नंतर सांगतो.

**नरेंद्र मेहता :-**

अजून एक केली मध्ये गॅप सोडला.

**सत्यवान धनेगावे :-**

जी वस्तूस्थिती जागेवर आहे ती नाकारता येत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

त्या १० लाखाला जबाबदार कोण.

**सत्यवान धनेगावे :-**

ते नंतर ठरवू.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही मेहनत करायची तुम्ही नंतर ठरवायचे. आपण काय ठरवायचे.

**लक्ष्मण जंगम :-**

उलट चांगला विषय बोलले. तुम्ही प्रत्येक ह्याच्यामध्ये वेळ मागता त्यांनी वेळ दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आरक्षण क्रमांक जो क्विन्स पार्कच्या मागे आणि माझ्या शाळेच्या मध्ये गार्डन आहे. सन्मा. जंगम साहेब खांबित साहेबांचे म्हणणे आहे की क्विन्स पार्कच्या मागचे जे आरक्षण आहे ते पूर्ण रेलिंग लावून कुंपण भिंत लावून तयार आहे असे ह्यांचे म्हणणे आहे. त्या जागेवर एकही रेलिंग आहे का? खांबित साहेब तिकडे रेलिंग वैगेरे लागले नाही. क्विन्स पार्कच्या मागचे तो किती नंबर आहे.

**दिपक खांबित :-**

२४२ ...........

**नरेंद्र मेहता :-**

त्याच्यामध्ये तुम्ही तयार केले. खर्च केला आहे का? जागेवर काहीच नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

किती खर्च केला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. जंगम साहेब तिकडचे स्थानिक नगरसेवक आहेत त्यांना विचारा.

**लक्ष्मण जंगम :-**

किती खर्च झाला ते सांगा.

**दिपक खांबित :-**

कंम्पाऊंडचे २.७६

**नरेंद्र मेहता :-**

ग्रिलचे.

**दिपक खांबित :-**

ग्रिलचे बाकी आहे.

**नरेंद्र मेहता :-**

खर्च केलाच नाही.

**दिपक खांबित :-**

टेंडर आहे २५ लाख ८७ हजार. त्याच्यापैकी १८.७६ लाख खर्च आलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही सांगता माझी शाळा आहे. माझ्या केबिन मधून गार्डन दिसतो.

**दिपक खांबित :-**

बाकी आहे. मी कोठे बोलतो.

**नरेंद्र मेहता :-**

ग्रिल बाकी आहे.

**दिपक खांबित :-**

काही प्रॉब्लेम असेल तर व्हेरीफिकेशन करा.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही सभागृहाला खोटी माहिती देता.

**दिपक खांबित :-**

आम्ही खोटी माहिती देत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

तुमचे काम आहे. तिकडे ग्रील लागली का?

**दिपक खांबित :-**

तुम्ही बोलले तासाभरात माहिती दया. तासाभरात माहिती आणली, आता बोलता साईटवर जा साईटवर जाऊन येतो.

**नरेंद्र मेहता :-**

खर्चाप्रमाणे तिकडे ग्रील लावली का?

**दिपक खांबित :-**

आता माझ्या लक्षात नाही. फाईल बघायला लागेल.

**नरेंद्र मेहता :-**

काय लक्षात आहे.

**दिपक खांबित :-**

तुम्ही फिजीकल व्हेरीफिकेशन करा.

**नरेंद्र मेहता :-**

मग तुम्ही का सांगितले तो विकसीत करण्यात आले आहे. असे तुम्ही भाषणात सांगितले. माझ्यावर विश्वास नाही तर स्थानिक नगरसेवक आहेत त्यांना विचारा.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही ग्रिल लावल्याचा खर्च आहे का?

**दिपक खांबित :-**

माझ्या लक्षात नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

तिकडे ग्रिल नाही.

**नरेंद्र मेहता :-**

खांबित साहेबांना गल्लीपासून सगळया गोष्टी माहिती असतात आता ते बोलतात माहित नाही.

**दिपक खांबित :-**

२४२ मी बघीतली नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. नरेंद्र मेहताजी तुमच्या शाळेच्या बाजूच्या आरक्षणाबद्दल मी तुम्हाला तीन-चार वेळा बोललो होतो. तुम्ही मला पाण्याची टाकी बांधून देणार होते. वृक्षप्राधिकरणाच्या अधिका-यांना ब-याच वेळेला घेऊन गेलो. यतिन जाधव त्यावेळेला इंजिनियर होते. त्यांना पण ब-याच वेळेला घेऊन गेलो. परंतु ते काम काही पूर्ण झाले नाही. गार्डन आणि आरक्षणे डेव्हलप करण्याच्या पलीकडे जाऊन तुमच्या चॅनलला माझ्या परिसरात खड्डे पडले ते दाखवत होते. अगोदर पाच वर्षे तुम्ही तिकडचे नगरसेवक होते आणि अडीज वर्ष महापौर म्हणून मी विचार केला की गार्डन राहू दया. लोकांना चालायला पहिला रस्ता होऊ दया. त्यामुळे आम्ही रस्ता आणि गटाराकडे जास्त लक्ष देत होते. ह्या विषयावर मी तीन-चार वेळा बोललो परंतु ह्यांनी काही त्याच्यावर लक्ष दिले नाही. माझे ही त्या विषयावर लक्ष केंद्रित नव्हते. माझा विषय होता की, लोकांना चालण्यासाठी रस्ता, पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार ह्या विषयाकडे जास्त लक्ष दिले.

**नरेंद्र मेहता :-**

मी काय लक्ष दिले तुम्ही काय लक्ष दिले हा विषय नाही. जो जागेवर खर्च केला आहे तो नाहीच आहे. महापालिकेने चार करोड खर्च केला आहे. साहेब लक्षवेधी माझी आहे मला बोलू दया.

**लक्ष्मण जंगम :-**

ह्यांचे कसे आहे त्यांचा आरक्षणाचा अभ्यास आहे. कुठल्या ठिकाणी आरक्षण आहे, कुठे डेव्हलप झाले आहे, कुठे झाले नाही ते सांगायची गरज नाही. सभागृहाला माहित आहे. कोणत्या ठिकाणी आरक्षण डेव्हलप करायला पाहिजे ते डेव्हलप केल्यावर काय हित होणार आहे हा तुमचा हमेशाचा अभ्यास राहिला आहे. म्हणून मी बोलत नाही. या शहरातले सगळे नागरिक बोलतात. मला तुम्ही विचारले म्हणून मी तुम्हाला सांगतो. कोणते अधिकारी काय करतात ते तुम्हाला जास्त माहिती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

तुम्ही तिकडे बोला. मला आरक्षणाची माहिती आहे ह्याचा तुम्हाला प्रॉब्लेम आहे की अभिमान आहे ते सांगा.

**लक्ष्मण जंगम :-**

अधिका-यांच्या बाबतीत काय शंका असेल तर तुम्ही निरसण करा. मला काही बोलायचे नाही. परंतु तुम्ही बोलले की हे वॉर्डाचे नगरसेवक आहेत त्यांना सांगा. अस म्हटल्यानंतर मी निश्चितपणे त्या कामाचा पाठपुरावा केला आहे. पण त्याच्यापेक्षा अडचणीचा विषय होता त्याच्याकडे लक्ष केंद्रित केले होते. तुमचे फक्त ह्या विषयाकडे असेल एवढाच फरक.

**नरेंद्र मेहता :-**

त्यांना माहित असले पाहिजे किती खर्च झाला, कुठे ग्रिल लागली मी त्याच्यावर लक्ष ठेवू का मी किती काम करु.

**कांचन पुजारी :-**

खांबित साहेब, १७८ चे आरक्षण आहे त्याचा काय प्रॉब्लेम आहे ते सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

ह्याचा वॉर्ड आहे मला हिशोब ठेवायला लागतो. मा. महापौर साहेब आमचा फक्त एकच विषय आहे की चार करोड खर्च केले ते वाया गेले आहे.

**दिपक खांबित :-**

चार नाही दोन कोटी साठ लाख.

**नरेंद्र मेहता :-**

दोन कोटी साठ लाख खर्च केले आहेत. आम्ही पुढच्या वेळी पुन्हा कागज, पत्र, फोटो सहित ह्या सभागृहात सादर करु.

**मा. महापौर :-**

पुढच्या मिटींगला रितसर माहिती देण्यात यावी.

**सई वडके :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, आरक्षण क्रमांक १७८ ह्या संदर्भात २-३ दावे कोर्टात प्रलंबित आहे. एक दावा आहे स्पेशल सिव्हिल सूट ७६०/२००९ आणि आर.सी.एस. ४३/२०११. दोन्ही दावे कोर्टामध्ये प्रलंबित आहेत. ४३/२०११ मध्ये दोन सर्व्हे नं. इनव्हॉल्व आहेत. ४९८ हिस्सा नं. ९ आणि ४९८ चा हिस्सा क्र. १.

**जुबेर इनामदार :-**

कोर्टात स्टे वैगेरे मिळाला आहे का? काम करु शकत नाही का? कुंपण भिंतीचे काम सुरु केले आहे ते बंद करायला लागेल.

**सई वडके :-**

सर त्याच्यामध्ये स्टे आहे.

**जुबेर इनामदार :-**

एक्झाक्टली कुठे आहे एका बाजूला आहे कि मधोमध आहे. त्याचा काही खुलासा नाही.

**सई वडके :-**

ते मला माहित नाही.

**जुबेर इनामदार :-**

पत्रव्यवहार करुन मला त्याचे व्यवस्थित उत्तर मिळाले नाही.

**सई वडके :-**

मी दाव्याचे सांगेन पण फिजीकल पजेशन बद्दल बोलता येणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याला तसे करता येणार नाही का? एका बाजूला असले तर कुंपण भिंत जेवढी क्लीअर आहे तेवढी बांधता येत नाही का?

**सई वडके :-**

दाव्यामध्ये जो सर्व्हे नं. आहे त्याच्यावर स्टे आहे.

**जुबेर इनामदार :-**

धनेगावे साहेब, हा विषय तुमचा आहे.

**सत्यवान धनेगावे :-**

आरक्षण क्र.१७८ मध्ये न्यायालयात दोन दावे चालु आहे त्यांनी दोन्ही दाव्यामध्ये रिस्टनिंग ऑर्डर आहेत आणि सुट प्रॉपर्टी असल्यामुळे ते बांधकाम करता येत नाही.

**जुबेर इनामदार :-**

आपल्याला बांधकाम करायचे आहे. जिथे जसे आहे ते तोडुन किंवा वगळून .....

**सत्यवान धनेगावे :-**

जी जागा हॅन्ड ओव्हर केली त्या हॅन्डओव्हर केलेल्या जागेच्या वर स्टे आहे. त्यामुळे बांधकाम करता येणार नाही.

**विजया वैती :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, सगळीकडे गार्डन झाले मग माझ्या वॉर्डमध्ये गार्डन का नाही?

**दिपक खांबित :-**

विषय क्र.१११ मध्ये तुमचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

जेवणाची सुट्टी १.५५ ते ३.१५.

**लक्ष्मण जंगम :-**

अंडरग्राऊंड ड्रेनेजच्या विषयावर बरीच चर्चा झाली दोन ठराव झाले. हे दोन्ही ठराव झाल्यानंतर ही योजना तुर्त चालू होणार असे त्याचे भवितव्य दिसत नाही. माजी महापौरांना आणि सभागृहातल्या सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, शहरामध्ये एवढी वाईट परिस्थीती आहे की, पावसाचे पाणी अंडरग्राऊंड ड्रेनेजचे पाणी ते ४-४ फुट ते २-३ फुट काही परिसरामध्ये साचून राहते त्याच्यामध्ये प्रामुख्याने शांतीपार्क आहे, क्वीन्स पार्क, आयडीयल पार्क शांतीनगर म्हणजे ह्या शहरातला जो-जो डिप भाग आहे त्यांची परिस्थीती अशी आहे ही परिस्थीती लक्षात घेता ह्या सभागृहात दोन-दोन ठराव झाले असले तरी सर्व सदस्यांनी मा. महापौर, उपमहापौर, मा. आयुक्त साहेब सगळे अधिकारी आपण सर्वांनी ह्या शहरात जी योजना अस्तित्वात येते मग ५० चा एका गटाने ठराव केला असला आणि एका गटाने २५ चा ठराव केला असता तर त्याच्यामध्ये प्रशासनाची भुमिका जाणुन घेऊन आपल्या सगळ्याचे मत ठेवून ह्या शहराच्या हिताच्या दृष्टीकोनातून ह्या सभागृहाने एकच ठराव करावा अशी मी तुम्हा सर्वांना हात जोडुन विनंती करतो कारण प्रत्येक वर्षी पावसाचा शहरातील नागरीकांना त्रास होतो. आपल्याला त्रास होतो कोणाला किती प्रमाणात होतो

त्याच्यापलिकडे जाऊन ह्या शहरवासियांना त्रास हातो ते लक्षात घेऊन आपण सभागृहाच्यावतीने एकच ठराव करु जेणेकरुन महानगरपालिकेच्या काम करणा-या प्रशासनाला देखील अडचण होणार नाही. आर्थिक पोझीशन आहे ती चांगली राहिल आणि या योजनेचा शहरवासीचांना लाभ मिळेल त्यासाठी आपण एक ठराव करावा अशी मी सर्वांना हात जोडुन विनंती करतो.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. सदस्य जंगम साहेबांनी चांगला निर्णय घेतला आमची वारंवार तीच विनंती होती की, शहराचे हित लक्षात घेता येणारा पावसाळ्याची काळजी घेता ज्या भागात खाली गेलेल्या बिल्डींग आहेत त्याला मोठ्या प्रमाणात फायदा होईल आणि प्रत्येक लोकप्रतिनिधी विचार करतात की, किती स्वस्तामध्ये करुन द्यावे जेणेकरुन नागरीकांचे समर्थन भेटेल. आम्ही ठराव करु शकतो की १०,०००/- करा १५ ला कशाला पण शेवटी ही योजना पूर्ण झाली पाहिजे म्हणजे रेव्हेन्यु येईल एक करोड आणि खर्च चार करोड येईल तर पुढची कामे होणार नाही म्हणून आम्ही खास विनंती केली आहे की, आपण २५ जरी ठेवले तरी ५० टक्के खर्च महापालिकेला होणार आहे. हळूहळू ही योजना पूर्ण करता येईल. स्थायी समितीमध्ये जरी सत्ताधा-यांनी ठराव केला तरी सर्व बाजूंनी विचार करुन मा. आयुक्तांना विश्वासात घेऊन, वाकोडे साहेबांना विश्वासात घेऊन तीन दिवस चर्चा झाली आणि अंतिम निर्णय काढला आम्ही तर हेच सांगितले होते की, फुकटमध्ये करा पण एखादी योजना शहरात राबवायची असेल तर त्याला पैसे लागणार कारण बोलण चालणार का? की मी ठराव करतो तो ५,०००/- करा त्यासाठी एक वाया मिडीया आहे की २५,०००/- ठरवलेले आहेत आणि ५०,००० रुपये तीन विंग, चार विंग आणि पाच विंगची मोठी इमारत आहे त्यांना लागणार आहे. त्यांना पर बिल्डींग १०,०००/- खर्च येणार आहे आणि भाईंदर ईस्ट आणि वेस्टला जास्त खर्च येत नाही कारण दोन फुटावरच रोड आहेत स्टँडीगमध्ये जो ठराव केलेला आहे त्याप्रमाणे ह्याची अंमलबजावणी व्हावी जेणेकरुन मिरारोड क्विन्सपार्क जो भाग खाली गेलेला आहे तिकडे ही सुविधा लवकराल लवकर राबविता येईल आणि चांगला मेसेज ह्या शहरात देता येईल की, अंडरग्राऊंड भुयारी गटर योजना सुरु केलेली आहे आणि मा. महापौर साहेब आपल्याच काळात ही सुरु होते. तर स्टँडींगच्या ठरावाला सर्वानुमते मंजुर करु या अशी मी सभागृहाला विनंती करत आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब ह्याठिकाणी ह्या विषयावर दोन ठराव आलेले हाते मतदान झालेले आहे. सन्मा. महापौरांनी ठराव बहुमताने मंजुर असे रुलिंग दिले आहे ह्या सगळ्या घडामोडी घडल्या आहेत त्याच्याउपर पून्हा आपण आणखी म्हणायचे की, स्थायी समितीने जो ठराव केला तो मानत असाल तर मान्य करु तर कायद्याची अशी तरतुद आहे का? नक्की काय चालले आहे ते मला कळत नाही. सन्मा. सदस्य आणि माजी विरोधी पक्षनेता लक्ष्मण जंगम किंवा सन्मा. माजी महापौर नरेंद्रजी मेहता सर्वांनाच लोकांची काळजी आहे.

**जयंत पाटील :-**

आपल्याला काय म्हणायचे आहे.

**आसिफ शेख :-**

माझे असे म्हणणे आहे की, एकदा ठराव झाला त्याला अनुमोदन दिले. बहुमताने ठराव मंजुर झाला त्याला रुलिंग दिलेले आहे त्याच्या उपर असे करणे त्याच्यासाठी कायद्यात रुलिंग आहे का?

**जयंत पाटील :-**

माझ्या माहितीप्रमाणे विरोधी पक्षनेते असे आहे की, सभा चालु आहे. सभा संपलेली नाही त्याच्यामुळे तो ठराव आपण रिव्हर्स करु शकतो.

**आसिफ शेख :-**

सचिवांनी नियम सांगावे.

**जयंत पाटील :-**

ते करतील सन्मा. जंगम साहेबांनी जे सांगितले ते सन्मा. नरेंद्र मेहतांना मान्य आहे. तर शहराच्या हिताच्या दृष्टीने हा विषय आपण पून्हा आजच्या सभेमध्ये घेऊन....

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्यावर मतदान झालेले आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सन्मा. इनामदार साहेब, मतदान झाले असले तरी आपण दुस-या विषयाला सुरुवात केली नाही आणि सर्वानुमते होत असेल........

**आसिफ शेख :-**

ठराव वाचून कायम केलेला आहे.

**भगवती शर्मा :-**

बाद मे हमारे ठराव विखंडीत हो जाते है। कायदेसे हिसाब से बोलो।

**आसिफ शेख :-**

सचिव साहेब, नियम काय सांगतो.

**प्रभात पाटील :-**

सचिवांनी बोलण्याच्या अगोदर सांगते ह्या विषयाला सुरुवात इथे झाली हे पण सभागृहाला कळले पाहिजे. सन्मा. माजी महापौर ते स्वतः इथे सांगायला आले की ह्याच्यातुन आपण सुवर्णमध्य काढावा. इकडे तिकडे बोट करुन चालणार नाही त्यांची भुमिका आम्हाला पटली म्हणून हा विषय त्याच्याजवळ बोलायला गेलो अन्यथा आम्ही नव्हतो गेलो.

**नरेंद्र मेहता :-**

ताई, यायचा विषय नव्हता मी आलो असा विषयच नाही.

**भगवती शर्मा :-**

नियमाप्रमाणे असले पाहिजे.

**मा. महापौर :-**

शहरवासियांच्या हिताचे असेल तर एक मताने हरकत नाही.

**आसिफ शेख :-**

शहराच्या हिताचे जरी असले तरी आपण सगळ्या गोष्टी कायद्याला अनुसरुन सभागृहाचे कामकाज व नियमाला अनुसरुन केले पाहिजे. ही जी आपली कृती आहे ती पश्चात बुध्दी आहे.

**प्रभात पाटील :-**

तुमचीच आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभागृह नेता मी तुम्हाला किंवा कोणा एका व्यक्तीला बोलत नाही मी जे कामकाज चालले आहे त्या प्रणाली बद्दल बोलतो. मा. महापौर साहेब, तुम्हाला अधिकार आहेत तुम्ही सर्वांचे महापौर आहात विषय घेऊन मिटींग लावा. आम्ही समर्थन करु एकदा गोष्ट झाल्यानंतर चुकीचा पायंडा करु नका.

**मा. महापौर :-**

एकदा विषय झाल्यावर तीन महिन्याशिवाय घेता येईल का? तुम्ही काय गोष्टी करता.

**आसिफ शेख :-**

ही पश्चात बुद्धी आहे हे कायद्याला अनुसरुन नाही.

**मा. महापौर :-**

सर्व ठिकाणी पश्चात बुध्दी आपणच करणार आहोत.

**आसिफ शेख :-**

आपण नाही करत सचिवांना म्हणा सचिवांनी बोलले तर आमची हरकत नाही सचिवांनी नियम सांगावे ते हो बोलले तर सभागृहाची कोणती हरकत राहणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आपणच खुलासा करावा.

**नगरसचिव :-**

सभागृहाने एकदा ठराव केल्यानंतर त्याच्यात दुरुस्ती व बदलाचा फेरफार तीन महिन्याच्या आत तो करता येत नाही. ह्या ठरावावर मा. महापौरांनी स्पष्ट रुलिंग दिलेले आहे. मतदान झालेले आहे ह्या ठरावात फेरबदल करणे शक्य नाही.

**भगवती शर्मा :-**

२(क) खाली विषय....

**आसिफ शेख :-**

विषय पुन्हा घेता येईल का?

**नगरसचिव :-**

तो विषय घेता येणार नाही.

**मा. महापौर :-**

ह्या विषयी सभागृहाचे मत काय आहे.

**नरेंद्र मेहता :-**

स्टँडींगने जो ठराव केला आहे तो मान्य करुन कामाला सुरुवात करणे असे आमच्या सर्वांचे मत आहे.

**मा. महापौर :-**

सर्वांचे एक मत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सभागृहाचे मत आहे की, ही योजना झाली पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

हमारा कोई आपत्ती नही है। बादमे यही बोलेंगे की इसको नही मानेंगे उसको नही मानेंगे फिर हमारे सदन का अपमान होता है। वह नही होना चाहीए। हम आज भी सर्वानुमते बोलेंगे वह करने के लिए तयार है। बादमे यह नही होना चाहिए की, यह ठराव नही। यह बोलो हमारी भावना हम करते है।

**नगरसचिव :-**

कायदेशीर जे मत होते ते मांडले आहे.

**मा. महापौर :-**

आपल्याला मंजूर आहे का?

**नगरसचिव :-**

पहिला जो ठराव झाला आहे तो मंजूर, रुलिंग झालेले आहे. कायम झाला आहे. वाचून कायम झालेला आहे.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, माझा एक विषय आहे मला एक मिनिट मिळेल का? मा. महापौर साहेब मला परवानगी मिळेल का? साहेब माझ्या वॉर्डाच्या बाजूला बिल्डींगमध्ये १४ तारखेला एका तीस वर्षाच्या मुलाने आत्महत्या करुन घेतली.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश नलावडे :-**

साहेब, ती बॉडी आम्ही टेंभा हॉस्पीटलला घेऊन आलो. त्यावेळेला टेंभा हॉस्पीटलचे डॉ. कोळी त्यांना फोन केला ते घरी असून देखील आले नाहीत. माझी तब्येत ठिक नाही मी येत नाही. उद्या सकाळी बघेन. आमचे नगरसेवक सन्मा. राजेश वेतोस्कर वगैरे आम्ही टेंभा हॉस्पीटलमध्ये होतो. त्यावेळेला डॉक्टर बोलले मला गाडी पाठवली तर मी येईन. माझी तब्येत ठिक नाही. आम्ही त्यांची दुपारपर्यंत वाट बघितली. पाणपट्टे साहेबांना फोन केला तर ते इलेक्शनच्या ड्युटीमध्ये होते. कमिशनर साहेबांना ३ फोन केले. मला बोलले १०-१५ मिनिट थांबा. बॉडी किती वेळ ठेवायची त्याला एक प्रमाण आहे. त्यानंतर ३-४ वाजता आम्हाला कमिशनरचा फोन आला. डॉक्टर फोन पुन्हा लागत नाही. शेवटी त्या गरिब कुटूंबाने ती बॉडी इथून नेऊन सिव्हील हास्पीटलमध्ये क्लेम करुन रात्री उशीरा आणली. ही परिस्थिती टेंभा हॉस्पीटलची आहे. मा. महापौर साहेब, अतिशय गंभीर विषय आहे. त्या बॉडीची अतिशय वाईट अवस्था झालेली.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मी पोटतिडकीने बोलतो. मी बोललो माझ्या स्वतःची गाडी देतो परंतु त्यावेळेला तुम्ही सपोर्ट केला नाही.

**अनिल सावंत :-**

प्रासेडींग काढून बघा. आम्ही सपोर्ट केलेला.

**मिलन पाटील :-**

तुम्ही रुलिंग दिले नाही.

**दिनेश नलावडे :-**

आमच्या माहितीप्रमाणे डॉ. कोळींना ह्या ठिकाणी रहायचे नाही. त्यांना बदली करुन पाहिजे. म्हणून ह्या शहरामध्ये ही आणीबाणी चालु आहे.

**मिलन पाटील :-**

सन्मा. नलावडे साहेब, कमिशनरांना विचारा मी बोललो होतो. माझ्या स्वतःची गाडी देतो. मला फक्त सन्मा. मिलन म्हात्रेंनी मला सपोर्ट केला. तुम्ही कोणी बोलले नव्हते.

**दिनेश नलावडे :-**

आम्ही तुमच्या बरोबर होतो.

**मिलन पाटील :-**

डॉक्टर करीता गाडी मी बोललो होतो.

**दिनेश नलावडे :-**

मा. आयुक्त साहेब, तुम्ही डॉ. कोळींना फोन केला की नाही त्या विषयी माहिती द्या. आणि त्याच्यावर काय कारवाई करणार?

**एस. ए. खान :-**

त्या डॉक्टरांची नेहमी तक्रार असते ते कधीही जागेवर नसतात. मला गाडी पाठवा आणि ते एक दिवसानंतर येतात बॉडी तशीच पडून राहते.

**जयंत पाटील (मा. उपमहापौर) :-**

हा सभागृहातला एकदम गंभीर विषय आहे सन्मा. वंदना पाटील त्यांच्या इकडे कोणी तरी आत्महत्या केली होती, त्यांनी सांगितले त्यांची स्वतःच्या गाडीची मागणी आहे. आणि आपण त्यांना गाडी देऊ शकत नाही. त्यांना हे जमत नाही तर त्यांनी सोडायला पाहिजे होते. आपण दुसऱ्या कोणाला अपॉईन्ट केले असते. परंतु गाडी मिळण्यासाठी जर ते अशा गोष्टी करत असतील तर ते चूकीचे आहे.

**वंदना पाटील :-**

मा. महापौर साहेब, डॉ. कोळींचा काही दोष नाही. त्यांना त्या पगारात.......

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

डॉ. कोळींना आम्ही पण वेळोवेळी आग्रह धरला आहे. जेव्हा आपण रात्री आठ नंतर किंवा सकाळी ५ वाजता लवकर बोलवायचा प्रयत्न करतो तेव्हा ते सांगतात की, माझ्याकडे साधन नाही. मला पनवेल वरुन बसने यायला लागेल.

**राजेश वेतोसकर :-**

ह्याच्यात डॉक्टरचा दोष आहे आम्ही सकाळी १०.०० वाजता फोन केला ११ व १२ वाजता देखील फोन केला तरीपण ते यायला तयार नव्हते मग मी कमिश्नरांना फोन केला की आता या डेड बॉडीचे काय करायचे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, त्यादिवशी माझ्या वॉर्डमध्ये देखील मयत झाले होते. त्यांना गर्दनमध्ये चनक पडली होती तेव्हा मी आणि सन्मा. ध्रुवकिशोर पाटील आम्ही दोघांनी आग्रह केला की यंग बॉडी आहे तुम्ही कसेतरी या ते बोलले माझी चमक पडली आहे त्यादिवशीची तुमचीपण घटना आहे त्यावेळी मी आणि सन्मा. ध्रुवकिशोरांनी प्रयत्न केला की गाडी पाठवू कारण ती यंग बॉडी होती त्यादिवशी त्याची चमक पडली होती म्हणून त्यांनी गाडीची मागणी केली बाकीच्या दिवशी आम्ही कधी ऐकले नाही डॉ. कोळींनी आम्हाला सहकार्य केलेले आहे.

**राजेश वेतोस्कर :-**

आदल्या रात्री मला सांगितले की मी सकाळी येणार आणि सकाळी त्याची तब्येत अचानक बिघडली काय?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

तुमच्या भावनेचा मी विरोध करीत नाही पण प्रत्येक वेळी त्या माणसाने कोऑपरेशन केलेले आहे.

**मा. महापौर :-**

डॉ. कोळी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येत आहे असा ठराव करतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, हे चुकीचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**राजेश वेतोस्कर :-**

आम्ही त्या गोष्टीला विटनेस आहोत.

(सभागृहात गोंधळ)

**वंदना पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते आपण महापालिकेत एवढ्या गाड्या आहेत तर आपण त्यांना एक गाडी देऊ शकत नाही का?

**मा. महापौर :-**

तो डॉक्टर मग अजून काय मागेल गाडी घोडा मागेल आपण स्वतःचा डॉक्टर नेमुया.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, प्राथमिक आरोग्य केंद्र टेंभा तिकडचे डॉक्टर कोळी यांना आमच्या ज्या-ज्या सदस्यांनी फोन केला त्या वेळेला ते आलेले आहेत आपल्याला त्यांना बदलायाचा असेल तर जोपर्यंत नविन डॉक्टर येत नाही तोपर्यंत त्यांना बदलू नका अशी आमची विनंती आहे नाहीतर हा पण नाही तो  पण नाही बॉड्या तशाच जातील आणि अजून त्रास होईल हे आपण लक्षात घ्या.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर साहेब, विरोधी पक्षनेते सांगतात की आम्ही ज्याज्या वेळेला फोन केला त्यावेळेला डॉक्टर आहे मग आता का नाही आले?

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

ठाकूर निवास इकडे एकाने फास घेतला आम्ही त्यांना फोन केला आणि डॉक्टर आले.

**दिनेश नलावडे :-**

एक केस झाली ना आम्ही असे नाही म्हणत की, ते प्रत्येक केससाठी येत नाही पण अशा काही केसना अडचण आली आहे ना मग ते सिव्हील हॉस्पीटलमध्ये गेले.

**आसिफ शेख :-**

नविन डॉक्टर मागवा पण जुन्याला सोडु नका हा पण नाही तो पण नाही.

**दिनेश नलावडे :-**

हाच नियम इकडे लागेल दुसरे डॉक्टर आल्याशिवाय ते जाणारच नाही.

**आसिफ शेख :-**

ते आताच रुलिंग देतात चुकीचे रुलिंग देतात.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब, तुम्ही विषयांतर कशाला करता विषय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब, आपल्याकडे शववाहीन्या किती आहेत?

**मिलन पाटील :-**

मा. महापौर साहेब विषय घ्या तुम्ही ठरवून आले आहेत का की, मिटींग चालून द्यायची नाही?

**जुबेर इनामदार :-**

एक शववाहीनी नादुरुस्त आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

विषय घ्या.

**एस.ए.खान :-**

सचिव साहेब, कुठे सांगितले विषय घ्या म्हणून सचिव साहेब खाली बसा.

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौरांनी तुम्हाला आदेश दिला आहे तुम्ही पुढचा विषय वाचा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर आपल्या चार प्रभागामध्ये चार शववाहीन्या होत्या प्रत्येक प्रभागाला एक शववाहीनी होती आज मी फोन केला तर दोन शववाहीनी आहेत.

**शरद पाटील :-**

मा. महापौर साहेब, हा विषय आहे का? प्रत्येक वेळेला विषय नसताना तुम्ही बोलता.

(सभागृहात गोंधळ)

**मिलन पाटील :-**

तुम्ही ठरवून आले आहेत का? मिटींग चालवायची नाही म्हणून तमाशा चालला आहे का?

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र.१०८ टाईप करणे.

**भगवती शर्मा :-**

प्रकरण क्र.१०८ ठराव टाईप करणे.

**मदन सिंह :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, ह्या सभागृहात पहिल्यांदा घटना घडली आहे. सभागृहाने सांगितलेले काम दोन तासामध्ये झाले आहे. गोल्डन नेस्टला जे पुतळे होते ते काढलेले आहेत असा मला एसएमएस आला आहे अधिका-यांचे धन्यवाद।

**नगरसचिव :-**

(प्रकरण क्र. १०८ चा ठराव टाईप करणे.) सुचक श्री. भगवती शर्मा, अनुमोदन श्री. मदन सिंह.

**अनिल सावंत :-**

तुम्ही त्याच्यामध्ये ९३ नंबरचा ठराव कोणता सांगितला? तुम्ही ९३ नंबर ठरावाचा उल्लेख केला, तो कोणता आहे? तो कधी झाला होता?

**नगरसचिव :-**

फक्त ठराव क्र. ९३ म्हटलेले आहे.

**अनिल सावंत :-**

तो कोणता आहे?

**नगरसचिव :-**

२००७ चा आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही फक्त त्याचा उल्लेख करता आहात.

**नगरसचिव :-**

मी आहे तसाच वाचला.

**अनिल सावंत :-**

त्याच्यामध्ये स्टँडींगला जो ठराव झाला तो त्यांनी नामंजुर केला. असाच त्याचा अर्थ होतो ना? प्रशासनाने जे धोरण दिले होते, ते मा. स्थायी समितीने मान्य करुन मा. महासभेपुढे पाठवले आहे ना? त्याच्यामध्ये काही चेंजेस केलेले नाहीत ना? म्हणजे हा ठराव विखंडीत झाला? याच्यापुढे मा. स्थायी समितीमध्ये ठराव करु नका किंवा विषय घेऊ नका. ९३ चा काय आहे ते उल्लेख करा.

**नरेंद्र मेहता :-**

ते नंबर त्यांना आणून दाखवा.

**अनिल सावंत :-**

ते सभागृहाला कळले पाहिजे तर आम्ही ठराव करु. शहराच्या हितामध्ये आहे की अहितामध्ये आहे, तो ९३ चा ठराव दाखवा. त्याच्यामध्ये काय दर आहे? ते १०% वाढवत आहेत.

**भगवती शर्मा :-**

तो आम्ही कसा देऊ? आम्ही जो केला तो आमचा ठराव आहे. आम्ही तुम्हाला काय परत देऊ?

**अनिल सावंत :-**

तो ठराव मा. महासभेचा आहे की, तुमच्या घरचा आहे ते आम्हाला कसे कळणार?

**लक्ष्मण जंगम :-**

सन्मा. सदस्य श्री. भगवती शर्मा, तुम्ही जो ठराव केला तो जाहिर वाचायला सांगितला. या सभागृहाला माहिती मिळाली, मग ती ९३ ची पण मिळाली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

गोषवाऱ्यामध्ये ९३ चा उल्लेख कुठे आहे?

**जुबेर इनामदार :-**

९३ नंबरचा ठराव मागवून घ्या.

**नगरसचिव :-**

तो १७/०३/२००७ चा ठराव क्र. ९३ आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

पण तो ठराव काय आहे, तो समजायला नको का?

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, मा. महापौर साहेब, आता आपण कॅपिटेशन फीमध्ये वाढ केलेली आहे. शहराची गरज बघता लोकसंख्येची वाढ झालेली आहे. इमारतींची वाढ झालेली आहे. म्हणून दरवाढ ही गरजेची आहे, म्हणून कॅपिटेशन फीमध्ये वाढ केलेली आहे. आता मिरा भाईंदरमध्ये दोन करोड लावले जातात. एक नॅशनल कोड आहे, जो फायरचा कोड आहे. दुसरा आपल्या महापालिकेचा डी.सी. रुल आहे. ज्यावेळी आपण फायरच्या एन.ओ.सी.साठी जातो, कारण आपण कॅपिटेशन फी त्यांच्याकडूनच वसुल करणार आहे. ज्यावेळी इमारतीला आपण परवानगी देतो, त्यावेळी एन.ओ.सी. ची गरज पडते. आता श्री. क्लासो साहेब हे चिफ ऑफीसर आहेत. कोणतेही प्रकरण त्यांच्याकडे गेले की, नॅशनल कोड दाखवतात. आणि महापालिकेचे नगररचना विभाग ज्यावेळी प्लान पास करतात, ते डी.सी.रुल प्रमाणे करतात. म्हणजे नक्की कोणते धोरण ठरवायचे? दोघांचे मॅच होत नाही. आता काहीमध्ये मा. आयुक्तांना साईट मार्जिन ओपन स्पेस यामध्ये रिलॅक्सेशनचे अधिकार आहेत. आता ते धरल्यानंतर नॅशनल कोडचे मॅच होतच नाही. आणि अशी अनेक प्रकरणे पडलेली असतात. मग ज्यावेळी आपण विकासकांकडून हक्काने १०% वाढ करुन घेतो. मग त्यांच्या या सुखसुविधा, अनेक प्रलंबित, मला वाटते आज त्यांच्याकडे फायर एन.ओ.सी. ची प्रकरणे प्रलंबित पडलेली आहत. आता जुन्या इमारतीला आपण रिडेव्हलपमेंटला देतो, त्याला दिड मीटर परवानगी आहे. आता दिड मीटरमध्ये फायरटेंडर जाणार आहे का? डी.सी. रुलमध्ये तरतुद आहे. मग आता डी.सी. रुल इम्प्लीमेंट करायचे की, एम.बी.सी. कोड इम्प्लीमेंट करायचे? जी गडबड चाललेली आहे, दोन डिपार्टमेंटमध्ये कम्युनिकेशन गॅप आणि यामध्ये विकासक इकडे तिकडे धावत असतो. फायर डिपार्टमेंटकडून कोणत्याही प्रकारची एन.ओ.सी. मिळत नाही. आणि डी.सी. रुलमध्ये स्पष्ट म्हटले आहे की, ज्या डी.सी. रुलमध्ये कोणत्याही बाबतीत प्रोव्हीजन केलेली नाही फक्त त्यासाठी नॅशनल कोडचे इम्प्लीमेंट करावे. पण आपण जे डी.सी. रुलमध्ये क्लीअर आहे, त्यासाठी नॅशनल कोड इम्प्लीमेंट करतो. मा. आयुक्त साहेब, आपण हे नक्की करा की, डी.सी. रुलप्रमाणे एन.ओ.सी. मिळणार की, नॅशनल कोडप्रमाणे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, जेव्हा श्री. शिवमुर्ती नाईक साहेब आयुक्त होते, त्यावेळेला तुम्ही त्यांची प्रकरणे जर पडताळून बघितली, तर त्यावेळेला दिड-दोन मीटरला परमिशन दिलेली आहे. आणि मग तुमच्या वेळेला एवढा कडक कायदा का झाला? मग त्यावेळेच्या मा. आयुक्तांना वेगळे डी.सी.रुल होते का? एकच होते ना? मग असा भेदभाव का? त्यांच्या वेळेला ती सगळी कामे झालेली आहेत. तुम्ही ते पडताळून बघा. ते तुम्ही बघितले तर तुमच्या लक्षात येईल की, त्यावेळी याच फायर ऑफीसरने ती प्रकरणे दिलेली आहेत. म्हणजे एकाला न्याय दुसरा आणि दुसऱ्याला न्याय वेगळा, ते कशा करिता? तुम्ही दाखवताना डी.सी.रुल दाखवता. मग आम्ही डी.सी. रुल पकडून चालायचे की, फायरच्या याने चालायचे? कोणत्याने चालायचे? तुम्ही त्यातून काही मार्गपण काढत नाही.

**मा. आयुक्त :-**

नॅशनल फायर कोड आणि डी.सी.रुल याच्यामध्ये काही ठिकाणी सुसूत्रता नाही असे मा. सदस्यांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे रिडेव्हलपमेंटच्या केसेसमध्ये आणि साईड मार्जिनच्या केसेसमध्ये डी.सी.रुल काही वेगळे म्हणतात आणि नॅशनल फायर कोड काही वेगळे म्हणते असे आपले म्हणणे आहे. काही ठिकाणी ते खरे आहे. म्हणून आम्ही असे प्रस्तावित करतो की, डी.सी. रुलमध्ये चेंजेस केले पाहिजे. आणि नॅशनल फायर कोडप्रमाणे आमचे डी.सी.रुल झाले पाहिजे. अशा रिव्हिजनचा जो प्रस्ताव आहे तो पुढच्या मा. महासभेमध्ये किंवा त्याच्या नंतरच्या मा. महासभेमध्ये आम्ही आणू. दुसरा विषय असा आहे की, फायर कोडमध्ये प्रमुख बाबी अशा आहेत की, कोणत्याही ठिकाणी जर दुर्घटना घडली, तर त्या ठिकाणी फायर टेंडर पोहोचले पाहिजे. ते अतिशय महत्वाचे आहे. कोणत्याही बिल्डींगना

चारही बाजूंना फायर टेंडरचा स्पेस असला पाहिजे. नाहीतर एखादी आग लागली, आणि फायरटेंडर पोहोचले नाही तर ते विझवण्यासाठी फार कठीण होणार. काही स्पेसिफिक असे आहेत की, ज्या ठिकाणी साईड मार्जिन फार कमी मिळते. फायर टेंडर त्या ठिकाणी जाऊ शकत नाही. म्हणून त्या ठिकाणी जर डी.सी.रुलमध्ये परवानगी असेल तरीही आम्ही परवानगी दिलेली नाही. त्याचे एकमेव कारण असे आहे की, फायरटेंडरला चारही बाजूने बिल्डींग ॲक्सेसिबल असली पाहिजे. जर बिल्डींग ॲक्सेसिबल नाही, तर ते आग विझवणे शक्य होणार नाही. म्हणून ऑल फोर साईडस् ऑफ बिल्डींग फायर टेंडर ॲक्सेसीबल असले पाहिजे. त्याप्रमाणे ही परवानगी देतो.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, डी.सी. रुलमध्ये already it is been said की, ज्या गोष्टीला डी.सी. रुलमध्ये प्रोव्हिजन नाही. त्याला नॅशनल कोड ॲप्लीकेबल करावे.

**मा. आयुक्त :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. पण तुम्ही एका बाजूने हे पण लक्षात ठेवा की, जर आग लागली तर काय करणार? जर तुम्ही सेट बॅक व्यवस्थित दिले नाही ......

**नरेंद्र मेहता :-**

आय ॲग्री विथ यु. पण तुम्ही पूर्ण मुंबई शहर घ्या. त्यामध्येपण हेच आहे. तिकडे पण दिड मीटरवर परवानगी आहेत. तिकडे त्यांना नॅशनल कोड लागत नाही. मुंबई तर या सगळया बाबतीत आपल्यापेक्षा जास्त काळजी घेते.

**मा. आयुक्त :-**

हा विषय नाही की, कोण जास्त काळजी घेते. विषय हा आहे की, जर आग लागली तर विझवली पाहिजे. जर आग लागल्यावर विझवण्यात आम्हाला यश मिळाले नाही तर त्याचे फार मोठे नुकसान होते. लोकांचे जीवाचे नुकसान होते. सामानाचे नुकसान होते. लाईफ ॲन्ड प्रॉपर्टी डॅनेज होते.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, मागच्या वेळी आपण प्रस्ताव आणला होता की, रिडेव्हलपमेंट बिल्डींगला जास्त एफ.एस.आय. दयायचा. मग मला एक सांगा की, त्यांना तुम्ही फायर कोडप्रमाणे मार्जीन सोडायला सांगितले, भाईंदरचे कोणतेही रिडेव्हलपमेंट, तर फायरटेंडरसाठी जागा होणार, बिल्डींग बांधण्यासाठी जागाच राहणार नाही. मग त्या नागरिकांनी कुठे जायचे?

**मा. आयुक्त :-**

साहेब, बिल्डींग चारही बाजूने ॲक्सेसिबल असली पाहिजे एवढेच आमचे म्हणणे आहे. आता एक स्पेसिफिक असेल तर सांगा.

**नरेंद्र मेहता :-**

आपण भाईंदर ईस्ट किंवा वेस्टची कोणतीही बिल्डींग घ्या. ती बिल्डींग रिडेव्हलपमेंटला आहे. त्या बिल्डींगची विड्थ ३० ते ४० फुट असते. त्याला मागे दुसरी बिल्डींग असते. त्या ४० फुटमध्ये तुम्ही चारही बाजूने मार्जिन सांगितले, रोडपासून १२ फुट, मागून १२ फुट, साईटने १२ फुट तर ती जागा झिरो झाली. मग आपण जे दिड मीटर रिलॅक्सेशन दिले आहे, त्याला काही अर्थच राहिला नाही.

**मा. आयुक्त :-**

म्हणून मी म्हणतो की, आम्ही डी.सी. रुलमध्ये चेंजेस आणू.

**नरेंद्र मेहता :-**

मग साहेब, जोपर्यंत डी.सी. रुलमध्ये चेंजेस होत नाहीत किंवा .......

**मा. आयुक्त :-**

लोकांचे जीव आम्ही धोक्यामध्ये कसे आणू शकतो. जर आग लागली मग काय करणार? तिकडे दिड मीटरमध्ये गाडी कशी पोहोचणार?

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, डी.सी. रुलप्रमाणे इतक्या वर्षापासून आपणच नाही, इतर महापालिका, ठाणे, मुंबई, कल्याण हे सगळे करतात.

**मा. आयुक्त :-**

आपल्याला माहिती असेल की, कलकत्यामध्ये एका हॉस्पीटलला मोठी आग लागली होती. त्याच्यामध्ये किती लोकांचे नुकसान झाले.

**नरेंद्र मेहता :-**

त्या सगळया गोष्टींसाठी तुम्ही उपाययोजना करा.

**मा. आयुक्त :-**

उपाययोजनांसाठीच हे करतो आहे. टोटल रहिवासी बिल्डींग असेल तर त्याच्यामध्ये आग असतेच, त्या ठिकाणी किचन असते. किचन झाले तर सिलेंडर असणार, सगळया बाबी असणार. ते सगळे धोकादायक आहे.

**नरेंद्र मेहता :-**

थोडक्यात आजच्या तारखेला असे म्हणायचे की, आपले डी.सी.रुल, मिरा भाईंदरमध्ये आपण जे बजेट प्रोव्हीजन केले आहे त्या सगळया गोष्टींना काही महत्व नाही का? त्या आधारे परवानगी देता येणार नाही का?

**मा. आयुक्त :-**

मी असे म्हणत नाही. मी म्हणतो की, काही ठिकाणी सुसूत्रता नाही. ती सुसूत्रता आम्ही आणू. आणि आमचा उद्देश एवढाच आहे की, फायर टेंडर पोहोचला पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

साहेब, डी.सी. रुल अनेक वर्षे मेहनत घेऊन पाठपुरावा करुन, इव्हन मा. आमदार श्री. मुझफ्फर हुसैन साहेबांनी पण ज्यावेळी डी.सी.रुल केले, त्यावेळी खूप मोठा पाठपुरावा केला. त्या सगळया गोष्टीला पाठपुरावा करुन आपण डी.सी. रुल मंजुर करुन आणले. अनेक वर्षे झाली. आता बोलता की, ते डी.सी.रुल मान्य नाहीत. आणि डी.सी.रुलमध्ये इम्प्लीमेंट करायचे असेल तर ते उदया होणार नाही. त्याला अनेक वर्षे लागतील. आणि ते पण चॅलेंजेस होणार. एका देशान वेगवेगळी कारणे होऊ शकत नाहीत. मुंबईला वेगळे, ठाण्याला वेगळे, मिरा भाईंदरला वेगळे. मिरा भाईंदरला आग लागेल. गाकी शहरात आग लागणार नाही का? जोपर्यंत तुमचे होत नाही, तुम्ही पाठवा. काय करायचे ते अधिकार सभागृहाला आहेत. पण जोपर्यंत नवीन कायदा होत नाही. तोपर्यंत जुन्या कायदयांची अंमलबजावणी करावी लागेल.

**मिलन पाटील :-**

याच्यातून तुम्ही काहीतरी मध्य काढा. त्यांना तुम्ही कंडीशन टाकून दया की, फायरचे जे ....... असतात ते तुम्ही वापरा.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठी स्टेट गव्हर्नमेंटच्या फायर ऑफीसरशी या विषयावर चर्चा करु की, अजून काही नवीन टेक्नॉलॉजी आहे का?

**नरेंद्र मेहता :-**

मला काय सांगायचे ते तुम्हाला पटले आणि तुम्हाला काय सांगायचे तेही मला पटले. पण अल्टीमेटली काहीतरी व्हाया मिडिया असला पाहिजे. जोपर्यंत ते होत नाही तोपर्यंत मिरा-भाईंदर शहरातील परवानगी बंद का?

**मा. आयुक्त :-**

असे कोणतीही आम्ही बंद केली नाही. तुम्ही एखादी केस सांगा जी आम्ही बंद केली असेल.

**नरेंद्र मेहता :-**

माझे कुठलेही व्यक्तीगत नाही. शहराच्या अनेक केसेस आहेत.

**मा. आयुक्त :-**

असे असेल तर आम्ही करु.

**नरेंद्र मेहता :-**

क्लासो साहेब, करत नाहीत. ते पाठवतच नाहीत. ते बोलतात की, पाठवले तर कमिशनर साहेब घरी पाठवतील.

**मा. आयुक्त :-**

फायर ऑफीसरचे एकच उद्देश आहे की, फायर टेंडर तिकडे पोहोचले पाहिजे. आणि जर आग लागली, काही घटना घडली, त्याच्यातून रिस्क शक्य झाले पाहिजे.

**नरेंद्र मेहता :-**

मागे श्री. राजीव साहेब होते, श्री. शिवमूर्ती नाईक साहेब होते. या सर्वांनी श्री. क्लासो फर्नांडिस यांना लेखी पत्र दिले आहे की, डी.सी.रुलप्रमाणे आपण त्यांना परवानगीला एन.ओ.सी. दयावी. मग तत्कालीन आयुक्तांनी जी लेखी पत्र दिलेली आहेत, त्याला काही अर्थच राहिला नाही का? साहेब, कुठे याचा व्हाया मिडीया निघत नाही. आपण चर्चा करणार, सगळे आहे. तोपर्यंत परवानग्या, ज्या काही असतील, एक असू दया, किंवा दहा असू दया, दे आर सफरींग.

**मा. आयुक्त :-**

असे असेल तर शासनाचे जे वरिष्ठ फायर ऑफीसर आहेत, त्यांच्याशी या विषयावर चर्चा करु.

**मिलन पाटील :-**

आम्ही हे सांगत नाही की, ते जाणुनबुजून करतात किंवा काय. त्यांची सुध्दा अडवण असेल. पण त्याच्यातून काहीतरी मार्ग निघाला पाहिजे. त्यांना भारी इंस्ट्रुमेंट वापरायला सांगा. त्यांना कंडीशन टाकून तुम्ही दया.

**मा. आयुक्त :-**

मी तेच म्हणालो की, शासनाशी चर्चा करुन करतो.

**नरेंद्र मेहता :-**

पण साहेब, शहरात परवानगी चालू करा.

**एस.ए.खान :-**

प्रकरण क्र. १०८ (ठराव टाईप करणे.)

**दिनेश नलावडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

सचिव साहेब, ठराव वाचा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०८ (ठराव टाईप करणे.) सुचक श्री. एस.ए.खान, अनुमोदन श्री. दिनेश नलावडे. प्रकरण क्र. १८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव, सुचक श्री. भगवती शर्मा, अनुमोदन श्री. मदन सिंह. दुसरा ठराव, सुचक श्री. एस.ए.खान, अनुमोदन श्री. दिनेश नलावडे. अनुक्रमे मी दुसरा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. एस.ए.खान यांच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) या ठरावाच्या विरोधात जे असतील, त्यांनी हात वर करावे. (नावे टाईप करणे.) सुचक श्री. भगवती शर्मा यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) या ठरावाच्या विरोधात जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) तटस्थ कोणी नाहीत.

**मा. महापौर :-**

श्री. भगवती शर्मा यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्यांच्या बाजूने ३८ सदस्य आहेत आणि विरोधामध्ये २४ सदस्य आहेत. श्री. भगवती शर्मा यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे. ठराव कायम करण्यात येत आहे.

**प्रभात पाटील :-**

मला बोलायचे आहे, म्हणजे बहुसंख्य महिला आहेत. पुढे ५० % आरक्षण आहे. त्या अनुषंगाने साहेब आपल्याला सांगू इच्छिते. मा. महापौर, मा. उपमहापौर आहेत. मला वाटते मा. उपमहापौर यांना हा विषय माहिती आहे. मा. आयुक्त साहेब, आपण २००६ साली आर.सी.एच. मध्ये १३० लिंक वर्कर होत्या. ज्या घरोघरी जाऊन तिथल्या रोगांची माहिती घेतात किंवा महापालिकेच्या ज्या आरोग्यविषयक सुविधा असतील त्या घरोघरी जाऊन लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम त्या करतात. २००६ मध्ये त्या लिंक वर्कर्स घेताना आपण त्यांना पाचशे रुपये मानधन ठरवले होते. आणि त्यानंतर त्यांच्यावर दया म्हणून २०१० साली मा. स्थायी समितीने त्यांना दोनशे रुपयांची वाढ दिले. हे लिंक वर्कर महिन्याच्या सुट्टया वगळता २४ ते २५ दिवस काम करतात. आणि त्यांना सातशे रुपये मानधन मिळते. आणि या सगळया लेडीज आहेत. म्हणजे ही महिला वर्गाशी केलेली क्रुर थट्टा मला वाटते. म्हणजे सातशे रुपयांमध्ये आपण हे काम त्यांच्याकडून करुन घेतो. माझी तुम्हाला विनंती आहे की, हा विषय आर्थिक बाबीशी आहे. आपल्यासमोर आता बजेट आहे. आज आपल्याला याच्याविषयी निर्णय घेता आला नाही, तरी येणाऱ्या सभेमध्ये तुम्ही हा विषय घ्या. कारण आपण त्यांच्या भावनांशी किंवा त्यांच्या शारीरीक श्रमाशी खेळू शकत नाही. माझी तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्या.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभागृह नेता यांनी ज्या पोटतिडकीने विषय मांडला आहे, खरोखरच ते परिश्रम करत आहेत. तर मा. महापौर साहेब, आमची तुम्हाला विनंती आहे की, आगामी सभेत हा विषय घ्यावा.

**मा. महापौर :-**

पुढच्या मिटींगला हा विषय घेण्यात येईल.

प्रकरण क्र. १०८ :-

ठराव क्र. :-

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १०९ (टाईप करणे)

**मिलन पाटील :-**

(ठराव टाईप करणे)

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-**

सभागृहामध्ये सूचना आलेली आहे ती मी देतो. शासनाकडून नगरविकास खात्याचे दि. १५ फेब्रुवारी २०१२ चे पत्र आहे. राज्यातील महानगरपालिका महापौरांचे आरक्षणाबाबत सोडत काढणेबाबत. सदरची सोडत २२/०२/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता मा. राज्यमंत्री, नगरविकास यांच्या अध्यक्षतेखाली सार्वजनिक बांधकाम विभाग सभागृह, रुम नं. २२५, दुसरा मजला येथे आयोजित केलेली आहे. सदर सभेमध्ये महापालिकेचे मा. महापौर, विरोधी पक्षेनेते यांना आमंत्रित केलेले आहे अशी सुचना आहे.

प्रकरण क्र. १०९ :-

ठराव क्र. :-

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११० टाईप करणे.

**प्रभात पाटील :-**

(ठराव टाईप करणे)

**जुबेर इनामदार :-**

माझें अनुमोदन आहे.

**आसिफ शेख :-**

(ठराव टाईप करणे)

**शरद पाटील :-**

माझें अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

दोन्ही ठराव वाचा.

**नगरसचिव :-**

दोन्ही ठराव एकच आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील यांचा आहे, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार आहेत. दुसरा ठराव सुचक श्री. आसिफ शेख, अनुमोदन श्री. शरद पाटील यांचे आहे. दोन ठराव आलेले आहेत. मी ठरावांचे वाचन करतो. (आसिफ शेख यांचा ठराव टाईप करणे) या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे) या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे) पहिला ठराव सुचक श्री. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. जुबेर इनामदार (ठराव टाईप करणे) या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे) या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे) तटस्थ कोणी नाही.

**मा. महापौर :-**

श्री. आसिफ शेख यांनी जो ठराव मांडला आहे, त्याच्या बाजूने ३८ मते आहेत आणि विरोधात २५ मते आहेत आणि विरोधात २५ मते आहेत. तरी श्री. आसिफ शेख यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात आलेला आहे. ठराव वाचून कायम करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ११० :-

ठराव क्र. :-

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११ टाईप करणे.

**प्रभात पाटील :-**

(ठराव टाईप करणे)

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

(ठराव टाईप करणे)

**आसिफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये माझी सुचना आहे की, आरक्षण क्र. ११९, भाईंदर (पुर्व), गोल्डन नेस्ट हे आपण मा. खासदार निधीतून डेव्हलप करत आहोत. तर हे याच्यातून वगळण्यात यावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझ्या ठरावामध्ये घ्या.

**अनिल सावंत :-**

श्री. नरेंद्र मेहताजी आप लोग सब दे रहे है?

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही त्याच्यामध्ये असे म्हटले आहे की, जे शाळेचे क्रिडांगण आहेत, ते देऊ नये आणि जे बाकीचे प्लेग्राऊंड, गार्डन आहेत ते जाहिराती प्रमाणे कोणीही करत असेल आणि संपूर्ण महापालिकेच्या ताब्यात असेल ते देण्यास हरकत नाही. तसा आम्ही ठराव केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

याच्यापूर्वी सुध्दा या शहरामध्ये आपण जी-जी गार्डन्स बी.ओ.टी. वर दिलेले आहेत, मग ती फक्त ॲडव्हटाइजमेंटसाठी जरी असतील तरी त्यांचा अनुभव या शहरासाठी फार वाईट आहे. मॅक्सस मॉलच्या समोरचे ग्राऊन्ड पब्लीकसाठी आहे. पण त्याचा वापर पब्लीकला होत नाही. आता हे प्रत्येक कॉम्पलेक्समध्ये झालेले गार्डन्स पालिकेने डेव्हलप केले, त्याच्यामध्ये आर.जी. सुध्दा आहेत. काही आर.जी. हॅन्ड ओव्हर झालेल्या नाहीत. पण पालिकेने ते डेव्हलप केलेले आहेत. हे गार्डन जर आपण एखादया ॲडव्हटाइजमेंटसाठी दिले तर त्यांची परिस्थिती काय होईल? लोकांना तिथे खेळण्यासाठी जायला तरी मिळेल का?

**नरेंद्र मेहता :-**

साईडला लावणार आहेत.

**अनिल सावंत :-**

साईडला म्हणजे तो एकदम कब्जा असतो. फक्त ॲडव्हटाइजमेंट हा विषयच होत नाही. केअरटेकींग म्हणजे पूर्ण कब्जाच असतो. तुम्ही हे छोटे – छोटे गार्डन घेतलेले आहेत, शांती नगरमधील सर्व गार्डन घेतलेले आहेत, गितानगर फेसमधील गार्डन घेतलेले आहेत, त्या ठिकाणी लोक वापर करत आहेत. तो विषय त्यांनी आणला आहे. त्यांना देऊनच टाकायचे आहेत. त्यामध्ये फक्त ॲडव्हटाइजमेंटचे धोरण आहे की, केअरटेकींगचे आहे? त्याच्यामध्ये सिक्युरिटीपण येणार? प्रशासनाचे धोरण काय आहे? म्हणजे आयडिया काय आहेत? सिक्युरीटीपण देणार, ॲडव्हटाइजमेंट पण देणार आणि मेन्टेनींगपण देणार असे आहे का?

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, ज्या सोयी सुविधा नागरिकांना दिलेल्या होत्या, त्या काढून घ्यायच्या का?

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, आरक्षण क्र. १७८ हा न्यायप्रविष्ठ विषय आहे. त्याचाही उल्लेख याच्यामध्ये आहे.

**अनिल सावंत :-**

प्रशासनाची भुमिका काय आहे ते स्पष्ट करावे.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)) :-**

हा विषय धोकरणात्मक निर्णयाकरीता ठेवलेला आहे. जेव्हा आपण हे गार्डन, मैदाने, दुभाजक किंवा चौक हे देताना त्याचे परपेच्युअल मेन्टेनन्स हे त्यांनीच करायला पाहिजे. दुरुस्ती, देखभाल आणि सुरक्षा या तीनही गोष्टी त्यांच्याकडे निहीत असतील. कारण ज्याअर्थी ते गार्डनसाठी खर्च करतात, जाहीरातीचा सुध्दा त्यांना वापर करायला मिळतो, त्याअर्थी उर्वरित या सर्व ज्या खर्चाच्या बाबी आहेत, ते त्यांच्याकडून करणे अपेक्षित राहील.

**अनिल सावंत :-**

म्हणजे थोडक्यात पूर्ण कंट्रोल त्याचा राहणार आहे, असे आपल्याला म्हणायचे आहे?

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)):-**

होय.

**अनिल सावंत :-**

म्हणजे पूर्ण कंट्रोल त्याचा राहणार आहे. ज्या नगरसेवकांनी आपल्या नगरसेवक निधीमधून, प्रभाग निधीमधून ही काही गार्डन्स वगैरे डेव्हलप केलेली आहेत. आणि आता तुम्ही हे प्रायव्हेट पार्टीला विकायला निघालेले आहात. थोडक्यात याची पार्श्वभूमी ही आहे. ते कितपत योग्य आहे. हे होऊ शकत नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, ऑलरेडी गार्डन बन चुके है। सेक्टर – ३ में नाना-नानी पार्क है, उसमें ४००-५०० बुजूर्ग लोग आकर बैठते है।

**अनिल सावंत :-**

याच्यामध्ये त्यांनी ठराविक गार्डन गाळलेले आहेत. नंतर ठराविक सुचना आल्या की, हे गार्डन गाळा, ते गार्डन गाळा. मग गाळता कशाला, शहरातील सर्वच दया.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)):-**

याच्यामध्ये जी बरीचशी आरक्षणे आहेत, ती अदयापही अविकसीत आहेत. जे ओपन स्पेसचे आर.जी.चे स्पेसेस आहेत.

**अनिल सावंत :-**

जी आर.जी. मध्ये विकसीत झाले आहेत. त्यांचे काय करणार? आर.जी. मध्ये दोन हॅन्डओव्हर पण झाले नाहीत.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त (मु.)):-**

जी विकसीत झालेली आहेत आणि हॅन्डओव्हर झालेली नाहीत, ती त्यांच्या पर्टीक्युलरली आर.जी. क्षेत्राचा जो होल्डर आहे, त्याचा तो मुद्दा आहे. मात्र जी उद्याने अदयापही अविकसीत आहेत, आणि जी भविष्यात विकसीत होण्यासारखी आहेत आणि होणार आहेत, त्याकरीता विशेषतः हे धोरण राबवावे. आणि जी ऑलरेडी आपल्या कॉर्पोरेशनच्या मेन्टेनन्स अंडर आहेत आणि जी उत्तम प्रकारे मेन्टेन होत आहेत, त्याला प्रायव्हेटायझेशनची गरज आहे असे मला वाटत नाही.

**अनिल सावंत :-**

ती सर्व देण्याची गरजच नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, नगरसेवक निधी मे से जो गार्डन बना है। उसके लिए ....

**एस.ए.खान :-**

आपण खर्च केलेला आहे आणि मेन्टेन आहेत, त्याला देण्याची काय गरज आहे?

**मा. आयुक्त :-**

आमचे पैसे वाचणार.

**एस.ए.खान :-**

आणि नागरिकांना सोयी सुविधा दयायची नाही?

**मा. आयुक्त :-**

नागरीक गार्डनमध्ये जाऊ शकतात. त्यांना जाण्याची बंदी नाही.

**एस.ए.खान :-**

नंतर पैसे लावणार ना?

**मा. आयुक्त :-**

ते मोफत असणार.

**एस.ए.खान :-**

एकदा त्यांच्या ताब्यात दिले की, ते काहीही करणार. आपण काही करु शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांच्याशी ॲग्रीमेंट झालेल्या आहेत. ॲग्रीमेंटप्रमाणे कुठे कोण वागतो.

**अनिल सावंत :-**

साहेब, मॅक्सेस मॉलचे गार्डन लोकांसाठी आहे ते लोक किती वापरतात?

**एस.ए.खान :-**

कोण काय कार्यवाही करतात? तिकडे कोण जातात?

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, झंकार कंपनीपासून शिवाजी पुतळयापर्यंत आपल्या डिवायडरच्या दोन बाजुंना ज्या जाळया होत्या, त्या जाळयांपैकी एक सुध्दा जाळी आता दिसत नाही. आपण करोडो रुपये खर्च करुन या जाळया लावलेल्या आहेत. तर त्या जाळयांचे बघा. त्या कुठे गेल्या त्याची एन्क्वायरी करा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त साहेब, आज लक्षवेधी होती की, २००९ मध्ये सोळा गार्डनचे उद्घाटन केले. तर बजेटमध्ये तरतुद नसल्याने बाकी गार्डनची कामे करता आली नाही. हे फक्त सोळा आहेत आणि मिरा भाईंदरमध्ये तीनशेपेक्षा जास्त आरक्षणे आहेत. हेही नक्की आहे की, महापालिकेच्या १००% फंडावर ही आरक्षणे विकसीत करणे. हे भविष्यात पण शक्य होणार नाही. हेही सत्य आहे की, ज्या लोकांना आपण दिलेले आहे, त्यांनी त्याचा गैरवापर केलेला आहे. आता श्री. विक्रमकुमार ज्यावेळेपासून इकडे मा. आयुक्त म्हणून आलेले आहेत. आपल्याला सर्वांना माहिती आहे, मा. आयुक्त साहेबांनी व्यवस्थित करारनामे करुन शहराचे चांगले निर्णय घेतील अशी आम्हाला खात्री आहे. त्या गार्डन, प्ले-ग्राऊन्डमध्ये कुठल्याही प्रकारची फी आकारली जाणार नाही. त्यांनी त्याची जाहिरात करावी. जाहिरातीचे पैसे आम्हाला न देता गार्डनची देखभाल दुरुस्ती करावी. तेवढेच आपण करतो आहे. आता मागच्या वेळी आपण असा विषय काढला की, जागा ताब्यात आलेली नाही. मागच्या वेळी विरोध यासाठीच होता. शासनाकडून मीच रद्द करुन आणलेले, आपण ठराव केलेला की, बी.ओ.टी. वर दया. तो तर याच्यापेक्षाही हानीकारक होता. त्यावेळी आपण कोणी केले नाही. तोही विषय साईडला सोडू या.

**अनिल सावंत :-**

बी.ओ.टी. वर दयायचा ठराव आम्ही केलेला नाही.

**नरेंद्र मेहता :-**

आता आपण कोणाबरोबर करारनामा करत नाही.

**अनिल सावंत :-**

ते तर फार वाईट आहे. विदाऊट करारनामा ताब्यात देतो आहे. त्यांच्याबरोबर भांडायला कोण जाणार आहे? मला एक सांगा, फॉर एक्झाम्पल, तुमची सेव्हेन स्क्वेअर ॲकेडमी आहे. तुम्हाला आम्ही एखादे हजार स्क्वेअर मीटरचे गार्डन दिले. त्याचे मेन्टेनन्स तुम्ही करायचे, ॲडव्हटाइजमेंट तुम्ही करायची, सर्व तुम्ही करायचे. तुम्ही पहिले तुमच्या स्कुलला प्रेफरन्स देणार की, पब्लीकला देणार? एक सिंपल उदाहरण दया.

**नरेंद्र मेहता :-**

कोणाला परवानगी दयायची, कोणाला नाही हा विषय नक्कीच नाही. फक्त गार्डन खत टाकणे, पाणी टाकणे, झाडांची देखभाल दुरुस्ती करणे एवढेच त्याचे काम आहे. किंवा खेळणी असेल तर मोठे काहीच नाही. त्याने दहा जाहिराती लावल्या. जाहिरातीचे मार्केटचे रेट आजच्या तारखेला मोठया होर्डिंग्जचे पंधरा हजार असतील, छोटया होर्डिंग्जचे दोन हजार असतील. दहा लावले तर वीस हजार झाले. वीस हजारामध्ये तो मेन्टेन करु शकतो. आणि आपण हे प्रयोग म्हणून करतो आहे. झाले नाही तर महापालिका शेवटी देखभाल करते.

**अनिल सावंत :-**

लोकांकडून आपण वृक्षप्राधिकरण टॅक्स घेतो. वृक्षप्राधिकरण डिपार्टमेंट आहे. मग त्यांना काम काय आहे? पदाधिका-यांच्या घरचे गार्डन मेंन्टेन करायचे?

**नरेंद्र मेहता :-**

शहरात अजून ३०० आरक्षणे आपल्याकडे प्रलंबीत आहेत. आम्ही ठराव दिलेला आहे. आपण तो मतदानाला घ्या.

**मिलन पाटील :-**

एकुण मैदाने आहेत, त्यामध्ये तीन नंबर वगळून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर साहेब, आता शहराच्या नागरिकांची काळजी आहे. ज्या शहराबद्दल याच सभागृहामध्ये गोरगरिबांना न्याय मिळावा म्हणून काही रिझर्व्हेशनमध्ये, हॉस्पीटलमध्ये अनेक रिझर्व्हेशन होते. ते काढून घेतले. त्यावेळेला कोणाला शहराची काळजी वाटली नाही. आज आपण हे फक्त जाहिरातीसाठी देतो आहे. कोणाला बी.ओ.टी. वर देत नाही.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील, दुसरा ठराव सुचक श्री. आसिफ शेख.

**जुबेर इनामदार :-**

आरक्षणामधून ७५ % अजून विकसीत झालेले नाहीत.

**चंद्रकांत मोदी :-**

जो गार्डन डेव्हलप किया है, उसके लिए क्या ? जो नगरसेवक निधी से २००२ से जो गार्डन बना है, उसका क्या ? वो पैसा महापालिका का है, और क्रेडीट दुसरा लेकर लाएगा।

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, त्या सुचनांमध्ये राव तलाव वगळून करा.

**जुबेर इनामदार :-**

साहेब, बरीच उदयाने ही रहिवाशी क्षेत्रामध्ये आहेत. आता त्या छोटया-छोटया उद्यानांमध्ये १० X २० चे होर्डिंग्ज लावणार. कोणाच्या तरी घराच्या समोर येणार. कोणाची तरी बाल्कनी झाकली जाणार. हा विषय त्याच्या मागे राहणार आहे. उद्या तो बोलणार की, मला पालिकेने परवानगी दिलेली आहे. मी ते करणारच. याच्या बऱ्याच तांत्रिक बाबी तपासून बघाव्या लागतील.

**एस.ए.खान :-**

सर्व मैदाने वगैरे रेसीडेनशीअल एरियामध्ये आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मिरारोडमध्ये नाना-नानी पार्क दिलेला आहे, तो १०० % रहिवाशी क्षेत्रामध्ये आहे. त्याच्या मागे इमारती आहेत.

**अनिल सावंत :-**

आपण जो विषय दिलेला आहे. त्यांनी ठरावामध्ये मग हे गाळा, ते गाळा, आम्ही ते घेणार, हे असे कशाला? केला तर पूर्ण करा. त्यांनी त्या ठरावामध्ये बरेचशे गाळलेले आहेत. जर पर्सनल इंटरेस्ट असेल तर ते होणारच नाही.

**चंद्रकांत मोदी :-**

साहेब, ऑल रेडी २००२ से गार्डन मेन्टेन है।

**लक्ष्मण जंगम :-**

मा. महापौर साहेब, या गार्डनच्या आरक्षणा संदर्भात जो विषय आहे, तर डिव्हायडर वगैरे हा विषय ठिक आहे. पण जे गार्डन तयार आहेत, ते आपण त्यांच्याकडे सांभाळायला देणार आहोत? नेमके ते देखभाल दुरुस्ती करणार त्याचा उद्देश काय? त्याच्यासाठी फक्त बोर्ड लावणार? त्याच्या व्यतिरिक्त काही करणार नाही? देखभाल दुरुस्ती करत असताना त्या आरक्षणामध्ये उद्या त्यांनी कोणाला भाडयाने दिले तर आपण काय करणार? तसे होणार नाही? आता जर असा विषय आणलेला आहे, तर सरसकट सगळे दया. त्याच्यामध्ये गाळत कशाला बसता?

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. अनिल सावंत. दुसरा ठराव सुचक श्री. आसिफ शेख, अनुमोदन श्री. ओमप्रकाश अग्रवाल. मी अनुक्रमे दुसऱ्या ठरावाचे वाचन करतो. (टाईप करणे.) श्री. ध्रुवकिशोर पाटील यांची सुचना आहे. (टाईप करणे.) दुसरी सुचना श्री. अनंत पाटील यांची आहे. (टाईप करणे.) श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांची सुचना आहे. (टाईप करणे.) अशा सुचना आहेत.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर साहेब, याच्यामध्ये वाहतुक बेट कसे आले?

**नगरसचिव :-**

सुचक श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या ठरावाच्या बाजूने असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) मी श्रीम. प्रभात पाटील यांच्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) तटस्थ कोण आहेत. (नावे टाईप करणे.)

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर साहेब, ठराव मंजुर करने से पहले जो गार्डन २००२ से पहले से बन चुके है, वो उस ठराव में नहीं आयेंगे। क्योंकी ऑल रेडी पब्लीक वहाँ जाती है। महानगरपालिका अच्छा मेंन्टेन करती है।

**मा. महापौर :-**

श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांनी जो ठराव मांडलेला आहे, त्याच्या बाजूने ३८ मते पडलेली आहेत आणि विरोधामध्ये २२ मते पडलेली आहेत. ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १११ :-**

**ठराव क्र. :-**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११२, (टाईप करणे.)

**प्रभात पाटील :-**

(ठराव टाईप करणे.)

**चंद्रकांत मोदी :-**

मेरा अनुमोदन है।

**प्रशांत पालांडे :-**

(ठराव टाईप करणे.)

**वंदना पाटील :-**

याला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

यामध्ये माझी सुचना आहे की, या वाचनालय आणि अभ्यासिका आणि संगणक केंद्राकरीता महापालिकेच्या येणाऱ्या आर्थिक बजेटमध्ये दहा लाखाची तरतुद करावी.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, आपल्या परवानगीने बोलतो की, खारीगाव मराठी शाळेमध्ये तीन माळयाचें बांधकाम केलेले आहे. तिसऱ्या माळयाला अभ्यासिका व वाचनालयाचा प्रस्ताव ऑलरेडी झालेला आहे. दुसऱ्या माळयावर इनडोअर गेमसाठी केलेले आहे आणि त्याची प्रक्रिया सुरु आहे. याची याच्यामध्ये नोंद घ्यावी. कारण ते दिलेले आहे आणि यांनी पहिल्या माळयावर प्रस्तावित केलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर साहेब, थोडी माहिती दया की, आपल्या विषयपत्रिकेवर विषय आहे. त्याच्यामध्ये खारीगांव शाळेतील जागा म्हटली आहे आणि आता तुमच्या ठरावामध्ये उड्डाणपुलाखालची जागा आलेली आहे. तर विषय एक असताना आपण दुसरीकडे तो विषय हस्तांतरीत करु शकतो का?

**जयंत पाटील :-**

त्यांनी ती जागा फेटाळली आहे.

**प्रभात पाटील :-**

जागा अशी फेटाळली म्हणजे मा. महासभेत विषय आणून फेटाळता येईल की, ठरावातच फेटाळायची?

**भगवती शर्मा :-**

आम्ही पर्यायी जागा सुचवलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

ठराव मताला पडेल तेव्हा वाचन करा.

**एस.ए.खान :-**

मा. महापौर साहेब, जागे बद्दल जे आलेले आहे की, गुमास्ता लायसन्सचे खारीगावात प्रभाग क्र. २ मध्ये दयायचे. उड्डाणपूलाच्या खाली आपले राशन ऑफिस आहे. तिथे कुठे जागा आहे. तिकडे जागा मागितली आणि आता इथे .....

**जयंत पाटील :-**

दोन ठराव झालेले आहेत.

**एस.ए.खान :-**

मा. आयुक्त साहेब, जरा उत्तर दया की, जागा तिकडची मागितलेली आहे आणि इकडे आपल्याला देता येत का? विषयपत्रिकेवर तसा विषय नाही.

**दिपक खांबित :-**

ट्रक उभे राहायचे ती जागा खाली केली आहे. तिकडे भरपूर जागा रिकामी झाली आहे. ठराव झाल्यावर त्याच्यावर निर्णय घेतील. खर्चिक बाब आहे. बांधकाम करावे लागेल. ती रेडीमेंड जागा आहे.

**एस.ए.खान :-**

असे करता येते का?

**दिपक खांबित :-**

ठरावावर मा. आयुक्त कार्यवाही करतील.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर साहेब, हे जे कामगार उपायुक्त आहेत, त्यांना जागा दयायची आहे, आता काशिमिरा ब्रिज झालेला आहे. त्याच्या खाली भरपूर जागा आहे. त्यातली एखादी दया.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ११२ करीता दोन ठराव आलेले आहेत. पहिला सुचक श्रीम. प्रभात पाटील, अनुमोदन श्री. एस.ए.खान, दुसरा ठराव सुचक श्री. प्रशांत पालांडे, अनुमोदन श्रीम. वंदना पाटील. अनुक्रमे मी दुसऱ्या ठरावाचे वाचन करतो. (ठराव टाईप करणे.) त्याच्यामध्ये श्री. ओमप्रकाश अग्रवाल यांची सुचना आहे. (टाईप करणे.) या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) मी पहिल्या ठरावाचे वाचन करतो. (ठराव टाईप करणे.) या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.) या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. (नावे टाईप करणे.)

**मा. महापौर :-**

श्री. प्रशांत पालांडे यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ३८ मते आणि विरोधात २२ मते आहेत. तरी श्री. प्रशांत पालांडे यांचा ठराव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ११२ :-

ठराव क्र. :-

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, एक ठराव मांडत आहे. (ठराव टाईप करणे.)

**अनिल सावंत :-**

तसे होऊ शकत नाही. याच्यापूर्वी झालेले नाही. विषयपत्रिकेप्रमाणेच जायचे.

(सभागृहात गोंधळ)

**लक्ष्मण जंगम :-**

सिरियलप्रमाणे विषय होतील.

**नगरसचिव :-**

२(के) खाली तरतुद आहे. कामकाजाच्या कोणत्याही बाबीस प्राधान्य देणे. कोणत्याही सभेस उपस्थित असणाऱ्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या बहुसंख्य पालिका सदस्यांच्या संमतीने पीठासीन प्राधिकाऱ्यांस कामकाजाची कोणतीही बाब किंवा बाबी, महानगरपालिकेच्या कार्यसुचीवर त्या कोणत्याही क्रमाने असल्या तरीही उक्त बाब किंवा बाबीस प्राधान्य देण्यात येईल.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, तुम्ही अर्धवट वाचले महानगरपालिकेच्या कार्यसुचीवरील बाबीस प्राधान्य देण्यासाठीच कोणताही अर्ज, सामान्यतः त्याबाबत दोन पूर्ण दिवसाची आगाऊ नोटीस महानगरपालिका सचिवास देण्यात आली असेल सचिव साहेब, प्राधान्य द्यायचे आहे दोन दिवसाची आगाऊ नोटीस द्यायला पाहिजे.

**नगरसचिव :-**

मी २(के) पुन्हा वाचून दाखवतो. कोणत्याही सभेस उपस्थित असणाऱ्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या बहुसंख्य पालिका सदस्यांच्या संमतीने, पीठासीन प्राधिकाऱ्यास, कामकाजाची कोणतीही बाब किंवा बाबी, महानगरपालिकेच्या कार्यसुचीवर त्या कोणत्याही क्रमाने असल्या तरीही उक्त बाब किंवा बाबीस प्राधान्य देण्यात येईल. महानगरपालिकेच्या कार्यसुचीवरील बाबीस प्राधान्य देण्यासाठीच कोणताही अर्ज, सामान्यतः त्याबाबत दोन पूर्ण दिवसाची आगाऊ नोटीस महानगरपालिका सचिवास देण्यात आली असेल व सचिवाने ती पालिका सदस्यास कळविली असेल त्याशिवाय, सभेपुढे ठेवण्यात येणार नाही.

**लक्ष्मण जंगम :-**

सचिव साहेब, प्राधान्यचा अर्थ काय?

**नगरसचिव :-**

कोणत्याही सभेत सभा म्हणजे चालु काम.

**अनिल सावंत :-**

२ (के) पुर्ण वाचा.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो नियमाप्रमाणे आहे का?

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही अर्धे वाचून त्याचा अर्थ काढता. ते पुर्ण वाचले पाहिजे ते वाक्य पूर्ण झाल्यावर दुसरे चालु झाले का? तुम्ही प्राधान्याचे बोलता तर ते प्राधान्य कशाला द्यायचे त्याबाबतीच आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, याच्यामध्ये दिलेले आहे की, बहुसंख्य आत्ता मी दोन दिवस अगोदर द्यायचे असेल तर मला कसे माहिती पडणार की, माझ्याकडे बहुसंख्य आहेत का दोन दिवसा अगोदर बघु शकतो का?

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

महानगरपालिकेच्या कार्यसुचीवरील बाबीस प्राधान्य देण्यासाठीच कोणताही अर्ज सामान्यतः त्याबाबत दोन पूर्ण दिवसाची आगाऊ नोटीस महानगरपालिका सचिवास देण्यात आली असेल व सचिवाने ती पालिका सदस्यांस कळविली असेल त्याशिवाय आम्हाला कळविलेलीच नाही विषय संपला.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, पूढचा विषय घ्या.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, मिरा-भाईंदर महानगरपालिका अधिसुचना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ सन १९४९ चा मुंबई ५९ महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण जून १२, २००२ ज्येष्ठ भावी शके १९२४ पान क्र. ४४४ त्यामध्ये २ ''के'' म्हटले आहे. कामकाजाच्या कोणत्याही बाबीस प्राधान्य देणे. कोणत्याही सभेस उपस्थित असणाऱ्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या बहुसंख्य पालिका सदस्याच्या संमतीने पिठासीन अधि-प्राधिकाऱ्यास कामकाजाची कोणतीही बाब किंवा बाबी महानगरपालिकेच्या कार्यसुचिवर या कोणत्याही क्रमाने असल्या तरीही उक्त बाब किंवा बाबीस प्राधान्य देता येईल. याचा अर्थ असा आहे. सन्मा. महापौरानी .......

**अनिल सावंत :-**

अर्धवट कशाला वाचता? पुढे वाचा.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

सचिवाबरोबर असे कधी झाले नाही तर त्यांना कल्पना कशी येणार.

**आसिफ शेख :-**

सचिव साहेब, महापौरानी जेव्हा सभा लावली. सभा लावणेपर्यंत सर्व विषय घ्यायचे की नाही घ्यायचे हा संपूर्ण अधिकार मा. महापौराना आहे. मा. आयुक्त कशासाठी आहेत. प्रशासन अधिकार काय आहे की मा. महापौराना विषय दयायचा तो विषय विषय पत्रिकेवर घ्यायचा अधिकार मा. महापौरांना आहे. जेव्हा महासभा लागली तेव्हा संपूर्ण अधिकार सभागृहाचा असतो. मा. महापौरांचा अधिकार नसतो.

**अनिल सावंत :-**

हे कुठे लिहीले आहे. ते वाचून दाखवा. तुमच्या म्हणण्याने होत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

बहुसंख्य पालिका सदस्य असतात की ज्यांना मतदानाचा अधिकार आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

प्राधान्य द्या हा शब्द कशाला आला असता.

**भगवती शर्मा :-**

आम्ही जो ठराव केलेला आहे त्याच्यावर तुमचे मत दया. पाहिजे तर ठरावाला रिजेक्ट करा काहीही करा पण निर्णय दया.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आपल्याला एवढे ज्ञान नाही का? हे वारंवार सांगायला लागेल का? सभागृहाचा किती वेळ चालला.

**अनिल सावंत :-**

एवढयात पाच विषय झाले असते. सभा संपली असती.

**नरेंद्र मेहता :-**

आम्ही बेकायदेशीर बोलतो का? आम्ही कायद्याचे बोलतो.

**अनिल सावंत :-**

कायदा नाही कायदेशीर ते आहे.

**मा. महापौर :-**

कायदा अर्धवट वाचून चालत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, आपला स्पष्ट निर्णय दया.

**जुबेर इनामदार :-**

सभागृह उपविधी प्रमाणे चालतो. उपविधीमध्ये स्पष्ट उल्लेख आहे. तुम्हाला वाचता येत नाही किंवा समजत नाही.

**प्रभात पाटील :-**

सविवांनी ह्याच्यापूढे ''ज'' चे प्रस्ताव आल्याशिवाय विषय पत्रिका तयार करु नये.

**लक्ष्मण जंगम :-**

मध्येच असे काय घडले की आपल्याला उलटे चालायला लागले. सकाळपासून व्यवस्थित चालले होते.

**विधी अधिकारी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, आपले जे सभा कामकाज नियम आहेत ते आपल्या मेन ॲक्टनूसार बनविलेले आहेत. मेन ॲक्टमध्ये सेक्शन रुल १ ‘‘के’’ मध्ये एखादा अर्जन्ट विषय घ्यायचा असेल तर आपल्याला १ ‘‘के’’ खाली तीन-चतूर्थांश मेजोरीटी लागते त्याप्रमाणे आहे. त्याच्याप्रमाणे आपले सभा कामकाज तयार करण्यात आलेले आहेत. त्याच्यामध्ये १,२,३ असे त्यांनी क्लॉजेस तयार केलेले आहेत. पहिला क्लॉज असा आहे की, एखादी सभा चालू असताना मी क्लॉज वाचून दाखवते कोणत्याही सभेस उपस्थित असणाऱ्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या बहुसंख्य पालिका सदस्याच्या संमतीने म्हणजे सभेमध्ये विषय चालू असताना त्यावेळेस पालिका सदस्याच्या संमतीने त्याच्यापूढे असे आहे. महानगरपालिकेच्या कार्यसूचीवरील बाबीस प्राधान्य देण्यासाठी कोणताही अर्ज सामान्यतः जनरली तुम्हाला दोन दिवस अगोदर अर्ज दयावा लागतो. इतर वेळीस जर तुम्हाला एखादा विषय प्राधान्याने घ्यायचा असेल तर तुम्हाला दोन दिवस अगोदर अर्ज करावा लागतो. असा ह्याचा अर्थ होतो.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब तुमचा निर्णय दया.

**मा. महापौर :-**

काही विषय घेऊन चालत नाही.

**जुबेर इनामदार :-**

सचिवसाहेब पूढचा विषय घ्या.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब, त्या ठरावावर मॅडमचा रिमार्क घ्या.

**नगरसचिव :-**

विधी विभागाने अभिप्राय दिलेला आहे. सभागृहात कामकाज चालू असताना जे पहिले आहे त्याला ॲप्लीकेबल आहे असे त्यांचे मत आहे.

**आसिफ शेख :-**

बरोबर आहे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

अजिबात चालणार नाही. ११३ नंबरचा विषय घ्या.

**एस.ए.खान :-**

११३ घ्या नाहीतर बंद करा.

**आसिफ शेख :-**

मा. महापौर साहेब, सन्मा. सदस्य नरेंद्र मेहतांनी जो ठराव मांडलेला आहे त्याला आम्ही अनुमोदन दिलेले आहे आणि नियमानूसार विषयपत्रिकेवरील विषय वगळून दुसरा विषय घ्या असा ठराव मांडला आहे.

**अनिल सावंत :-**

विषय पत्रिकेवर विषय नाही त्याचा ठराव होऊ शकत नाही.

**एस.ए.खान :-**

अजिबात चालणार नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर, सचिव साहेबांनी निर्णय दिला आहे. सभा चालू करा.

**एस.ए.खान :-**

सचिव साहेबांचा निर्णय चालत नाही.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, आपण ग्रामपंचायत पासून सरपंच आहात. आपल्याला ह्यामध्ये आमच्यापेक्षा जास्त माहित आहे. असे करता येते.

(सभागृहात गोंधळ)

**आसिफ शेख :-**

सन्मा. महापौर साहेब, आम्ही दिलेला ठराव सचिव साहेब खुलासा करा तुम्ही सचिव आहात ना? मॅडमनी आपला अभिप्राय दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब आता काय अडचण आहे.

**आसिफ शेख :-**

नगरसचिवाचे पद हे क्लास वन आहे आणि लॉ ऑफिसर सुध्दा क्लास वन आहेत. लॉ ऑफिसरनी आपल्याला अभिप्राय दिलेला आहे. आता नगरसचिवाची जबाबदारी आहे. की दिलेला अभिप्राय आणि आम्ही मांडलेला ठराव....

**नगरसचिव :-**

त्याचे स्टेटमेन्ट देतात.

**आसिफ शेख :-**

आणखी काय तपासायचे आहे.

**नरेंद्र मेहता :-**

उपमहापौर साहेब, मा. महापौरांना विचारा ग्रामपंचायतीचे नियम काय आहेत. त्यावेळचे नियम काय आहेत.

**जुबेर इनामदार :-**

आता ग्रामपंचायत नाही आपण महानगरपालिकेत आहोत. आता आपले कामकाज मुंबई प्रांतिक महानगरपालिकेप्रमाणे चालते. सचिवसाहेब, केबीनमध्ये जा आणि कल्याण, डोंबिवली, ठाणे महापालिकेच्या सचिवांना फोन लावा आणि त्यांना विचारा की आमच्याकडे अशी परिस्थिती आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर साहेब, प्रशिक्षणाचा दौरा लवकरात लवकर लावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहता सारखे नागरिक ह्या शहरात आल्यामुळे हे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

कामकाजाबद्दल आपल्याकडे संपूर्ण माहिती नाही ती संपूर्ण माहिती दोन दिवसात घेऊन या त्यासाठी मी वेगळा ठराव करतो. आता मी वेगळा ठराव करतो आत मी पुन्हा सांगतो मग सांगू नका की हे ठराव करता येणार नाही. तहकुबची वेळ कोण ठरवणार? नंतर बोलू नका की हे आम्ही नाही ठरवणार. आजच्या सभेत मोठा गोंधळ झाल्यामुळे आजची सभा २१/०२/२०१२ सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे. असा ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब ह्याला किती सदस्यांची मान्यता लागते.

**अनिल सावंत :-**

सभेची तारीख मा. महापौर ठरवून शकतात. सभागृह ठरवू शकत नाही.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब सभेची कोण ठरवणार?

**नगरसचिव :-**

त्यांनी ठराव केलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

सचिव साहेब, पिठासीन अधिकारी सभेची तारीख ठरवेल.

**नरेंद्र मेहता :-**

मंगळवारी सर्वांनी अभ्यास करुन या.

**लक्ष्मण जंगम :-**

मंगळवारी या म्हणजे काय खात्यातली माणसे आहेत का?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर साहेब, कमीत कमी तीन दिवसाची नोटिस दिली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब, मा. महापौर सभेची तारीख ठरवतील.

**मा. महापौर :-**

सन्मा. नरेंद्र मेहतानी सांगितल्याप्रमाणे सर्व मताने सभा तहकुब करण्यात येत आहे.

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- ५.४२ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**